# सटवाई



891.46
2881

SARASWATI ARTS COLLEGE
LIBR. OF
No. 2881
DAHIHANDA

# सटवाई

कथासंग्रह

2881
सदाशि

SARASWATI ARTS COLLEGE
DAHIHANDA
LIBRARY
Acc. No. 2881 Rs. 150
Call. No. 89146 Dt. 17/2/24

प्रा. दिवाकर सदाशिव

सटवाई (कथासंग्रह)
दिवाकर सदांशिव

❑

© कु. मेधावी दिवाकर सदांशिव
मु.पो. देवळी
ता.जि. अकोला

❑

प्रकाशक
प्रा. दिवाकर सदांशिव
मु.पो. देवळी
ता.जि. अकोला
मो.नं. ९८२२०८४६५४
ई-मेल : diwakarsadanshio@gmail.com

❑

प्रथमावृत्ती : जून २०१८

❑

मुखपृष्ठ : प्रमोदकुमार अणेराव

❑

अक्षरजुळणी
स्मिता टाईपसेटर्स
११२०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

❑

मुद्रक : स्मिता प्रिंटर्स, पुणे ३०

❑

किंमत १५०/- रुपये

ISBN - 978-93-5300-843-7

माझी पहिली वाचक,
माझी बहीण सुरेखास...

# प्रस्तावना

अस्मितादर्श साहित्य संमेलन जळगाव. अत्यंत नियोजनबद्ध पार पडलं. नेहमीप्रमाणे जुन्या-नव्या लेखक कवी मित्रांच्या भेटी झाल्या. क्षेमकुशल विचारलं. नवीन पुस्तकाबद्दल आस्थेनं एकमेकांना विचारलं. प्रपंचातलं एकवेळ विचारणं नाही. पण पुस्तकाबद्दल हटकून विचारलं जातं. कुणी पसंती दर्शवितं. अभिप्राय देतं. परीक्षणासाठी पुस्तकं दिली जातात. नवीन लेखकमंडळी, बुजूर्ग लेखक कवीच्या अवतीभवती घुटमळतात. परिचय करून देतात. फोटो काढून घेतात. अशातच एक कथाकार माझ्याकडे आला. अकोला-दर्यापूरकडचा. सोबत डॉ. भाष्कर पाटील होते.

'मी काही कथा लिहिल्या आहेत!'

'छान' -

मी प्रोत्साहित होऊन काही म्हणायच्या आत त्यांनी माझ्या हाती बाड दिलं. 'बारा कथा आहेत. पहिला प्रयत्न आहे. कृपया वाचून बघा. चुकलं-माकलं असेल तर मार्गदर्शन करा. आपल्या सवडीनुसार वाचा. तुमचा अभिप्राय कळवा.'

'काही काळजी करू नका. वाचून सांगेन तुम्हाला.' मी ते बाड घेतलं. संमेलनात अनेकांनी पुस्तके दिली होती. काही विकत घेतली. असा प्रत्येक मेळाव्यात सिलसिला सुरू असतो.

प्रा. दिवाकर सदांशिव हे तसं अपरिचित नाव. विदर्भात दूर गाविलगडाकडे राहाणारे. दलित साहित्यात नव्यानं रुजू झालेले. कथालेखनाने सुरुवात केली.

प्रा. आत्माराम गोडबोले. विलास सिंदगीकर. धर्मराज निमसरकर. जयराज खुने. बैजनाथ दुधबाळे. महेंद्र गायकवाड ते थेट दीपध्वज कोसोदे.

यांच्या कथांपर्यंत नजर टाकली आणि दलित कथेत आणखी एक दमदार आशादायक नाव मी अंतर्भूत करू इच्छितो ते प्रा. दिवाकर सदाशिव यांचं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, दुर्गम तथा आडवळणी भागात दलित साहित्य. आंबेडकरी प्रेरणेचं साहित्य मूळ धरू पाहात आहे. त्याचं उदाहरण म्हणजे प्रा. दिवाकर. म्हणूनच अस्मितादर्श साहित्य संमेलनाचं फलित काय असेल तर

[illegible]

[illegible]

[illegible]



[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

होती. तो अभ्यासात लक्ष घालण्याचा प्रयत्न करीत होता. पण लक्ष लागत नव्हतं. त्यामुळे तो कधी कधी स्वत:वर चिडत असे. तरीही त्याची मानसिकता. घरस्थिती त्याला अभ्यासापर्यंत येऊ देत नव्हती.

तर आईवडिलांचा समज काय असायचा-

'शिकला तं शिकला नाई तं आपली जमीन हायेच. नंगे होवो काय? लोकायच्या वानी!'

म्हणूनच अथर्व नापास झाल्याचं ओंकार पाटलाला वाईट वाटलं नाही उलट ते त्याला म्हणाले.

'हरिपाठाला जायचं नाही का?'

आणि तोही न बोलता उठून चालू लागला.

या कथेत सेवकरामचा धूर्तपणा हा धागा महत्त्वाचा आहे. लगेच उलगडा होत नाही. शेवटपर्यंत उत्सुकता वाढविण्यात कथेचं सामर्थ्य आहे. बहुजनांनी शिकू नये. ही कुटनीती त्यांची आहे. यावर मार्मिक प्रकाशझोत टाकलेला आहे.

एकलव्याचा गुरुदक्षिणा म्हणून अंगठा मागणाऱ्या द्रोणाचार्यांची गोष्ट फार जुनी आहे; परंतु द्रोणाचार्यांच्या मनोवृत्तीचे दर्शन आजही दिसून येत आहे. खासगी विशेषत: उच्चवर्णीयांनी चालविलेल्या शाळांतून असे गुणवंत आणि देणगीदार शिक्षक द्रोणाचार्यांचा वारसा चालवीत आहेत. शासकीय शैक्षणिक धोरण आणि अभ्यासक्रम काहीही असो यांचा मात्र छुपा अभ्यासक्रम आणि धोरण बिनदिक्कत मुलांच्या माथी मारले जाते. 'शाळा' नावाची कथा शिक्षणक्षेत्रातलं कुटील कारस्थान स्पष्ट करणारी आहे. बहुजन आणि मागासवर्गीयांना शिक्षणाच्या प्रक्रियेतून हद्दपार करून त्यांना पूर्वीचेच दिवस आणण्याचा नियोजनबद्ध कार्यक्रम कसा आखलेला आहे ते दिसून येते. ही कथा मुसलमानांच्या एजाज पठाणची आहे. तसेच बौद्धांच्या सुऱ्याची आणि मांगाच्या नाम्याची. बालपण कसं रम्य असतं! जात-धर्म उच्च-नीचतेचा स्पर्श झालेला नसतो.

सर्वसमभावाचं, शुद्ध शेजारधर्माचं दर्शन प्राथमिक शाळेत शिकत असतानाच लेखक वर्णन करतो. पण वरच्या वर्गात म्हणजे पाचवीला गेल्यावर शिक्षक ते बदलतात. ते वाचल्यावर आपण चक्रावून जातो. एजाज आणि त्याचे मित्र गोंधळून जातात. लेखक लिहितो-

वर्गाला निबंध लिहून आणायला सांगितले होते. एजाजला सरांनी विचारलं, 'निबंध लिहिले का?'

'हो'

'दाखव पाहू'



मोठ्या ऐटीने एजाजने वही दाखवली. पण त्यात दोनच निबंध. तिसरा निबंध का लिहिला नाही म्हणून त्याला बेदम मारलं.

तिसरा निबंध ठराविक मुलांनीच लिहून आणलेला होता. संघटनेत येणाऱ्या मुलांनी माहिती पुरविली होती. बाकी बौद्ध, मुसलमान, मुलांना सांगितलं नव्हतं. तिसरा निबंध होता, डॉक्टर बेगडीवार की जो पाठ्यपुस्तकात नव्हता.

एकूण काय तर वर्गात मुलांना जाती क्रमावर बसविणे. पाठ्यपुस्तकाबाहेरचं विचारून त्याला भयचकित करणे. आणि विनाकारण कडक शिक्षा करणे. त्यामुळे खालच्या जातीच्या मुलांच्या मनात शिक्षणाबद्दल भीती निर्माण करणे. त्याने शाळा शिकू नये असे वातावरण निर्माण करणं. ज्येष्ठांच्या मुलांना खालच्या जातीच्या मुलांशी बोलू न देणे. त्यांच्यात खेळू नये असा अप्रत्यक्ष व्यवहार करणे. म्हणजे पुन्हा जाती वर्चस्वाचं भूत निर्माण करणं. असला प्रकार शैक्षणिक संस्थांतून सुरू आहे. धर्माचे अड्डे ह्या संस्था बनू पाहात आहेत. वरून कितीही समतेचे आणि भारतीय एकात्मतेचे गोडवे गायले जात असले, तरी विषमतेची विषवल्लीच पेरली जात आहे. शिक्षक किती धर्मांध असतात हे लेखक दाखवतो.

'किताब के बाहर का निबंध बोला था क्या सर ने, तो फिर बाकी के पोट्टोने कैसे लिखा?'

'श्यामकू ओ मंदिर मे आखाडा नही भरता क्या उसमे मालूम गिरा पोट्टेकू ।'

'फिर तू जाया कर ना आखाडा मे ।'

'आने नही देते वो । कहते है मुसलमान और बुद्ध के लिए नही ।'

मुलांमध्ये भेदभावाचं विष कसं कालविलं जातं, हे नमूद होतं.

'सर, मले व नाम्यालेच रायाले सांगत. ईठ्या, पक्या आमच्या संग रायत नसत. सरांच्या देखत बोलत नसत. सरांच्या धास्तीमुळे सुऱ्या शाळेला येत नसे. त्यानं शाळाच सोडून देली. नाम्या परीक्षेला बसलाच नाही. बाकीच्या पोरांना पेपर अवघड गेले. सरांनी दिलेले निबंध परीक्षेत आले नाहीत.' एजाजला मात्र परीक्षा सोपी होती. अब्बांनी अभ्यास घेतला होता म्हणून त्याला पेपर कठीण गेले नाहीत. तरीही निकाल लागला तेंव्हा सरपंचाच्या मुलाचा नंबर पहिला आला. गोसावी गुरुजींचा पक्या दुसरा आला आणि स्कॉलरशिप परीक्षेत सेंटरमध्ये पहिला आलेला एजाज पठाण मात्र ह्या शाळेत पाचवा आला होता.

आणि एजाजच्या आईची प्रतिक्रिया तर त्याहून अधिक चिंता करायला लावणारी आहे. बहुजन आणि इतर खालच्या जातीच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल भविष्याबद्दल विचार करायला लावणारी आहे.

'शिक्षणाशिवाय तुमची प्रगती नाही. कितीही हालअपेष्टा झाल्या तरी शिक्षणाची

कास सोडू नका.' असा मंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिल्यामुळे बौद्धांमध्ये चैतन्य आलं. ते शिकून मोठे झाले. स्वाभिमानाचं आणि प्रतिष्ठेचं जीवन जगत आहेत. अर्थात हेच सवर्णांना खुपत आहे. म्हणून ते दलित बौद्धांच्या प्रगतीमध्ये अडथळा आणीत आहेत. 'उसनवारी' अशीच एक कथा आहे. काशीनाथचा मुलगा औरंगाबादला शिकायला आहे. सुटीनंतर त्याला कॉलेजला जायचं आहे. पण एस.टी. च्या टिकिटाचे पैसे नाहीत. म्हणून वेळेवर जाणं होत नाही. आश्रू कुचंबून जातो. आई मोलमजुरी करते. बाप मात्र कष्ट करत नाही. उलट दारू पिऊन लोळत असतो. आईला पोराची काळजी आहे. आमचं कसंही होवो पण आश्रूला शिकायला पाठविलं पाहिजे. म्हणून ती गावात आणि शेजारीपाजारी जाऊन पैसे मागते, पण कोण देणार? तरीही ती जिद्द सोडत नाही. काशीनाथ मात्र केशवराव पाटलाकडून पैसे घेऊन येतो असे म्हणतो. त्याला पाटलाचा भरोसा असतो. कारण पाटील नेहमीच त्याला दारू प्यायला पैसे देत असतात आणि वसूलही करून घेतात. ह्याच भरोशावर काशीनाथ जातो. पाटील घरातून पैसे घेऊनही येतो, पण सहज विचारतो. तेंव्हा काशीनाथ खरं तेच सांगतो.

तोच पाटलाच्या मनातला जातीय त्वेष उफाळून येतो. आपल्या पैशावर याची उन्नती होत असेल तर, आपण मदत कशाला करायची? पाटील हात आखडतो. सबब सांगून पैसे द्यायचे टाळतो.

तुमची प्रगती होऊ नये. तुम्ही तसेच दारू व्यसनात गुरफटून जावे. तुमचा नाश व्हावा. त्यामागून तुमच्या पिढीला सुद्धा तसेच दिवस यावेत. गुलामगिरीच्या बेड्या तशाच घट्ट व्हाव्यात असं त्यांना वाटतं.

पण तुम्हाला कितीही आम्ही गुलामच राहावं असं वाटत असलं तरी आम्हाला गुलाम करणारे तुम्ही कोण? याचा बोध आता आम्हाला झालेला आहे. शिक्षणातून आम्हाला प्रकाशवाट दिसत आहे.

शारजाला पाटील पैसे देणार नाही हे माहीत होतं. म्हणून तिनं सावकाराकडे गळ्यातली पोत गहाण ठेवून पैशांची तजवीज केलेली होती. अतिशय आटोपशीर कथा आहे. सहज उलगडत जाणारी.

या कथासंग्रहाचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. वऱ्हाडी बोलीभाषेचा जसा उपयोग केलेला आहे, तसाच पारधी जमातीच्या भाषेचा 'हाल्डं' या कथेत उपयोग केलेला आहे. प्रादेशिक आणि बोलीभाषेचा वापर करून लेखक अनुभवाला अधिकच वास्तव रूप देण्याचा प्रयत्न करीत असतात. ते एक लेखनाचं कौशल्य किंवा शैली म्हणूनही पाहिलं जातं. लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड यांनी आपल्या आत्मचरित्रात कैकाडी समाजाच्या भाषेचा अधून-मधून वापर केलेला



आहे. चरित्रातल्या काही घटना. प्रसंग. चित्रित करताना व्यक्तीच्या तोंडचे जसेच्या तसे संवाद, शब्द लिहिण्यातच त्या प्रसंगाचे जिवंतपण किंवा परिणामकारकता स्पष्ट होते. ग्रांथिक भाषेतून त्यातलं मर्म अधिक स्पष्ट होत नाही. म्हणून अनेक मान्यवर भटक्या, विमुक्त जाती-जमातीच्या लेखक-कवींच्या कलाकृतीत ज्या-ज्या जाती घटकांच्या बोलीभाषेचा उपयोग केलेला आहे. त्यामुळे मराठी साहित्य समृद्धच झालेलं आहे. प्रा. दिवाकरांनी पारधी जमातीची भाषा वापरून कथावैशिष्ट्य पूर्ण केली. पारधी म्हटलं की, चोरटी-गुन्हेगार जमात असा समज आहे. पारधी दिसला की तो चोरी करायला आलेला आहे. पारधी आणि पोलिसांचं हाडवैर आहे. ज्या चोऱ्या होतात त्या पारध्यानेच केलेल्या आहेत असं जणू गृहीतच धरलेलं असतं. चोरी करून पारधी श्रीमंत व्हायला पाहिजेत. देशातल्या श्रीमंत व्यक्तींच्या यादीत त्यांची नावे असायला पाहिजेत. पण त्यांचं नाव गुन्हेगारांच्या यादीशिवाय कुठेच नाही. गाव आणि गावकुसाबाहेरही त्यांची वस्ती नाही. अजूनही ते जंगलात, डोंगर कपारीत राहातात. जंगली पशू-पक्ष्यांची शिकार करूनच ते जगतात. शिकारीवरही पाबंदी आलेली आहे. चोरून-मारून शिकार करायची व गावात आणून विकायची. त्यातून मिळालेल्या चार-आठ आण्यावर जगायचं. पण असं जगणं तरी कुठं सोपं आहे?

शिकार घेऊन गावात फिरावं लागायचं. चेत्रईजवळची शिकार गंगाराम घ्यायचा. त्याचं लक्षण काही ठीक नव्हतं. कधी कधी चेत्रईचं पोरगं या शिकार घेऊन कुनबीपुऱ्याकडे जायचा. गंगाराम शिकार घ्यायचा. पण पैसे देत नसे.

गंगारामला चेत्रईची शिकार करायची होती. तो सकाळीच पालावर आला. गडीमाणसं कामाधामाला निघालेली होती. पारधी शिकारीला गेले होते. सकाळीच गंगाराम आला. तिच्या घरातच बळजबरी करू लागला. तेव्हा ती त्याच्या तावडीतून सुटून बाहेर पळू लागली. झटापटीत तिचं लुगडं निसटलं होतं. गंगारामपुढं कुणाचं काही चालत नव्हतं. चेत्रईची अब्रू लुटून गंगाराम गेला आणि चेत्रई आपलं काळं तोंड घेऊन घरी आली. तशी ती एकटक आढ्याला बघत होती. डोळ्यांत टिपूस नव्हता. त्या दिवशी पारधी वस्तीत चुली पेटल्या नाहीत, की कुणी दारू पिऊन गोंधळ घातला नाही. सगळीकडे अंधार दाटून गेला होता. भल्या पहाटे चेत्रईनं निंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली होती. याद्रूच्या टोहानं सकाळ पेटली. सगळी पारधीवस्ती पेटून उठली. जो तो शिकार तोडायचे सत्तुर आणि कुऱ्हाडी घेऊन गंगारामच्या वाड्याकडे धावत सुटले. त्यात याद्रू म्हणजे चेत्रईच्या मुलाची गती बेभान होती. आता पारधी जमातही प्रतिकार करण्यास सज्ज झालेली आहे. हेच कथाकाराला दाखवायचं होतं. बंदुकीच्या

गोळीगत ठासून भरलेली वाक्यरचना, अत्याचारकर्त्यांचा सूड घेण्याची ईर्षा प्रत्ययाला येते.

शेतकरी दारूवर कसा लागतो. त्याला दारू कोण पाजतो. शेतकऱ्याला बुकीच्या मार्गावर कोण नेतो. त्यातून त्याचे शोषण कसे होते. याचा 'वापाई'. कथेत लेखकाने ऊहापोह केलेला आहे. देवराव नावाच्या शेतकऱ्याची दुर्दशा कुणी केली? त्याला दारूचं व्यसन कुणी लावलं? गावातल्या प्रतिष्ठित उच्चवर्णीय किसन, ब्राह्मणानेच देवरावाचं वाटोळं केलं. त्याची जमीन हडप केली. अशा कपटी वर्णीयांचंच गावात राज्य असतं. त्यातून सामान्य शेतकऱ्याची सुटका नाही. म्हणून त्यांना आत्महत्येशिवाय पर्याय नाही. खरं तर आत्महत्येचे मूळ गावातले जातीने श्रेष्ठ समजणारी माणसंच आहेत. म्हणून आत्महत्येच्या वणव्यात होरपळणारी माणसं सांगतात -

'वेसनापासून अन् बामनापासून कई सावध राहावं मानसानं - पायल काय? बझ्या पारध्याचं सगयं वावर गीवलं त्यानं, दारुच्या नांदी लावून.'

अशी शोकात्म कथा आहे.

रूपा आणि भगवान ह्या दोन्ही भावांच्या विनाशाची 'सटवाई' नावाची कथा आहे. सटवाई हे वावराचं नाव आहे. गावातील श्रीमंतांच्या भांडणात गरीब असणाऱ्या दोन भावांच्या संसाराचा सत्यानाश होतो याचे वर्णन लेखकाने केले आहे.

'जमानत' या कथेत बौद्ध समाजातील शिकलेल्या पोरांवरती जाणिवपूर्वक केसेस दाखल केल्या जातात. मिरवणुकीवर नियोजनबद्ध गोटमार केली जाते. व गावामध्ये दोन्ही समाजांत वाद पेटवण्यासाठी गोटमार झालेली असते. कोणतंच वृत्तपत्र या गोटमारीची बातमी छापत नाही. ही सर्व घटना नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्था घडवून आणते व या काळातील दलितांवरील अन्याय स्पष्ट होतो.

या देशात आर्यांच्या आगमनानंतर राजाचे खून झाले. राजाकडून खून करून घेतले. शिष्यांचे अंगठे कापले. भाऊ-चुलत भाऊ यांच्यात युद्ध झाले. विचारवंतांचे खून झाले. संशोधकांचे खून झाले. समाजसेवकांचे खून झाले. धार्मिक दंगे झाले. जातीय दंगे झाले. सर्व सत्ता काबीज केल्या. आजही सर्व सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी देशात सतत दंगे घडवले जातात. काहीही असले तरी दंगली, अतिरेकी हल्ले आणि बॉम्बस्फोटांनी देश खिळखिळा होत आहे. अशाच एका जातीय दंगलीचा उलगडा लेखकाने 'समजोता' या कथेत केलेला आहे. ते वाचल्यावर सरळ साधी देवभोळी वाटणारी माणसं किती कुटील कारस्थान रचून गावात दंगल घडवून आणतात. पुन्हा शांतता कमिटीमध्ये जाऊन दोन्ही जाती



घटकांत समझोता घडवून आणण्याचं नाटक वठवितात. शांतता समितीतलेच सदस्य दंगल पेटवितात आणि शमविण्याच्या फार्सही करतात. त्या अगोदर निरपराधी लोकांचे जीव गेलेले असतात. वित्तहानी झालेली असते. दंगलीच्या खुणा बुजतीलही पण अंत:करणाला झालेल्या जखमा भरून निघत नाहीत. कुणाचं तरी धर्मसंस्कृतीचं बेगडी प्रेम ऊतू येतं आणि सामान्यांचं आयुष्य उध्वस्त होतंय. परसुराम भटजींची ही कथा. भटजी त्या गावात एकटेच. पुजारीपणावर सगळी गुजराण चालायची. भटजी बोलायला गोड. धर्माचा प्रचंड अभ्यास. पारायणात निष्णात. धर्मपालनात काटेकोर. मृदूभाषेचे. रंगानं गोरे. नाकी डोळे निरस. उंचेपुरे. सडपातळ. डोक्याला उलटा शिवलिंगी टिळा लेवून भगवी टोपी घालणारे. शांत आणि सभ्य म्हणून त्यांना सर्वत्र ओळखत असत. तर त्यांची बायको महानंदा घरात काय लागतं. काय नाही. आठवडी बाजार, कपडेलत्ते, दूध, किराणा. मुलींच्या शिक्षणाचं सगळं बघायच्या. अबोल. मीतभाषी होत्या. चेहऱ्यावर हसू. मिळून-मिसळून वागणाऱ्या होत्या. त्यामुळे घरावर येणारे फेरीवाले. भाजीवाले. हटकून त्यांच्या दारावर जास्त वेळ थांबायचे. आग्रह करून माल विकायचे. पैसे काय, केव्हाहं द्या. म्हणायचे. त्यातला आगा नावाचा फेरीवाला तर भटीन-बाईंना जास्तच आग्र करायचा. एखादी वस्तू बळेच द्यायचा. तुम्हाला शोभून दिसेल म्हणून स्तु करायचा. दिवसातून दोन-तीन वेळा त्याची फेरी असायची. त्याची हाक आर की, भटीनबाई अंगणात यायच्या. आगा बळेच वस्तू पदरात टाकायचा. तुम्हा नाहीतर मुलीला होईल म्हणून तो माल द्यायचा. बाईंचा नाईलाज व्हाय नेहमीचा फेरीवाला ना!

बाईंच्या मुलीला म्हणजे क्षिप्राला ते पसंत नसायचं. त्याच्याकडून माल घे नको. घेतला तर मी वापरणार नाही. 'परत करून टाक.' असं म्हणायची. ति नाईलाज व्हायचा. एकदा तर त्यानं हिरव्या बांगड्या आग्रहानं दिल्या. भ आणि आगा यांच्यातील आंतरिक ओढ लेखक कुठेच प्रकट करीत नाही. भटजींच्या अवस्थेतून ती व्यक्त होतांना दिसते. बाबा महाराजांच्या बोलण्य बाई देवदर्शनाला अधून-मधून दुपारी येतात असं कळलं. तेव्हाच भटजी मनात संशय फुलू लागलेला असतो.

दुसऱ्या दिवशी दरवाजा बंद करून घरातच बसल्या. कटलरीचा आ आला तरी त्या बाहेर आल्या नाहीत. त्यांची मानसिकता 'मन बाहेर देहाचा अ अशा समर्पक शब्दांत लेखक वर्णन करतात. फाफट पसारा किंवा शब्द करीत नाहीत. आटोपशीर संतुलित रचना हे त्यांच्या कथेचं वैशिष्ट्य. बाई फ बाहेर येत नाहीत. फेरीवाल्यांकडे त्या फारसं लक्ष देत नाहीत. भटजींचं कामानि

बाहेर आणं असतंच, पण ते खचून गेलेले असतात. कुणीतरी भटजीनबाई कुठेतरी दिसल्याचं सांगत असतात. भटजीची चिंता वाढतच जाते. कसा बंदोबस्त करावा म्हणून ह्या योजनेतच असताना त्यांना एक मार्ग सुचतो. दुष्कर्म करणाऱ्याकडे मार्गाला काही कमी असते काय? भटजी एके रात्री वेळ टाळूनच देवळात दर्शनाला जातात. तेथे आधीच सहा-सात पोरं झोपायला आलेली असतात. त्यांच्या समक्ष भटजी देवळात जातात आणि नाकाला उपरणे लावून भयभीत होऊन बाहेर येतात. त्यावेळी मुलं विचारतात -

'काय झालं भटजी?'

आणि त्यांनी जे सांगितले त्यावरून गावात दंगल पेटते. मुसलमानाची वस्ती जाळण्यासाठी सगळं गाव गोळा होतं. तरुणांच्या भावना भडकतात. काट्या, कुऱ्हाडी, आगीचे गोळे घेऊन लोक मुसलमान पुऱ्यात घुसतात. परसुराम भटजी मात्र घरात दारं-खिडक्या लावून लपून बसतात. देवळात कुणी तरी गोमास आणि हिरव्या बांगड्याचे तुकडे टाकलेले आहेत. मुसलमानाशिवाय हे कृत्य होणे नाही. भटजीनी हिंदू-मुस्लीम दंगल पेटविली. आगाचे घर पेटविण्यात आलं. संचारबंदी लागू झाली. सगळा विध्वंस करूनही परसुराम जातीय समझोता करण्यासाठी शांतता कमेटीत जातो. हिंदू-मुस्लीम दंगलीचं खरं स्वरुप लेखकानं अत्यंत शांतपणे कुठलाही दूषित पूर्वग्रह न ठेवता स्पष्टपणे मांडलेलं आहे. कुठलीही कारणमीमांसा न करता किंवा शोध न घेता ऊठसुट बहुजनांच्या तरुणांनी कुणाच्या तरी सांगण्यावरून प्रक्षोभक होऊन स्वत:चं आणि देशाचं नुकसान होतं आहे हे कधी कळणार? यावर लेखकाने प्रकाश टाकलेला आहे.

'भाडेकरू' ही ह्या संग्रहातील उत्कृष्ट कथा आहे. बौद्ध माणूस कितीही शिकला. मोठा झाला. नोकरीला लागला. आर्थिकदृष्ट्या सुबत्ता आली, तरी त्याला गावात घर मिळत नाही. उच्चवर्णीय तर देतच नाहीत, पण शुद्रामधील सुद्धा देत नाहीत. हा सर्वत्र अनुभव आहे. अस्पृश्यता राहिलेली नाही. आम्ही अस्पृश्यता पाळीत नाही असे सर्वचजण म्हणतात. पण जात मात्र मनातून जात नाही. म्हणूनच कांबळे म्हटलं की, किरायाने घर मिळत नाही. बौद्धांना घर द्यायचं नाही हे त्यांनी ठरविलेलं आहे. याचे अनेकांना कटू अनुभव आलेले आहेत. या कथेत कांबळे मास्तरांनाही असाच अनुभव आलेला आहे. एका म्हातारीच्या घरी ते चौकशी करतात. खोल्या रिकाम्या होत्या पण कांबळे म्हणताच ती म्हणाली.

'आमी बुद्धाले घर देत नाही.'

पुढे ह्या म्हातारीला पावसात पाय घसरून मार लागतो. जेव्हा कांबळे गुरुजी आणि त्यांची मुलगी ते बघतात. मुलीला कळवळा येतो. म्हातारीला उचलून



दवाखान्यात घेऊन चला म्हणते. गुरुजीला वाटतं - आपल्या जातीला वाईट म्हणणारी. घर न देणारी. तिला मदत काय म्हणून करायची? पडू दे तशीच. सांडू दे रक्त. पण दुसरं मन म्हणायचं. आपल्या मुलीला काय वाटेल? पप्पा एका आजीला मदत करीत नाहीत. तिला तसंच तळमळू देतात. संस्कारासाठी ते गोल्डची समजूत काढतात. नंतर म्हातारीला रक्त देतात. ते तिला माहीत असतं.

पुन्हा एकदा त्याच म्हातारीचं घर रिकामं आहे असं समजताच कांबळे गुरुजी म्हातारीकडे जातात. निदान आपल्या रक्ताला स्मरून तरी ती घर देईल वाटलं. पण म्हातारी कसली बदलत्ये. ती एवढंच म्हणाली - सांगते दोन-चार दिवसानं. कांबळे मास्तर म्हणतात. 'म्हातारीला शरीरात माझं रक्त चालतं. मी मात्र तिच्या घरात चालत नाही.'

शरीराची भूक ही अनावर असते. मग ती हलक्या कुळातली की उच्च कुळातली स्त्री असो. गरीब-श्रीमंत असो. निसर्गनियमाचं पालन झालंच पाहिजे. नाहीतर काय घडेल ते सांगता येत नाही. 'गडीमाणूस' ही अशीच एक खानदानी स्त्रीची कथा आहे. नवरा लवकर वारला. विधवेचं जिणं नशिबाला आलं. शेतीवाडी भरपूर. राहायला मोठा वाडा. बैलं बारदाना मोठा. धाकट्या दिराने त्याच्या बायकोच्या म्हणण्यानुसार वाटण्या केल्या. तरीपण थोरली वहिणी म्हणून त्यांच्या शेतापोताचं बघत असतो. सहकार्य म्हणून.

ती विचार करायची. मानसाला काई पोटभर अन्न असलं म्हणजेच झालं काय? एक डाव अन्न नसलं तर चालतं. काय तं म्हणतात, विधवा बाईनं आपल्या सेवपदरानं राहावं. का? विधवा बाईला मन नसते का? कपायाचं कुंकू गेलं तसा शरीरधर्मही जाते काय? ते तं माणसाच्या मरणालोग सोबतच असते. बाई माणसाचा जीव लय जयते. पुरुषांना काय कसाही कुठीही यज्ञ करता येते. पण बाईमानसावर समाजानं लय बंदन लादले. काई बंदनं मान्याचं काम नाही. ज्याले आपून समाज म्हणतो तो समाजच इकडचा तिकडे, तिकडचा इकडे चरतच असते. काई समाजाले भियाचं काम नाही. असे विचार दैमान घालीत असतानाच तिचं मन प्रताप गड्यासंबंधी विचार करू लागतं. त्याला आपून विचारावं कसं. त्याला कळत नसेल काय. की आपून मालकीन आणि तो गडी म्हणून भीत असेल. खूप विचाराचं चक्र फिरतं आणि काहीही करून प्रसंग घडवून आणायचाच असं ठरवितात. कथेत हे सगळं बारकाईने नाही तर सूचकपणे सांगितलेलं आहे. मालकीण काहीही मानायला तयार नाही. प्रताप गडी त्यांच्या मनात भरलेला आहे. त्याला तरुण बायको आहे. एक मुलगी आहे. म्हातारी आई आहे. पण आपलं प्रकरण उघडकीस आलं तर प्रतापचं काय होईल याची जरा

सुद्धा त्यांना कल्पना येत नाही. मग तो सालगडी असो की खालच्या जातीचा. अखेर जे व्हायचा ते झालं. दिराच्या बायकोला संशय आलेलाच असतो. घरकामाला येणाऱ्या बायकांना मालकीनचं खालच्या जातीच्या प्रतापाबरोबर वागणं, हसणं, बोलणं आणि रात्री गोठ्यात झोपायला येणं पटत नाही. दीर पंजाबरावाला समजतं. तो प्रतापचा काटा कसा काढायचा ते ठरवितो. एव्हाना गावात वहिणीसंबंधी बरं-वाईट ऐकायला मिळायचं. एके दिवशी पंजाबरावानं वाड्यात येऊन प्रतापला सांगितलं -

'अरे, बोराटीच्या शेतात रात्री ढोरं चरायला येतात. जायं. एकटाच जाजो.'

त्या रात्री प्रताप बोराटीत गेला तो परत आलाच नाही. तो मरून पडला होता. त्याच्या म्हातारीवर आणि बायको-मुलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. पंचनामा झाला. पोलिसांनी पंजाबरावाच्या घरी चहापाणी केलं. आमदारानं केस दाबून टाकली. विजेचा करंट लागून त्याचा मृत्यू झाला होता. चोरी करण्याच्या हेतूनं प्रताप शेतात आला असावा आणि करंट लागून मेला. तर कोणी म्हणे पंजाबरावनच करंट सोडला होता. ते काहीही असो मालकिनमुळे प्रतापची बायको विधवा झाली हे खरं आहे. कथेचा शेवट करतांना लेखक म्हणतात -

'प्रतापनं आपल्या वाट्याचा घास खाल्ल्याचं दुःख पंजाबरावाला झालं होतं; परंतु मालकीन बाईला पंजाबरावपेक्षा गडीमाणूसच हवा होता. मालकीन बाईला, आता नव्यानं घरकामासाठी गडीमाणूस शोधावा लागण्याची चिंता होती. ती गडीमाणसाच्या विचारात मग्न उभी होती.'

अत्यंत अस्वस्थ आणि मन सुन्न करणारी कथा आहे. कथासंग्रहातल्या सगळ्याच कथा अस्वस्थ करणाऱ्या आहेत. जे साहित्य अस्वस्थ करते. विचार करायला लावते. ते सकस असते. म्हणून उच्चदर्जाचं लेखन करणाऱ्या प्रा. दिवाकर सदाशिवचं अभिनंदन केलं पाहिजे.

सामान्य माणसांची व्यसनाधीनता, अज्ञान, मोठ्या लोकांच्या हितासाठी आत्मबलिदान देणे. भावाभावांतलं वैमनस्य. क्षुल्लक गोष्टीसाठी प्रतिष्ठा (ठकन) पणाला लावणे. स्वाभिमान गमावणे. धर्मसत्तेतून. शैक्षणिक सत्तेतून शोषण करणे. अज्ञानात ठेवणे. मानसिक गुलामीत ठेवणे. दंगली घडवून आणणे. सर्व उपद्रव्य मूल्यांचं अवलोकन करून कुठल्याही अभिनिवेशाला बळी न पडता वास्तवाचं भान कथेतून मांडलेलं आहे. वऱ्हाडची माती सुपीक आणि मऊ आहे. तोच मऊपणा-मृदुपणा भाषेत जाणवतो. वऱ्हाडी बोली कानाला गोड लागते. त्यातलं माधुर्य गोड आहे. प्रादेशिक बोलीनं कथा अधिकच खुमासदार आणि व्यक्तिरेखाटनाला वैभव प्राप्त करून जाते.



पाऊस पेरणीचा हंगाम, शाळा आणि प्रवेश पास-नापासची वर्णने काही कथांतून येतात. तरीही कथा दमदार आणि सकस आहेत. सृष्टिसौंदर्य, व्यक्तिचित्रणावर प्रकर्षानं दुर्लक्ष जाणवते.

कथेतली काही विधाने विचार करायला लावतात. अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं साहित्यच टिकून राहाते. प्रा. दिवाकरांनी कथेत नवीन विषय हाताळलेले आहेत. व्यवस्थेकडून होणारे शोषण लवकर लक्षात येत नसते. साहित्यिकांना शोषणाचं सूचन लवकर कळत असते. या काळातील शोषणाच्या प्रकारावर प्रा. दिवाकर यांची कथा लक्ष केंद्रित करते.

संवाद हे लेखकाचं फार मोठं कौशल्य असतं. त्यातून व्यक्तीच्या स्वभावाचं आणि कथेच्या यशस्वितेचं गमक साध्य केलेलं असतं. संवादातून परिणामकारकता साधता येते. जणू पात्र आपल्याशी बोलत आहे. त्यातच आपण रममाण होतो. या कथासंग्रहाचं तेही एक वैशिष्ट्य आहे.

बोलीभाषेतील काही शब्द आपल्या अपरिचित असतात. लेखकांनी त्यांचा शोध घेतला पाहिजे. ते वैभव जतन केलं पाहिजे.

प्रा. दिवाकरांनी वऱ्हाडी भाषेतील वाक्प्रचार, म्हणी, बोलीभाषेतील काही शब्द योजलेले आहेत. वऱ्हाडी भाषेच्या दृष्टीनेही ह्या कथा महत्त्वाच्या आहेत.

एकूणच कथेमध्ये प्रा. दिवाकर सदाशिव यांनी दमदार आणि आश्वासक सुरुवात केलेली आहे. त्यांना शुभेच्छा. आणि पुढील उत्कृष्ठ निर्मितीची वाट पाहूया.

२३ जून २०१७

**योगीराज वाघमारे**
सोलापूर
मो.नं.: ९९२१०५८८६८

# अनुक्रमणिका


सटवाई ........................................ १९

समझोता ........................................ २५

हाल्डं ........................................ ३६

हरिपाठ ........................................ ४१

भाडेकरू ........................................ ५४

ठकन ........................................ ६१

गडीमाणूस ........................................ ६७

उसनवारी ........................................ ७९

शाळा ........................................ ८५

जमानत ........................................ ९३

वाघाई ........................................ १०१


●



# सटवाई

भगवान गाडीतून उतरला तशी गाडी पुढं निघून गेली. तो गावाच्या दिशेनं चालू लागला. आजूबाजूची झाडं पार सपाट झाली होती. वाघाईचा नंबर ओलांडला तसा नाथासेठच्या पांदनं तो चालू लागला. उतरणचं ऊन अंगाला झोंबत होतं. दूर माळ्यावर गाई-ढोरं चरत होती. तो रस्त्याने चालू लागला. काखेतलं गाठोळं त्यानं उजव्या हातांत घेऊन पाठीवर ठेवलं. रस्ता अनोळखी वाटत होता. सटवाईच्या नंबरात तो आला तसा थोडा वेळ थबकला आणि भूतकाळात शिरला.

रात्रीच्या जागरणानं खूप थकून तो ऊन अंगाला झोंबत असतानाही दारी झोपला होता. शेवंती शेनामातीनं घर सारवून भाकरी थापत होती. "भाबी भग्यादादाले धनाजी पाटलानं बलावलं."

मारोत्या दारात येऊन बोलून निघून गेला. अंगावरलं घोंगडं काढीत शेवंती भगवानले उठवू लागली.

"उठावं पाटलांन तुमाले बलावलं, आलता मारोत्या सांगत."

भगवान बुद्धपुऱ्याकडून पाटलाच्या वाड्याकडं निघाला. रस्त्यानं त्र्यंबकच्या घराकडून आत गावात शिरताना पुढून नाथाशेठ येत होता. दोघांचीही नजरानजर झाली. दोघंही आपापल्या रस्त्यानं निघून गेले.

वाड्यावर पाटील भगवानची वाटच पाहात होता. भगवान दिसता बरोबर पाटील शोधमुद्रेनं म्हणाला,

"भाड्या किती उसीर झाला रे. बायको अजूनही सोळत नोती काय तुले. ये अंदर!"

पाटील तक्क्यावर बसला. पुढे नजरेसमोर भगवान बसला.

"भग्या, यावर्षी आपल्याले सटवाईचा नंबर पेरा लागते, तई तुले नाथ्याले दोन-चार आपटन्या द्या लागतीनं. तसा काही तो बस्सर जानार नाई." भगवानला काही तरी बोलावं म्हणून सूचत नसताना तो सहज बोलला,

"हो मालक, आता येता-येता तो लय तोऱ्यात चालत होता. मीही म्हन्तो, एक-दोन आपटन्या देवावंच त्याले."

भगवान बोलून झाल्यावर जाण्यास उठला तशी पाटलानं दरवाज्याआडची फरशी कुऱ्हाड भगवानच्या हाती देली.

"भग्या, हे घे ईले रातभर आलटून-पालटून घोयस. अन् पायटीच गदं भुक्याच्या आंदी सटवाईत हजर राय, सकाय सटवाईचा आपल्या दोन एकराकळून धुरा काळ्यासाठी बाया सांगतल्या, तवा तू हजर पायजे."

भगवान घरी आला. शेवंती वाटच पाहात होती.

"काय सांगतलंव पाटलानं."

"काई नाई, फरशी घेऊन सकाय सटवाईत हजर राय म्हने."

संध्याकाळी दंडबैठका काढून भगवाननं भरपूर जेवण केलं. आता आपून कितीही खाल्लं तरी आपल्याले आता जवारीची काहीही चिंता नाही. असं मनाशी बडबडत तो ढेकर देत उठला. रातभर फरशी घासून मांजरीच्या डोळ्यावाणी चमकत होती. झाकटीतच तांबडं फुटायच्या आत तो सटवाईत हजर झाला.

दिवस निघाला तसा पाटील एकटांगी धोतर नेसून दुसरा पदर खांद्यावर टाकून सटवाईत आला. बायांनी सटवाईचा धुरा उचलण्यास सुरुवात केली. भरदुपार झाली. पूर्ण धुरा उचलून पाटलांची दोन एकराची पट्टी व सटवाईचा नंबर एक झाला. सटवाईचा नंबर पिकाले लय चिकट. नाथाशेठनं पुरी इस्टेट सटवाईच्या भरवश्यावरच जमा केली होती. गावाचं नाक होती ती. गावही तिच्याच नावानं ओळखलं जात होतं. 'टेवळी सटवाई.' सटवाई ही धनाजी पाटलांच्या बापानं बाईच्या नादात नाथाशेठच्या बापाजवळ गहाण ठेवली. पुढे दोघेही मेले आणि ती नाथाशेठची झाली.

दुसऱ्या दिवशी नाथाशेठनं तालुक्याला जाऊन गावात पोलिसाची गाडी आणली. गावात वाहन आलं म्हणजे काहीतरी घडलं असणार म्हणून सारं गाव वाड्यावर उलटलं होतं. गाडीतून नाथ्या उतरताच पाटलाला घाम फुटला. डोक्यावर खाकी टोप घातलेला. पुढं पोट आलेला साहेब समोर जाऊन बोलला.

"धनाजी पाटील तूच का."

पाटलानं घाबरतच होकारार्थी मान हालवली. लगेच पाटलाला काही हालचाल न करू देता साहेबानं त्यास हातकडी लावली. गावातून हातकडीसह गाडीत बसून जाण्याची पाटलाला लाज वाटत होती. पण सरकारी मामल्यापुढं त्याला काहीच करता आलं नाही. सगळ्या गावाच्या समोर गाडीत बसतांना धनाजी पाटलानं गालात हसणाऱ्या नाथाशेठकडे पाहिलं अन् थुका गिळला.



गाडी धूर उडवत गावातून निघून गेली. संध्याकाळी नाथाशेठ रुपरावच्या घरी आला. रुपराव थोडा भगवानपेक्षा समजदार. भगवानचा मोठा भाऊ. दोघांनीही सख्ख्या बहिणीच बायका केलेल्या. त्यांना लग्न झाल्यापासून दोन्ही भाऊ मिळून शंकर नावाचा एकच मुलगा. त्यानंतर लेकरु-बाळ झालं नाही. भगवानला तर लग्न झाल्यापासून खूप वर्षांनंतरही काहीच लेकरु-बाळ नव्हतं. दोन घरं मिळून एकच दिवा. तो म्हणजे शंकर. दहा-बारा वर्षांचा. शंकरसाठी रुपराव कुऱ्हाडीनं शिलूनं गाड्याची आख करत होता. नाथासारखा शेठ आपल्या दारात दिसताच रुपरावची छाती फुगली अन् तो अभिमानात बोलला -

"या दाजी या, मलेच बलाव्याचं होतं, मीच येत होतो. तुमी तरास घेतल्या परस." नाथाशेठ सरळ घरात गेला. घरात सर्व पसाराच होता. नाथाशेठ भिंतीला टेकून बसला. बाजूला रुपराव आणि त्याच्या उजव्या हातावर त्याची बायको जयवंती बसली. घरात चुलीचा धूर होता.

"हे पाय रुप्या, तुया भावाची अन् माई काई दुस्मनी नाई; पन धन्यानं त्याले माया बाऱ्यात लय भडकवलं, तू त्याले समजावून सांग."

"हो-हो दाजी. मी त्याले समजावून सांग्तो तुमी काई कायजी करू नोका."

नाथाशेठ उठला. आपल्या घरी गेला. रुपराव उठला व भगवानच्या घरी गेला.

"भग्या, धन्या पाटलाची अन् नाथ्यासेठची लय खानदानी दुस्मनी हाये. तू त्याइच्या फंदात पळू नोको."

रुपरावनं दारातून आत येता-येताच म्हणून टाकलं.

"पाटील माया भरवश्यावर सटवाई येते. म्हनून पाटलानं मले घरी बलावून सांगत्ल."

"घरी बलावून सांगत्ल म्हन्जे, अर्दी इस्टेट देली नाई तुया नावावर करून. तुया भरवश्यावर सटवाई घेईन, अन् तुले त्यात्ली कवळीही नाई देईन, पन तू कायले फालतू त्यायच्या मंदात पळतं."

"हे पाय रूपराव दादा, तू मले काई न्यान सिकवू नोको गळ्या!"

"मर मंग फुकट!"

रूपराव नाईलाजास्तव उद्गारला व उभ्या-उभ्या मागारी फिरला. भगवानची मोठ्या भावाविरूद्ध बोलायची ही पहिलीच वेळ. पाटलानं घरी बोलावून सांगतलं आणि पाटलांकडून ज्वारी भेटीन या आशेवर भगवान मोठ्या भावाले उलटा बोलला होता. त्याबद्दल त्याला थोडं मनात वाईटही वाटलं होतं.

ढगांची गर्दी झाली तसी सुतारा जवळ कामं आली. लोकं घरं फेरू लागले.



2881

हंबरडा फोडला. "पाटील, त्याईले थांबवा हो." पाटील सहज आत निघून गेला. दोघीही बहिणी उघड्यावर पडल्या. एकमेकींच्या गळ्यात पडून रडत होत्या. शंकरही रडत होता.

कोर्टात पाटलाची आणि नाथाशेठची साक्ष झाली. रूपरावला जीवे मारल्याच्या गुन्ह्यात भगवानला कोर्टानं १४ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. शेवंती तिचंच ऐकून बेशुद्ध झाली. आणि जमिनीवर पडली. तिची बहीण जयवंती रडू लागली. शंकरही रडत होता. त्यांची आसवं नेमकी कोणासाठी पडत होती हे नेमकं त्यांनाही कळत नव्हतं.

सावल्या लांब पूर्वेकडे चालल्या होत्या. पाखरं घरट्याकडं परतत होती. गाई-ढोरं गावाकडं निघाली होती. भगवान सटवाईत पूर्ण तारुण्य गमावून. पिचलेल्या हाडात. डोळे बारीक करून ओल्या मनानं आपल्या मोठ्या भावाला शोधत होता. सटवाई उन्हाळ्याच्या दिवसामुळं तशीच पडून होती. सर्व काही गमावून. पेरीन त्याची होण्यासाठी.

❦



# समझोता

जेवनरात्र ओलांडली होती. आपली जेवनासाठी वाट बघत नसले तरी घरी जाण्याची ओढ त्यांच्या पावलात होती. गावातील मध्यरस्त्यावरून एक लहानसा रस्ता त्यांच्या घराकडे जायचा. ही गावाची नवीन वस्ती. गाव तसं दिवसेंदिवस फुगत चाललं होतं. गावातून शहराकडे जाणारा राज्यमार्ग होता. त्या रस्त्याच्या आजूबाजूला लहान-सहान हॉटेलं थाटली होती. बाजूच्या गावावरून येणाऱ्या गाड्या जिल्ह्याच्या गावी जाताना त्यांना मुख्य मार्ग असलेल्या अंतरगावावरूनच जावं लागायचं. त्यामुळे तेथे ये-जा करण्यासाठी रात्रीची खूप वेळेपर्यंत वाहनं मिळत असत. म्हणून परशुराम भटजींनी हे गाव सोडलं नव्हतं. त्यांचे भाऊ व इतर भटजींची घर शहराला गेली होती. परशुराम भटजींचं एकच घर गावात होतं. कदाचित गावकऱ्यांनीच ते ठेवलं असावं. गावातील, आजूबाजूच्या खेडेगावातील सर्व पूजेचं कार्य त्यांच्याकडे यायचं. भरपूर दक्षिणा. शिधा. कपडे. वस्तू. पैसे मिळत असत. आजही ते जवळील सामानासह रात्रीचे घराकडे चालत होते. जवळ दक्षिणेचा पैसा. घरधन्याने दिलेला जेवणाचा शिधा. मोठे गाठोळे घेऊन ते आले. दारावर थाप पडताच धाडकन दरवाजा उघडला गेला.

"अरे लवकरच उघडला दरवाजा, दरवाजाजवळच उभी होती की काय." भटजी म्हणाले.

"नाई, हो..हो तुमचीच वाट पाहात होती." तिनं स्वत:ची उडालेली धांदल लपवत म्हटलं.

"आज लवकर आले."

"हो वाहन सापडलं लवकर, म्हनून लवकर आलो."

सामान ठेवून त्यांनी गळ्यातली गाठी काढून खुंटीला टांगली. अंगातील नेहरू शर्ट काढला आणि धोतर आवरत म्हणाले -

"टाका थोडं पानी टाका. हातपाय धुयाले."

हातपाय धुवून भटजी जेवायला बसणार होते. पण त्यांना आठवण झाली. आपण जेवन करून आलोय म्हणून. ते पलंगावर आरामास बसले व म्हणाले,

"क्षिप्रा झोपली वाटते."

"नाई अजून. वाचत असेल, तोकाय खोलीत्ला लाईट चालूच न हाये."

"बापू रे." उभे राहत ते म्हणाले.

"नाई अंथरून टाक बरं. सकाळी वास्तुशांतीले जायचं हाये. लवकर उठा लागीन."

भटजींचं कुठेही पूजेसाठी जाणं. दिवसभर बाहेर राहाणं. कधी रात्रीचे बाहेर राहिल्याने घरातील सर्व भटजीनंच बघायची. घरात काय लागतं. काय नाही. आठवडी बाजार. कपडेलत्ते. दुधाचे पैसे. किराणा. क्षिप्राच्या शिक्षणाचा खर्च. त्यावाना. आली-गेली पाहुणे, सन-तिवार, ये-जा, सर्व महानंदा भटजीनंच बघायची. परशुराम भटजींना दिवसभर आपली इकडून तिकडे जाऊन पूजा-पाठाचेच कामं पुरत नव्हती. त्यामुळे त्यांचं घरात लक्ष नसायचं. कधी कुठे जायच्या तारखा ते एका डायरीत लिहीत असत. त्यावरून स्वारी सारखी बाहेर असल्याचं लक्षात येई. आलेली दक्षिणा, शिधा, पैका-अडका सर्व घरात आणून बायकोकडे द्यायचे. पुढे आलं ते जेवायचं. कधी कशाची तक्रार नाही. जेवनाबाबत तर कधीच नाही. तसे ते घरी फारसं जेवत नसतं. आजूबाजूला वीस-पंचवीस खेड्यात मिळून परशुराम भटजीच तेवढे पुजारी होते. इतरत्र गावात ब्राह्मणांनी घर कुठेच नव्हती. भटजी होतेही तसेच. बोलायला गोड. धर्माचा प्रचंड अभ्यास धर्मपालनात कट्टेकोर, मृदू भाषेचे, बहुगुणी, भेटलेल्या व्यक्तीस आपलंसं करून घेणारे. रंगानं गोरे. नाकी डोळी नी, उंचेपुरे, सडपातळ. धोतर व डोक्याला उपरणं शिवाजीनी टिळा लेवून भगवी टोपी घालणारे. शांत आणि सभ्य म्हणून त्यांना सर्वच ओळखत असत. कुठे ये-जा करताना कुणीही त्यांना आपल्या वाहनात बसवून नेई. वरून त्यांनाच काही दक्षिणा म्हणून पैसे देत असत. काही धार्मिक लोक त्यांचे दिसेल त्या ठिकाणीच दर्शन घेत असत. जुन्या ओळखीच्या माणसासोबत प्रेमाने बोलून, आपुलकीने ते विचारपूस करीत व चालू लागत. कळवून गेले की, कुणीही आदरानं व आपुलकीनं त्यांचा हसरा चेहरा बघत. त्यांच्या सततच्या देवपूजेमुळे त्यांच्या अंगाला धूप-अगरबत्तीचा गंध येत असे. गल्लीत आजूबाजूचे सन्मानाने त्यांच्याशी वागायचे. ते इतरांशी कधी भांडल्याचं किंवा बायको-मुलीशी भांडून मोठ्या आवाजात बोलल्याचं कुणाच्याही पाहण्यात ऐकण्यात नव्हतं. त्यांची एकुलती एक मुलगी क्षिप्रा. तिच्यावर त्यांचा भारी जीव. घराबाहेर पडताना ते देवापेक्षा तिचा प्रसन्न चेहरा बघणं पसंत करायचे. ती



बी.एस्सीला शिकत होती. तरीही ते तिचा लहान मुलासारखा मुका घेऊनच बाहेर पडत असत. त्यांच्या जाण्याच्या वेळेवर क्षिप्रा लाजीशरमेमुळे दारातून-घरात जाऊन थांबायची. भटजी हे सर्व ओळखूनसुद्धा मुका घेऊनच आपल्या कामावर निघायचे. भटजीनबाई घरकामात व्यस्त असायची.

क्षिप्रा सकाळीच बसस्थानकाकडे तयारी करून निघते. ती अभ्यासात हुशार आहे. तास झाल्यानंतर ती लायब्ररीमध्ये बसत असते. संध्याकाळची घरी येते. तोपर्यंत भटजीन एकटीच घरी तिची वाट बघत असत. कारण भटजींची येण्याची वेळ निश्चित नसल्यानं क्षिप्राच तेवढी या वेळेस येईल, म्हणून ती दारावर बसून असायची. घरात लख्ख प्रकाश. देव्हाऱ्यात दिवा तेवत असताना अगरबत्तीचा मध्यम सुगंध दरवळत राहायचा. घर, कपडे, स्वच्छ व टापटीप असे. तिथं क्षणभर बसावं असं कुणालाही वाटेल. क्षिप्रा घरी आल्यानं शांत वातावरणात एखादा आवाज ऐकू यायचा. अन्यथा पूर्ण दिवस घर खालीच वाटायचं. भटजीन तेवढ्या घरी असायच्या. कधी दळण. कधी इतर काम करीत बसायच्या. कधी आजू-बाजूला बसायला जातात. शक्यतोवर दुपारच्या वेळेस घरीच असायच्या. गावात फेरीवाले फिरतात. त्यात भाजीपाला, भंगारवाले, कटलरीवाले, कपड्यावाले येर-झारा मारतात. कधी काही लागलं तर सर्व दारातच मिळत असल्यानं भटजीनबाईला गावात जाण्याचे कष्ट पडत नाहीत. भटजीन म्हणून फेरीवाले काही उधार-नगद देतात. भटजीनबाई उदारीत घेत नाहीत. त्यांच्याकडेच व्यवहारामुळे पैश्याची रेलचेल असायची. पण तरीही कधी-कधी त्या कटलरीवाल्याकडून मुद्दाम उदार घ्यायच्या. मुलीसाठी लागणारे सौंदर्यप्रसाधने खरेदी करायच्या. त्यातील स्वत:साठीही वापरायच्या. अंगात भरलेल्या. मध्यम बांध्याच्या. टपोर डोळ्यांच्या भटजीनबाई अबोल आहेत. मितभाषी आहेत. चेहऱ्यावर हास्य असायचं. शेजारी मिळून-मिसळून राहायच्या. आपल्या हसऱ्या चेहऱ्यानं त्या कुणाशीही आपुलकीने बोलत असत. फेरीवाले कधी-मधी दारावरून जाताना भटजीनबाईला आवाज देऊन भाजीपाला देत. त्यांच्याशी आपुलकीनं बोलत. त्यातील असाच एक फेरीवाला आगा मुद्दामून दारावरून जात असे. आगा हा कटलरीचा धंदा करणारा गावातील एकमेव होता. तो प्रत्येकाला काहीतरी घेण्याचा आग्रह करीत असे. नवीन एखादी वस्तू आणली की, आपण ठेवून घ्या. पैसे वगैरे नंतर द्या म्हणायचा. कधी-मधी तहान नसताना पाणी मागायचा. भटजीनबाई त्यास हसत-हसत पाणी द्यायच्या. आगा अंतरगावचाच होता. मागील तिसऱ्या गल्लीत विठ्ठल मंदिराच्या मागं त्याचं घर होतं. त्याच्या घरावरून व त्याच्याकडे [illegible] मुसलमान असल्याचं लक्षात येत नव्हतं. त्याचा वावर हिंदूंतच [illegible] झालेला होता. त्याचा

SARASWATI ARTS COLLEGE DAHIHANDA 2881

मिश्रपरिवार हिंदूभाष असल्यानं त्याची भाषा अस्सल मराठी होती. दिसायला साधारण उंचीचा, धारदार नाक, गाजरासारखा रंग, वाढलेल्या केसांचा भपूर भांग, त्या अस्ताव्यस्त केसांनी त्याचा रंग लक्षात येत नव्हता. तो मराठीत ऐकून राहावं असं बोलायचा. दारावरून जात असताना त्याचा आवाज आला की, भटजीनबाई हातचा धंदा सोडून दरवाजात यायच्या. कधी काही घ्यायच्या. तर कधी काही परत करायच्या. आगा मुद्दामून, दुकानदारी म्हणून भटजीनला प्रतिष्ठित पैस्यावाले म्हणून आग्रहानं काही तरी घेण्यास भाग पाडायचा. धंद्यापाण्यासाठी आगा गावातच भरपूर चकरा मारत असायचा. त्याच्या स्वभावामुळे त्याची विक्री व त्याचा व्यवसाय नीट चालत होता. भटजीनला तो आदरपूर्वक भटजीनबाई म्हणत असे.

''ते लागत असीन तुमाले तं घ्या, पैसे तुमच्या हिसोबानं देजा.''

''पन मी सातच रुपये दिन.''

''हो देजा तुमच्यासाठी मी दोन पयस्याकळे पाईन काय?''

''पावूच नोय. आमी तुमचेच त होवो. नेहमीचंच गिराईक''

भटजीन हसतच चालायला लागे. आगा गाडी घेवून पुढे निघायचा. संध्याकाळी क्षिप्राला घेतलेली वस्तू आवडत नसे. म्हणून ती आईला परत करण्यास सांगायची व म्हणायची.

''मी रोज दर्यापूरले जाते. तुले मायाजवळ कायी सांग्याले काय होते.''

''अवं हे उदार घेल हाये. वरून कमी पैस्यात हाये. काय झालं घेतलं म्हनून.'' - भटजीन

''मंग घेत्लं तं घेत्लं रावू दे आता तुलेच.'' - क्षिप्रा

''वाय, म्या ताल्यासाठी घेत्लं. तू नायी म्हनत अस्सीन तं सकाय वापस कर्तो.'' - भटजीन

''तुले काय करायचं ते करं. मले सांगू नोको.'' - क्षिप्रा

मुलीच्या अशा ठाम निर्णयामुळे ती वस्तू परत करावी लागे. तिला खात्री असे. आगा ती वस्तू परत घेईल आणि दुसरी घेण्याचा आग्रहसुद्धा करील. दुसऱ्या दिवसाला ती आगाची वाट बघत असे. भंगारवाला. भाजीपाला यांचे सर्वांचे आवाज तिच्या ओळखीचे असल्याने ती बाहेर सुद्धा येत नसायची. दुपारला संपूर्ण गावातून फेरी मारून आगा पुन्हा त्यांच्या गल्लीत यायचा. तो मुद्दामून आरामात येऊन दारापुढे थांबायचा. भटजीन घाईनं पायऱ्या उतरून म्हणायची.

''आगा हे नाइ पायजे बापा. पोरगी नाई म्हन्ते.''



''पोरगी नाई म्हन्ते तं तुमच्यासाठी देजा.''

''मायासाठी कायले बापा, आताकाय वय हाये माजं.''

''तुमचं वय तरी नाई काय भटजीनबाई. तेयाची पोरगी घोवनर्ं नाई तुमाले तं.''

आगा माल विकण्यासाठी उगीचच उत्साहानं बोलायचा.

भटजीनबाई मनात हसत. ते चेहऱ्यावर दिसू नये म्हणून काळजी घेत.

''पन पोरगी नाई म्हन्ते बापा तं राऊ द्या.''

भटजीनबाईनं उतरले चेहऱ्यावर निर्णय लावल्यानं त्यानं आवरतं घेतलं.

''नाई तं नाई राऊ द्या.''

त्यानं परत घेतलेलं सामान तो ठेवून द्यायचा. मग भटजीनबाई पायऱ्या जड पावलानं चढत घरात निघून जात. आगाही चालू लागायचा. किमान दिवसातून एकदा तो दारावरून जाई. कधी-मधी दोनदा जाई. एखाद्या वेळेला पाणी सुद्धा प्यायचा. खरं तर ते संक्रांतीचे दिवस होते. परंतु तिळसंक्रांत निमित्त वाण एकमेकींना वान देण्यासाठी बारीक-सारीक वस्तू अधिक खरेदी करत असल्यानं त्याच्या चकरा वाढल्या होत्या. म्हणून तो दमून पाणी पीत असावा. क्षिप्राला त्याच्या जवळील वस्तूच नको होत्या; परंतु आई घेत असल्यानं तिचं काही चालत नसे. भटजी दिवसभर आपल्या भिक्षुकीमुळे बाहेर असायचे. दुपारचे काम-धंदे आवरून आईनं गीता वाचावी किंवा टी.व्ही. तरी पाहावा म्हणून ती सांगत असे. संक्रांतीसाठी घेतलेल्या वस्तू तिला आवडल्या नव्हत्या. इतर बायांना देण्यासाठी घेतल्या असाव्यात म्हणून ती काही बोलली नाही. संक्रांतीला भटजी, क्षिप्राला फुरसतीचा दिवस होता. म्हणून ते विठ्ठल मंदिरात सोबतच गेले. क्षिप्रा फारशी मंदिरात जात नव्हती. भटजीही रात्रीला एखादा कार्यक्रम असल्यास, किंवा लवकर घरी आले तरच मंदिरात जायचे. अन्यथा जात नसत. संध्याकाळच्या हरिपाठापर्यंत तर ते घरीच येत नसत. आज अचानक बाप-लेक मंदिरात आले होते. पूजा केली. मंदिराचा परिसर मोठा होता. आवारात झाडं-झुडपं होती. प्रतिष्ठान गाभाऱ्याच्या पुढे मोठा-थाटा सभामंडप होता. बाजूला लागून संस्थानच्या दोन खोल्या होत्या. त्यात कुणीही नसे. त्या कधी-मधी उघड्याही असत. गावातील म्हातारे किंवा लहान पोरं आराम करण्यासाठी, खेळण्यासाठी त्यांचा वापर करीत असत. त्याला लागून वेणू मारवाडीनचा वाडा असल्यानं, त्याची लांबलचक भिंत मंदिराला आयताच आवार झाली होती. त्या भिंतीच्या काठानेच एक लहानसं पोरगं जाईल अशी फट होती. ती फट पुढे दोन घरं ओलांडून मागील बाजूच्या पटांगणात निघत असे. पटांगणाच्या सुरुवातीला लागूनच दोन-चार मुसलमानांची घरं होती. नव्या वस्तीतली ही मुसलमानाची एवढीच घरं. बाकी गावात त्यांची भरपूर वस्ती

होती. गावात कुणबी. तेली. कोळी व मुसलमान बरोबरीत होते. गावात जुनं मंदिर होतं. व नवीन वस्तीवरील विठ्ठल मंदिर तेली असलेल्या शेठजीनं जमीन दान दिल्यानं नव्यानंच झटपट उभं राहिलं होतं. सकाळ-संध्याकाळ तेथे प्रसन्नता वाटायची. भाविकभक्तांची गर्दी असायची. रात्री हरिपाठ व्हायचा. जुन्या गावातूनही भक्तमंडळी येत असत. दुपारी मात्र फारशी वर्दळ नसायची. त्यामुळे मंदिराच्या आवाराचं गेट बंद असायचं. ते उघडल्यास कर्र आवाज यायचा. गेटपासून मंदिराचा गाभारा अंतरावर होता. दोन एकरात हे संस्थान नव्यानं उभं होत होतं. भटजींनी दर्शन घेतलं व क्षिप्रास घरी जाण्यास सांगून ते सभामंडपात आरामास बसले. बाजूला डोळे लावून खांबाजवळ बाबू महाराज नामस्मरण करण्यात गुंग होते. ते वयाने जास्त होते. थकलेले होते. जवळपास दिवसभर मंदिरातच बसून असत. कधी झाडा-झुडपाचं करत असत. दिवा, झाड-लोट तर नेहमीचीच. बाबू महाराजांना भटजी बाजूला बसल्याचे दिसले म्हणून त्यांनी आटोपतं घेतलं व त्यांच्या बाजूला येऊन बसत म्हणाले.

''रामराम भटजीबुवा''

बाबू महाराजांपेक्षा भटजीबुवा वयानं फारच लहान. परंतु ते भटजी असल्यामुळे बाबू महाराज आदरानं बोलले.

''रामराम बाबू महाराज.'' थोडं हसत.

''काय म्हन्ते प्रकृती.''

''आँ काय परकुर्ती. परकुर्ती काय पुस्ता आता.''

पुन्हा गराणे ऐकू नये म्हणून भटजीबुवांनी विषय मोडला व म्हणाले,

''बाकी बरं हाय?''

कधी लहान. कधी मोठ्या. कधी पुन्हा-पुन्हा वाक्य बोलून ते बराच वेळ बोलत राहिले. दोघांत इकडच्या-तिकडच्या खूप गप्पा झाल्या. मंदिराच्या बांधकामाबाबत बोलून झालं. देणगीबाबत झालं. शेवटी बराच वेळानं ते उठत म्हणाले.

''येतो बरं बाबू म्हाराज.'' भटजीच्या चेहऱ्यावर चिंता उमटली. घरी आले तेव्हा पात्रं वाढली होती. हात-पाय धुवून ते सर्व एकत्रच जेवनाला बसले. सनाचा दिवस. जेवतानी भटजी म्हणाले.

''हल्ली जेवनात तिखट-मीट फार अस्ते.''

''नाई एखान्दया वेळी पळलं असीनं.'' भटजीन

''त्यासाटी मन लावून सयपाक करत जा.''

थोडी विश्रांती घेऊन ते म्हणाले -

''हल्ली कामं फार अस्तात तुमच्यामांगं. मंदिरात तं दुपारीच जात अस्ताना.''



भटजीच्या या बोलण्यावर भटजीनबाई दचकल्या. त्यांनी ते दिसू दिलं नाही. स्वत:ला सावरत व खुलासा करण्यासाठी म्हणून त्या म्हणाल्या.

''म्हन्जे. कोनं सांगत्लं दुपारीच पुजा कर्तो म्हनून.''

''कोनी नाई गं बाबू महाराज म्हनत होते.बोलता-बोलता, भटजीनबाई अदून-मदून दुपारीच येतात म्हनून''

''हो रिकामपनात जात अस्तो, कदी-मदी पुजेसाटी.'' - भटजीन

सगळेच जन बोलता-बोलता जास्तच जेवले होते. भटजीनबाई कमी बोलत होत्या. त्या काळजीत पडल्याचं दिसू देत नव्हत्या. तरीही चेहऱ्यावरून थोडं-फार लक्षात येतच होतं. संध्याकाळची भांडी भटजीनबाईनं आवाज न करताच धुवून काढली. सकाळी क्षिप्रा, भटजी आपापल्या कामासाठी म्हणून सूर्योदयाच्या दरम्यान चालू लागली. आज पूर्ण दिवसभर भटजीनबाई फारश्या घरातून बाहेर पडल्या नव्हत्या. कालचा सनाचा दिवस. फेरीवाले तेवढे सकाळीच आले होते. कटलरीचा आवाज आला, पण भटजीन बाहेर आली नाही. दरवाजा सुद्धा बंद होता. ती घरातच बसून होती. आता ती फारशी बाहेर येत नव्हती. घरातच दळण, जुने कपडे, घरकाम, यात स्वत:ला गुंतून असायची. दरवाजा फारसा उघडा नसायचा. फेरीवाल्याकडं फारसं लक्ष देत नसायची. एखाद्या वेळेस कटलरीवरून सामान घ्यायची. तीही फारसा वेळ लागू न देता. जाणं, सामान घेणं, फारसं न्याहाळणं नाही. लगेच घरात येणं. आठवड्यातून एखाद्या वेळेस ती काही-बाही घेत असे. इतर बायांसारखी फेरीवाल्याभोवती वेळ घालवत नसे. आता ऊन तापलेलं असूनही कुणी फेरीवाला तिच्याकडे पाणी पीत नव्हता. आगाचं अधून-मधून पाणी पिणंही बंद झालं होतं. ऊन तापायला लागलं. परीक्षा जवळ यायला लागल्या. क्षिप्रा घरीच असायची. आपल्या खोलीत अभ्यास करत राहायची. घरकाम व आई यांच्याकडे तिचं लक्ष नसे. या काळातच भटजींना अनेकवेळा बाहेर जावं लागायचं. तिथी पाहाण्यास. साखरपुड्यास. घर-वास्तूस. सारखं बाहेर राहून ते रात्रीला येत असतं. आज सोबतीला कुणीतरी त्यांच्यासोबत चालत आलं होतं. त्यानं आजूबाजूच्या गोष्टी सांगितल्या होत्या. भटजीनबाईचा कुठेतरी दिसण्याचा उल्लेख त्या बोलण्यात होता आणि भटजी चिंतेत पडले होते. भटजी घरी आले तेव्हा त्यांची नजर भटजीनबाईवर गेली. ते काहीतरी शोधक नजरेने बघत होते. मनातून खचलेला असल्याचा चेहऱ्यावरचा भाव क्षिप्राकडून ते लपवू शकले नाहीत. क्षिप्राच्या खोलीत जाऊन ते तिच्याशी सहज बोलावं म्हणून बोलले -

''काय, झाला अभ्यास.''

''नाई, चालू हाये, तुमी लय थकेल दिस्ता पप्पा.''

"नाही गं, कुठी हाय."
"जेवण केलं नाई."
"हो मी जेवून आली, [illegible]."
"आज पेपर कसा [illegible] दिसे."
"काई [illegible] नाई, तू आपला अभ्यास चालू दे."
भटजी [illegible] खोलीतून बाहेर आले. आपल्या अंथरुणावर पडले.
भटजी [illegible] लागत नव्हता. ते सारखे इकडून [illegible] लागली. [illegible] दिवस उगवायला लागला तरी ते उठत नव्हते. शिपा [illegible] होती. [illegible] होती. भटजीनबाईनं त्यांना उठवत म्हटलं-
"[illegible] नाई का कुठी."
"हो [illegible] पाणी ठाका."
भटजी [illegible] लागले. भटजीनबाईच्या मनात भीती होती. काय [illegible] होती. भटजीनाही काही बोलावंसं वाटत नव्हतं. [illegible] निरीक्षण करीत होते. सर्व आटोपून भटजी बाहेर [illegible] घरी आले तरी त्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती. [illegible] भटजी थोडेच जेवले. भटजीनबाई आग्रहानं [illegible] असलेला हिरव्या बांगड्यांचा चुडा [illegible] होता. भटजीनबाई त्या बांगड्यात अधिक सुंदर दिसत [illegible] अधिकच उतरला होता. कुठल्याच विषयावर त्यांनी [illegible] एक-दोन दिवस असेच गेले. म्हणून घरातील वातावरणात [illegible] होती. [illegible] शिपाला ती कळली नव्हती. घरातल्या घरात [illegible] म्हणून भटजीनबाईनं हातात थोड्याच बांगड्या ठेवल्या [illegible] काही बांगड्या घरातल्या कपाटात काढून ठेवल्या होत्या. शिपास त्या [illegible] पण वयोवृद्ध आजा-बाबासारख्या दिसतात म्हणून तिनं त्या [illegible] भटजी थोड्या थकल्या चेहऱ्यानंच घरी आले. आज त्यांच्याजवळ फारसं सामान नव्हतं. त्यांनी हात-पाय धुतले. पुसले [illegible] पाणी घेऊन पिले. व घरातून बाहेर निघून गेले. आजच काही न सांगता ते अचानक बाहेर निघून गेले होते. भटजीनबाई जेवणाची तयारी करत होत्या. [illegible] भटजी घरात नाहीत. कुठे गेले असावे म्हणून त्या विचार करू लागल्या. शिपा अभ्यास करत होती. वातावरणात उष्णता होती. अद्याप फार [illegible] झाली नव्हती. परिसर [illegible] झाला होता. आताशी कुठे तरणी मुलं मंदिरा[illegible] ओट्यावर आली होती. त्यांचं आपापसात जोरजोरानं हसणं-बोलणं चालू होतं.



भटजीनबाई भटजींची जेवणासाठी वाट बघत होत्या.

भटजी अधूनमधून कोणत्याही वेळेला दर्शनाला जात असत. आजही ते एवढ्या रात्रीला दर्शनाला आले होते. भटजींनी वर हात करून घंटा वाजवली. दोन्ही हात जोडून ते दर्शनास झुकले. तशी त्यांच्या नाकात सडलेल्या वासाची धमक गेली. त्यांनी हात लावून पाहिलं व तसेच ते बाहेर पळत आले. सभामंडपाच्या बाजूच्या असलेल्या ओट्यावर तरुण पोरं जोरात हसत, बोलत बसली होती. भटजींच्या आवाजावर ते मंदिराच्या सभामंडपात धावत आले.

"काय झालं भटजी"

"अबे, काय झालं म्हन्ता अकीन. अंदर जाऊन पा. तुमचा देव बाटवेलोग तुमी कुटी अस्ता बे?"

पोरांना काही कळत नव्हतं. भटजी काय बोलतात ते समजत नव्हतं. म्हणून लक्ष्मण म्हणाला.

"काय झालं ते तं सांगा पयले."

"अरे अंदर जावून पाय देवापासी."

तसे सगळेच तरुण पोरं धावत जाऊन आत बघू लागली. एकनाथचं लक्ष गेलं. त्यानं मूर्तीच्या पायावरील मासाचा तुकडा उचलला व पोरांना दाखवत म्हणाला.

"हे तं आतळं व्हय, हे कसं आलं अती."

"हे काय खान्दयावरही टाकेल हाये. मटनच होय हे. जाळच्या जाळं."

मूर्तीच्या खांद्यावरील मासाचा तुकडा उचलत पांडूरंग शिव्याही देऊ लागला.

"कोन व्हय रे हा शिनालचा, त्याच्या मायचा तं."

पोरं चिडले होते. त्यांचं रक्त गरम झालं होतं. शरीरं थरथरू लागलं होतं. हे सर्व कुणी केलं हे त्यांना कळत नव्हतं. कळायला मार्गच नव्हता. जो दिसेल त्याला मारावं असं त्यांना वाटत होतं. पोरांची ही अवस्था बघून भटजी म्हणाले.

"हे पा पोट्टेहो, देवावर सळेल मटन टाकलं तं टाकलं, आता तुमी कोनालेही सांगू नोका, मूर्तीवरचं हे बयलाचं मटन काळा अन् द्या फेकून."

भटजीसह सर्वजण मटण गोळा करू लागले. त्या मासाच्या तुकड्यात हिरव्या बांगड्यांचे तुकडेही होते. ते बघून भटजी म्हणाले -

"यात हिरव्या बांगळ्याचे तुकळेही हायेत, हे कटलरीतल्या तं बांगळ्या नोत?"

पांडूरंगनं हिरव्या बांगडीचा तुकडा न्याहाळत म्हटलं -

"बराबर हाये. कटलरीतल्याच बांगळ्या होत, अन् हे आतळेही बयलाच्याच

मटनाचे व्हत, हे काम आग्याचंच व्हय. चला आग्याच्या घरी.''

पांडुरंगच्या या वाक्यावर भटजींना सार्थक झाल्यासारखं वाटलं. भटजीच्या तोंडातला शब्द पांडुरंग बोलला होता.

''चला रे त्याच्या घरी'' म्हणून तरुण पोरांनी मंदिराच्या बाहेर पळ काढला. पोरं रागात होती. आपापल्या घरून हातात काहीतरी घेऊन ते आगाच्या घरी जाऊन त्याला मारतील म्हणून भटजी त्यांच्यामागं येत म्हणाले.-

''अय पोट्टेहो, जाऊ द्या, त्याले मारू-गीरू नोका. त्याइच्यायी घरात सुऱ्या-तलवारी अस्तात बरं.''

अपेक्षेप्रमाणं पोरांचा आणखी जोर वाढला होता. भटजींचं पुढील बोलणं ऐकण्यास कुणीच थांबलं नव्हतं. चार-दोन पोरंच मंदिरात झोपायला यायचे व तेच आता मंदिराच्या बाहेर रागात निघाले होते. आगाच्या घरापुढे जमा झाले तेव्हा ते वीस-पंचवीस झाले होते. गल्लीत कल्ला सुरू झाला. भटजी घराकडे निघाले. तेव्हा गल्लीतील पोरं मंदिराकडे धावत होते. ''काय झालं? - काय झालं?'' म्हणत घरातील बाया-माणसं एकमेकांना विचारू लागले. एक पोरगं धावतच म्हणालं -

''मुसलमान आपल्या लोकाईले मारून रायले रे.''

मागून दुसरा आवाज आला.

''घरात व्हा. जातीचा दंगा सुरू झाला''

भटजींनी घरात जाऊन खिडक्या-दरवाजे लावले. व आत बसून राहिले. खोल विहिरीतून आवाज यावा तसा गावातून आवाज येत होता. जुन्या गावातून मुसलमान-हिंदू धावून आले. दंगा वाढला. मंदिराच्या मागच्या बाजूस मुसलमानाचे असलेले घर जळू लागले. आरडा-ओरड झाली. पोलीस आले. काही इकडची व काही तिकडची मानसं रात्रीच पकडून नेली.

सकाळी सर्वत्र गावात पोलिसांचा पहारा होता. करफ्यू लागला. येणं-जाणं बंद झालं. लोक घाबरले. गावात पोलीस दिसू लागले. धरपकड सुरू झाली. अनेकांना पकडून त्यांच्यावर केसेस टाकल्या.

शेजारची गावनात्यानं येणारी काकू खिडकीतून क्षिप्रास सांगू लागली.

''अवं तो नाई कावं आपल्याकळे कटलरी घेऊन येत जाये तो''

''पन काकू त्यानंच मटण टाकलं कश्यावरून, थो तं तसा नाई दिसे वं'' - क्षिप्रा

''अवं त्या मटनात कटलरीच्या बांगळ्याचे हिरवे बिल्लोरं निगालेना. मंग कोन टाकीन त्याच्यासिवाय.''



''टाकले अस्तीनबाई मुसलमान तसेच अस्तात.'' - क्षिप्रा

''म्हनूनच तं मरतात हराम मौतीनं.''

''तोच मेला कायवं काकू.'' - क्षिप्रा

''मंग काय तं, मेला कायचावं मारला''

भटजीनबाई क्षिप्राच्या मागेच उभ्या होत्या. बोलनं ऐकू यावं अशाच त्या उभ्या राहिल्या होत्या. 'बांगळ्याचे हिरवे बिल्लोरं' ऐकताच त्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. अचानक कसली तरी आठवण झाल्यासारखं भटजीनबाई झटपट आतल्या खोलीत गेल्या, कपाट उघडून काहीतरी शोधू लागल्या. कपाटातल्या काही बांगळ्या कमी होत्या. त्यांनी बाजूच्या बसलेल्या भटजीकडे बघितलं. भटजी नजर चुकवून शून्य नजरेनं बाजूला बघत होते. तापलेलं वातावरण एक-दोन दिवस होतं. कदाचित पोलीस बंदोबस्त उठवला तर कधीही पुन्हा जातीय दंगा उसळू शकत होता. तो टाळण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी दोन्ही समाजातील प्रतिष्ठित माणसं बोलावून समाझोता घडवून आणण्याचा प्रयत्न चालू केला. त्यासाठी तयारी झाली. दंग्याची बातमी वर्तमानपत्रातून आधीच प्रकाशित झाली होती. जीवित व इतर हानी झाली नसल्याचं लिहिलं होतं. धार्मिक मंडळाकडून काही समजदार, प्रतिष्ठित माणसं जमणार होते. त्यात भटजींना बोलावलं होतं. भटजींनी जाण्याची तयारी केली. तेंव्हा क्षिप्रा म्हणाली -

''जाऊ नका पप्पा, दंगा होईन अजून.''

''नाई गं आता दंगा कश्यासाठी. मी तं समजोता करन्यासाठी चाल्लो.''

भटजी प्रसन्न मनानं घराबाहेर येऊन समझोता करण्यासाठी चालू लागले.



2881

# हाल्डं

यादुवा पायताणचा डोंगर चढला तेव्हा सूर्यानं पाठ फिरवली होती. घसा कोरडा झाला होता. चेहरा घामानं डबडबला होता. पायावर ओरखडे उमटले होते. पायताणच्या पायथ्याशी अंबाझरी. अंबाझरी पायताणच्या डोंगरावरून स्पष्ट दिसत होती. यादुवा माथ्यावर आला तशी त्यांची नजर गावावरून फिरू लागली. माथ्यावरून गावाकडे उतरताना शंक्रा म्हणाला,

''यादू ओ आया तू पाटीलना घर दाती ली जावा नको द, पटलो मन पैस्या देई कानी, आया तून बुलाव कर पटेलो.''

काखेतील शिकारीला सावरत यादुवा म्हणाला.

''मारे बट्टेर तितर पाटील पुराम ली नकोजा, भोईन येच, नको तं देवळीने येच वा नं.''

शंक्रा गंगारामला खूप दिवसांपासून ओळखत होता. त्याचा भाऊ लावा मरण पावला, तसा तो पुतण्या यादुवाला रोज शिकारीला सोबत न्यायचा. बापजाद्यांनी गायरान काढलेली शेती काही गुंठेच होती. ती त्यानं भावजय चेत्रईला पूर्ण दिली होती. त्यावर त्यांची शिकारीसोबत भाकरी भागत होती. अधून-मधून त्याचं व चेत्रईचं बायकोच्या चुगल्यापायी भांडणही व्हायचं. कधी-मधी तो दारू पिऊन सर्वांना शिव्या द्यायचा. त्यात चेत्रईसोबत यादुवाही सुटत नसे. पण रात्र उजाडली की तोही उजाळत असे.

''यादु हाल्डं चाल'' म्हटले की यादुही तयार असायचा. याची बऱ्याच दिवसांपासून सवय झाली होती. यादुवा शिकारीमागे जाऊन खूप दमायचा. तेव्हा चेत्रई शिकार घेऊन गावात फिरायची. गंगाराम रोज हमखास शिकार घ्यायचा. भावजयीची चूल पेटावी म्हणून शंक्रा ते गिऱ्हाईकं करत नसे. त्याला गिऱ्हाईक मिळालं नाही तरी तो भागून घ्यायचा. पण भावजय चेत्रई व यादु यांच्यासाठी काही घरं सोडायचा. कित्येक दिवसांपासून यादुला गंगाराम पैसे न देता शिकार घ्यायचा. व ''चेत्रइले पैश्यासाठी धाळून दे'' म्हणायचा... गंगारामचे लक्षण ठीक नव्हते. हे लक्षात आल्यामुळे शंक्रा यादुवाकडे बोलला. यादुवाला प्रकरण कळलं नाही, म्हणून त्यानं हो ला हो लावून दिलं. दोघंही डोंगरावरून खाली आले. मिर्झापुरीच्या वाटेनं चालू लागले. पांदन वाटेच्या खालून ओढा होता. तेथे बना दारू काढत असे. रोज त्यांची वाटेत भेट व्हायची. आज बना दिसला नाही म्हणून शंक्रा बुचकला...

''बना दारू पिईन सीनसुतो यादु''

''योसु एकलोच दारू पिईन पुरो रोड घेरीली दो''

बना त्याइचा भावबंद. दारूवर ओली-सुकी खायचा. भरपूर दारू असली की त्याला कसलीही काळजी वाटायची नाही. इतरांना दारू पैश्यानं. भावकितल्यांना उधार द्यायचा. सगळी दारू विकून झाली की, शेवटी काही प्यायचा व भावकीतल्यांना उधारीच्या कारणावरून शिव्या द्यायचा. हा नित्यक्रम सर्वांना ठाऊक होता. पण तो आज दारूची तवली घेऊन जातांनीच डुलत होता. आज त्यानं अगोदरच पिऊन घेतली होती. चुलत्याच्या नात्यानं आईच्यावर शिवी देऊन शंक्रा बनाला म्हणाला

''दोरू कोनी आच्छी लागच, का अमृत फेलचं''

लांब वेडेवाकडे ओठ करून बनाने मागे पाहिले.

''शेंक्रा तारी आयना पटन चं, चाल आपून दारू पिन देखे, पयशे किनं होनू, पैस्याल मारा कित्रा दारू पियानं''

हात धरून आग्रहानं त्यानं शंक्राला खाली बसवलं. मग दोघेही दारूनं डच भरून उठले व गावाकडे निघाले. शंक्रा व यादु घरी न येताच तिकडच्या तिकडून शिकार विकायला गावात घुसले. शंक्रा भोईपुऱ्याकडे निघाला. ''यादु तू पटेल्याना घर जा.'' शंक्रा निघाला. यादु पाठमोऱ्या शंक्राकडं बघत होता. तो नजरेआड गेल्यावर यादु चालू लागला. यादुला पूर्ण आठवत होतं. गंगाराम शिकार घेणार पण पैसे देणार नाही. मायला जाऊन आणावे लागतील. नाहीतर गंगाराम मायकडे घरी पैसे आणून देणार. दोघंही पूर्ण अंबाझरी फिरून पारधी वस्तीत आले. शंक्राच्या व यादुच्या काही शिकारी विकल्या होत्या. दोघंही दाराजवळ आली होती. गंगाराम यादुच्या दारी पाहून शंक्रानं गंगारामला 'रामराम' केला व तो त्याच्या घरात निघून गेला. गंगाराम आपली शिकार घेणार नाही व त्याने यादुचीच शिकार घ्यावी म्हणून त्यालाही वाटत होतं. पण गंगाराम घरी आल्याबद्दल त्याला दोन-चार आई-बहिणीवरून खरपूस शिव्या द्याव्या असं त्याच्या मनात आलं. मनातला राग मनातच दाबून तो गप्प राहिला. गंगारामचं येनं - जानं तो जाणून होता.

'काय यादु आमी कोनाची वाट बघत नाई, पन शिकार मात्र हुकू देत नाई'

गंगारामचं बोलणं पूर्ण व्हायच्या आत यादुनं शिकार काढून देली. गंगारामनं
गंगारामचं बोलणं पूर्ण व्हायच्या आत यादुनं शिकार काढून देली. गंगारामनं
टाक घेत यादुच्या घरात पाहिलं व चेत्रइले देईन पयसे'' असं म्हणून चालू
लागला. यादुला आता गंगारामच्या नजरेत भलतंच काही दिसलं होतं. जाणाऱ्या
गंगारामकडे तो उभा यून बघत राहिला. गंगाराम गेल्यावर चेत्रई घरातून बाहेर आली.
'पटेल्यानं सीन, दी दी शिकार, पैला पैस्याद, तिना बाद तितर बटेर देजो,
'पटेल्यानं सीन, दी दी शिकार, पैला पैस्याद, तिना बाद तितर बटेर देजो,
तारो पटेलो तारा घरनो लकपती, तूच जाय पटेल्याना घर पैस्या मांगवान'
तारो पटेलो तारा घरनो लकपती, तूच जाय पटेल्याना घर पैस्या मांगवान'
यादुने उरलेल्या शिकार चेत्रईकडे देऊन तो जागीच खाली बसला. जागा
यादुने उरलेल्या शिकार चेत्रईकडे देऊन तो जागीच खाली बसला. जागा
गरम होती. तरीही त्यानं अंधारातच पाय लांब करून जमिनीवर अंग टाकलं. तो
खूप थकला होता. त्याला जोराची तहान लागली होती. तरीही उठायचं जीवावर
आल्यानं तो पडून होता. रात्री अंधारकुट्ट झाल्यावर पारधी वस्तीत दारीच चुली
पेटल्या होत्या. चेत्रईनं शिकारच भाजली. त्याचा खरपूस वास येत होता. बाजरीच्या
भाकरी केल्या. चुलीपाशी बसल्या-बसल्याच तिनं जेऊन घेतलं. मातीच्या भरन्यात
पाणी घेऊन ''रोटलो खावान आवं यादुज्या'' म्हणत तिनं यादुला उठवलं.
यादुवाला चेत्रई लाडानं यादुजा म्हणायची. यादुजा उठला शिकारीसोबतच काळी
बाजऱ्याची भाकर अंधारासारखी तो खाऊ लागला. मध्यरात्र होत होती. तरीही
चेत्रई पैस्याला येईल म्हणून गंगाराम वाट पाहात होता. शिकार जेऊनही गंगारामला
पोट भरल्यासारखं वाटत नव्हतं.
चेत्रई पैस्याले येईल म्हणून तो सारखा वाटेकडं बघत होता. रात्र होत होती.
चेत्रई पैस्याले येईल म्हणून तो सारखा वाटेकडं बघत होता. रात्र होत होती.
माणूस तुरळक होत होता. यातच चेत्रईनं पैस्याले यावं म्हणून गंगारामला वाटत
होतं. पण रात्र वाढत जाऊनही चेत्रई येत नाही आणि येणारही नाही. या विचारानं
चेत्रई त्याच्या डोळ्यांपुढून तरळून गेली. काही वेळ गंगारामचं मन झुरू लागलं.
मध्यरात्र उलटली तरी गंगाराम इकडून तिकडे येरझारा मारत होता.
मध्यरात्र उलटली तरी गंगाराम इकडून तिकडे येरझारा मारत होता.
पूर्वेकडून उजळू लागलं होतं. चांदण्या झपाट्यानं दिसेनाशा होत होत्या.
पूर्वेकडून उजळू लागलं होतं. चांदण्या झपाट्यानं दिसेनाशा होत होत्या.
रात्रीचा अंधार जाऊन कातरवेळ होऊ लागली होती. पायताणचा डोंगर अंधु
दिसत होता. त्याच्या आड मंद विस्तवासारखं दिसत होतं. गावातील आवतं-वग
काही रस्त्यानं शेताकडं निघाली, काही कामाला लागली. कुंभाराची गधे सुद
फिरत होती. काही जोरजोरानं ओरडत होती. भोयाच्या घरच्या रेडिओवर सकाळ
भक्तिगीतं सुरू होती. बऱ्याची दारू अजूनही उतरली नव्हती. तो उठता-उठता
काहीबाही बडबडत होता म्हणून त्याची बायको त्याला जोरजोरात शिव्या दे
देतच घरातून कोंबड्या बाहेर हाणत होती. कोंबड्या उडतच विष्ठा मागं टाक
होत्या. काही चेत्रईच्या दारातील खतावर आल्या. त्या आवाजानं चेत्रईला जा
आली. दरवाजाच्या आडचा दगड काढत तिनं ''यादुजा आरे उट हाल्दं जा



लाग्यो'' म्हटलं. यादुनं डोळे उघडले.

''आज कोनी जावो हाल्दं मारा गोळा दुकु करं'' यादुनं म्हटलं खरी, पण रोजच्याप्रमाणं आजही चेत्रईनं शिव्या द्यायच्या अगोदर तो उठला. यादु बाहेर आला. चेत्रई काळ्या राखोंडीनं दात घासत म्हणाली.

''शेंक्रया मिर्झो रस्तान जावा लाग्यो''

तिनं त्याला शिकारीचे जाये देले. एक ईवा देला. ते घेऊन तो रस्त्यानं निघाला.

आपले संपूर्ण विधी तिकडेच आटोपून घ्यावेत. अशा विचारात शिकारीसाठी तो निघाला. तो पायतानच्या डोंगराकडे मिर्झापूर रस्त्याच्या पांदत्र चालला. रस्त्याच्या मध्येच काही बाया डोक्यावर भाकरी-भरणी घेऊन चालल्या होत्या. तो पायतान डोंगरावर चढला तेव्हा सूर्य वर आला होता. चेत्रईलाही शेतात काड्याकणासाठी जाण्याची घाई होती. तोंड धुवायला पाणी आणण्यासाठी म्हणून ती घरात गेली. शेतात न्यायचं पाण्याचं भरणं तिनं तोंड धुण्यासाठी घेतलं. आतून बाहेर येतांना अचानक दरवाजा झाकला. घरात अंधार पडला. भीतिदायक नजरेनं चेत्रईनं पाहिलं. तसं तिचं हृदय धडकन उडलं व छातीपाशी धडधड सुरू झाली. गंगाराम दरवाजात पाहून तिला घटनेचा अर्थ कळला. एवढ्या सकाळी गंगारामचं येनं त्याच्या डोळ्यांकडे पाहूनच तिला समजलं. दोन डगा पुढे टाकून तिला गंगारामचा फास तोडायचा होता. पण भीतीनं दोन पावलं आपण कधी मागं टाकले व हातचं भरणं कधी गळून खाली पडलं हे तिलाही कळलं नाही. मागं भिंत लागली तेव्हा ती थांबली. गंगाराम सरळ नजरेत मादकता आणून तिच्याकडे निघाला. गंगारामच्या हातून निसटण्यासाठी म्हणून तिनं धवसीनं दरवाजाकडे धाव घेतली. तसं गंगारामनं तिले अडवण्याच्या गडबडीत चेत्रईची एका खांद्यावरची झांपराची बाथी फाटली. तरीही गंगारामच्या दुसऱ्या हातात लुगड्याचं एक टोक लागलं होतं. चेत्रई जातीची पारधीन. शीलवान. मरणापेक्षा अब्रू, शील सांभाळणारी. धिप्पाड गंगारामला लोटून ती एका खांद्यावर लटकलेलं झांपर व लुगडं फरफटत घेऊन बाहेर धावली. ओरडत धावणाऱ्या पारधीनकडे शेतात जाणाऱ्या बाजूच्या रस्त्यावरच्या भोई-माळ्याच्या बाया बघू लागल्या. चेत्रई तशीच धावत निघाली. तसा गंगारामही पाठलाग करत मागे धावत आला. चेत्रई पुढे धावतच कुंभारानं गधे बांधण्यासाठी टाकलेल्यां शेडात, पाहाणाऱ्यांच्या नजरेपासून अघड अंग लपवण्यासाठी व स्वत:ला वाचवण्यासाठी गेली. तसा गंगारामही पाठलाग करीतच होता. चेत्रई आरडत होती. आवाजावरून जमा झालेले गावकरी बघत होते. कुणीही पुढे येण्यास धजत नव्हतं. गंगारामला सर्वजण चांगले ओळखून होते. हे त्याचं पहिलंच प्रकरण नव्हतं. पैशाच्या ऊर्मीमध्ये त्यानं असे अनेक कारनामे केलेले

होते. मधात बोलणाऱ्याचा सूडही घेतलेला होता. म्हणून कुणीही चेत्रईच्या ओरडण्याला ओ देत नव्हतं. गंगारामचा सूड आणि मनूनीती सर्व गावाला परिचित होती.

गंगारामला शिकार लागली होती. चेत्रई फाश्यात अडकली होती. तशी गंगारामला शिकारीची सवय जुनीच. शिकारीचा घास घेऊन गंगाराम निघून गेल्यावर बायांनी शेतात जाणं थांबवून, शेडातून चेत्रईला बाहेर काढलं. अंग गुंडाळून घेतलं. चेत्रईचे अर्धे डोळे लागलेले होते. केस विस्कळीत झालेले होते. काळे तोंड धुण्यासाठी पाणी आणावयास घरात गेलेल्या चेत्रईचं आता कुठल्याही पाण्यानं तोंड धुतलं तरी तिचं काळं झालेलं तोंड निघणारं नव्हतं. कुणीतरी पायतान उतरून दुपारी शंक्राला व याद्रुला जाऊन निरोप दिला. याद्रुवा शिव्या देत रडत होता. शिकारीला गेलेले सर्व पारधी घरी परत आले होते. शंक्रा दारू पिवून चिढून काही तरी बडबडत होता. दुपारपासून आपल्याकडे पाहून रडणाऱ्या आपल्या मुलाला चेत्रई 'रो नोको' म्हणू शकली नाही. याद्रुवा रडतच होता. चेत्रईचा अजूनही रडण्याइतका शोक उतरला नव्हता. ती सरळ पतन न लवता एकटक बघत होती. लोकं बघून आपापल्या घरी निघून जायची. शंक्रा अस्वस्थ घरात पडून होता.

दिवस मावळला. सर्वत्र अंधार झाला. आज अंधार जास्तच दिसत होता. पारधी पुऱ्यात चुली पेटल्या नाहीत. इतर पारध्यांनी रोजच्या सारखी दारू पिऊन आरडा-ओरडा केली नाही. चेत्रईच्या घरात अंधारच होता. तिच्या डोळ्यांतलं पाणी संपत आलं होतं व ती अद्यापही एकटक सारखी बघतच होती. याद्रुवाही पडूनच होता. आज तो थकला नव्हता. त्याला जेवणाची आठवण झाली नाही. रात्री केव्हा तरी सकाळच्या दरम्यान त्याचा डोळा लागला होता. झाकटीतच पारधीपुऱ्यात आरडा-ओरड सुरू झाली. सगळे पारधी उठले. बना, शंक्रा व त्यांचे भाऊबंद गोळा झाले. आरडाओरडीनं याद्रुवा उठला. याद्रुवाला चेत्रई घरात दिसली नाही. म्हणून तो धावत सुटला. चेत्रईचा देह निंबाच्या झाडाला लटकलेला होता. मायच्या लटकलेल्या लाशीला बघून याद्रुवाने टाहो फोडला. याद्रुवाच्या टाहोनं सकाळ पेटली. शंक्रा धावतच घरी गेला. घरातून शिकार तोडायचा सतू घेवून तो गंगारामच्या घराकडे धावत सुटला. "हान्या पटेलानं आपून कोनी बचवा दिये, हान्या माऱ्या वाचून छोळे कोनी." तसा बनाही कुऱ्हाड घेऊन धावत निघाला. सर्व पारधी पुऱ्यातील तरणी-म्हातारी, बाया-माणसं, गडी-लेकरं हातात जे सापडेल ते घेऊन गंगारामच्या घराकडे धावत सुटले. त्यात याद्रुवाची गती बेभान होती.



# हरिपाठ

मृगनक्षत्रात भरपूर पाऊस आला. ऊन खात असलेली जमीन पेरण्यालायक झाली. जमिनीतल्या बुडया बुजल्या गेल्या. जांभूळ वाया सुरू झाल्या. कामाची धांदल वाढली. शेतकरी बी-बियाणं आणू लागले. सुताराकडे गर्दी झाली. बेकार हातांनी कामं सुरू केली. कोणी घरं फेरू लागले. गावातील बाया-माणसं शेतातच दिसू लागली. ओलगट काळेफनं धुपू लागली. सगळीकडे धुपटच धुपट दिसू लागला. आठवडी बाजारही जोरात भरू लागला. मजुरीच्या पैशात खरेदी वाढू लागली. गरीब शेतकरी कर्ज काढून पेरणीची तयारी करू लागले. लेकरांच्या शाळा सुरू झाल्याने ते आई-बापाकडे शाळेचे कपडे व पुस्तकासाठी तगादा लावू लागले. मध्येच प्रचंड ढग गोळा व्हायचे. पाऊस बरसू लागे. लोकांनी पेरणी सुरू केली. आख्खं गाव वावरात दिसत असे. लहान मुलं किंवा एखादं म्हातारं तेवढं गावात सापडे.

दहावी-बारावीचा निकाल अजून लागायचा होता. मुलं निकालाची वाट बघत होती. अधून-मधून निकालाच्या तारखा पेपरात, टी.व्हीवर रेडिओवरून कळत असत. गावातील बरीच पोरं-पोरी शेजारच्या गावात शाळेत होती. गावात केवळ सातवीपर्यंतच शाळा असल्यानं ती शेजारच्या पिंजर या गावी जायची. हे गाव म्हणजे बाजारपेठेचं गाव. शाळा, बँक, आठवडी बाजार, शेजारच्या दहा-वीस गावचा व्यवहार चालणारं गाव होतं. तिथल्या शाळेत दहावीच्या निकालानंतर गर्दी होणार होती.

उद्या निकाल लागणार असल्याने अथर्व सकाळीच पेपरसाठी गावात फिरून आला. दहावीची सगळीच लेकरं चिंतेत होती. पेपरमधून आपला नंबर छापून यावा म्हणून मनातल्या मनात देवाची आराधना करीत होती. गावात पेरण्यांची आणि निकालाची एकच धांदल उडाली. पेपरची वाट बघूनही तालुक्यातून पेपर गावात पोहोचला नाही. पेरणे निघाले तसे लेकरांनाही पेरण्यास जावे लागले.



2881

अथर्व अर्धमनानेच पेरण्याचं सामान बंडीत टाकून गडी-माणसं काढू लाग
सगळी जनं वावरात जमून पेरण्यास सुरुवात झाली. अथर्वचं फारसं लक्ष पेरण्या
लागत नव्हतं. तो सारखा रस्त्याकडे बघायचा.

बायांची एक वठी पडली. दुसऱ्या वठीला सुरुवात झाली. खूप वेळेपासू
वाट पाहात असलेल्या अथर्वला बंधाऱ्यावरून शेतात येत असलेला धम्मपा
दिसला. तसं त्यानं औत थांबवून येणाऱ्या धम्मपालला हाक मारली.

"पवत येनं रे धम्म्या, इतका उसीर अस्ते का लेका?"

असे म्हणतच तो अधीरतेनं दोनचार डगा चालूनही गेला.

धम्मपाल आनंदाने पळत येत होता. तो पिंजरला जाऊन पेपर घेऊन आल
होता. अथर्व नि तो एकाच वर्गात होता. आणि दोस्तही होते. अथर्वनं पैसे देऊ
त्याला पेपरसाठी पाठवलं होतं. धम्मपाल हा गावातील बुद्धाचा पोरगा. हातमजु
करून शाळा शिकणारा; परंतु आज निकालामुळे तो कामाला गेला नाही. सकाळी
पेपरसाठी तो पिंजरला गेला होता. आपला नि गावातील पोरांचा निकाल त्याला
प्रथम समजला होता. पेपर घेऊन तो पळत येत होता. जवळ आला तसा त्या
वेग वाढला व तो अथर्वच्या अंगावर उडी मारत म्हणाला.

"अबे साऱ्या गावात तू फस्ट आला! ये देख मेरे दोस्त!"

त्यानं पेपरातील नंबराखाली रेष मारलेला नंबर दाखवला. अथर्वनं तो डो
भरून बघितला. पुढील आकड्याची बेरीज करीत तो म्हणाला.

"किती टक्के होतात रे?"

"सत्तर टक्के बाबू, सत्तर टक्के"

"अरे वा, अन् तुले रे"

"साठ टक्के. पन अपने हिसाबसे ये बहोत हो गये."

"हो गळ्या, बस झाले!"

म्हणत अथर्वनं अन् धम्मपालनं एकमेकांना मिठी मारली. दोघेही उड्या म
लागले. पेरणाऱ्यांनी पेरणं थांबवलं होतं. सारेच आनंदानं त्यांच्याकडे बघत हो
पेरण्यावरची देवकी आनंदून म्हणाली.

"काय मामाजी, अथर्व येवळ्या टक्क्यानं पास झाले, काई पेढेबिढे
आना लागत होते!"

पेरण्यामागं असणारे ओंकारराव पाटील हसत म्हणाले,

"पेढेगिळे आता संध्याकाई. अथर्व पाटील पयसे घेजा, अन् पिंजरला
किलोभर पेढे आन्जा, अन् गावात वाटजा"

"हो हो!"



ओंकारराव पाटलांची छाती फुगली होती. एकुलंत एक पोरगं मॅट्रिक पास झालं. तेही गावातून सर्वांत जास्त मार्कानं. त्याच्यासाठी ते कितीही खर्च लावायला तयार होते. सर्व जमीन ईकून पैसा लावावा लागला तरी चालेल, पण पोरगं शिकवावं, मोठ्या नौकरीवर लावावं. जमिनीत ठेवून त्याची माती होऊ नये. त्यासाठी ते अर्थववर कितीही पैसे खर्च करण्यास तयार असत. आता तर नुसती पेढे वाटण्याची गोठ होती. तेही देवकी कोळीनं म्हटल्यावर तर ते कुठूनही पेढे आणायला लावतील आणि देवकी कोळीनच्या घरी जाण्याचा एक बहाणा धुंडतील. पेरण्यावरच्या सर्वांनाच माहीत होतं. देवकिनं म्हटल्याप्रमाणं पेढे वाटल्या जातील. तिच्या म्हटल्याप्रमाणं पेरणं सुरू किंवा बंदही होईल. पेरण्याची दोनचार मुळ्ळणं होईस्तोवर धम्मपाल अथर्वसोबत फिरत होता. गप्पा चालू होत्या. कोण पास झालं. कोण नापास झालं. याची जोरजोरात चर्चा चालली होती.

"कारे आदित्याले किती पळ्ळे म्हटलं?" अथर्व

"अबे पन्नास टक्के फक्त"

"का रे घेनं म्हना भल्ला हुशारकी दाखवे"

आपण पास झाल्यानं पुढे काय करू. सारखे नाव टाकू, सकाय मार्कलिस्ट आन्याले जावू. इ. गप्पा होऊन झाल्या. धम्मपाल काही मुळ्ळणं फिरला अन् शेवटी घरी निघून आला. संध्याकाळी पेरणे सुटू लागले. काही तासं दिसेपर्यंत चालूच होते. काहींची वावरं पेरून झाल्यानं रस्त्यानं लागले होते. काही घरी पोहोचले. गावात धुपटाच्या धुरानं अंधार अधिक दिसू लागला. गावालगतच्या डाबरीत धुराची रेष उमटली होती. दिवे लागले. पास झालेली पोरं गोळक्यानं ओरडत गावातील मंदिरात दर्शनाला हिंडू लागली. हनुमानाच्या मंदिरात पोरांसोबत धम्मपालची अथर्वसोबत पुन्हा भेट झाली. उड्या झाल्या. मोठ्या आवाजात सर्वांच्या गप्पा झाल्या.

"का रे आदित्या नाई दिसत पाया लाग्याले." अथर्व

"येत नस्ते तो" दुसरा

"कईस नस्ते येत, का आजस नाई आला फक्त." अथर्व

"कईस नस्ते येत, अभ्यासच करत अस्ते" दुसरा

"तरीतं पन्नासच टक्के भेटतात बे." अथर्व.

सगळेच हसले.

अंधार वाढल्यानं मंदिरातील दिवे भडक झाले. पोरं गप्पा करत होते. तिकडून भाऊ आल्यानं काही पोरं मंदिरात जायला लागले.

जाता जाता अथर्व धम्मपालला म्हणाला.

"तू जाय आता, सकाय पायटीच तयार रायजो"
"तू काय करतं" धम्मपाल "मी हरिपाठाले बस्तो"
"मी बसू काय आज्च्या रोज?"
"नाई सेका, भाऊ मले बोलतीन"
"बरं जाऊ दे, सकाय पायटी भेटू"

दोघेही आपापल्या दिशेनं निघाले. मंदिराची गल्ली सोडून धम्मपाल कुणबीपुऱ्याच्या रस्त्यानं चालू लागला. खांब्यावरील लाईटात लख्ख प्रकाश होता. सारा रस्ता उजेडानं भरला होता. पुढे कोळीपुऱ्यातून तो बौद्धपुऱ्याकडे निघाला. रस्त्यावरील दगडाची त्याला ठोकर लागली. खांब्यावर लाईन नव्हता. सर्वत्र अंधार होता. कुठे खड्डा अन् कुठे दगड-धोंडे. बारीक डोळे करून तो न्याहाळत, प्रसन्न मनानं घराकडे चालू लागला. घराघरांत स्वयंपाक चालू होता. चुली पेटल्या होत्या. कुणी रस्त्यानं सामानसुमानाची ने-आण करत होतं. गाव गजबजून होतं. आजूबाजूचे आवाज येत होते. हरिपाठातील अथर्वचा आवाज कानावर पडत होता. तो अथर्वचा असल्याचं लक्षात येई. हरिपाठामुळे गावात प्रसन्नता वाटे. सर्वत्र गाव निजलं नाई. गोड आवाजात होणारा हरिपाठ रात्री खूप वेळेपर्यंत चालू राहायचा. एखादेवेळी गावातील कुणी मरण पावल्यास त्या दिवसाला हरिपाठाचा आवाज बंद असायचा.

परीक्षेचे निकाल सर्वत्र लागून झाले. नाव दाखल करायची गडबड सुरू होती. शेतातील पेरणीही आटोपत आली होती. लहान-सहान अंकूर वर येऊ लागले. कुणी कुठे नाव दाखल केल्याची वार्ता गावात पसरत होती. धम्मपाल शिकण्यासाठी औरंगाबादला गेला होता. आदित्य अमरावतीला विज्ञान शाखेत नाव टाकण्यासाठी गेला होता, अथर्व अजून कुठेच गेला नव्हता. बाजूच्या पिंजरला कलाशाखेत शिकण्यासाठी त्याचं मन तयार होत नव्हतं, म्हणून त्यानं अजूनही नाव दाखल केलं नव्हतं. अथर्वने आपल्या वडिलांस अमरावतीला जाऊन विज्ञानशाखेत शिक्षण घ्यायची इच्छा बोलून दाखवली होती; परंतु ओंकारराव पाटलांनी ती धुडकावून लावली. त्यामुळे तो नाराजीत घरीच अस्वस्थ बसून होता. अथर्वची नाराजी त्यांना कळली होती. ओंकारराव पाटील कामाच्या गडी-मानसाकडे जात होते. रस्त्यानं सेवकरामभाऊ येत होते. समोरा-समोर भेट झाली म्हणून ओंकारराव म्हणाले,

"सेवकरामभाऊ, आदित्यले कोन्या शाळेत टाकलं?"
"टाकलं नाई आजून, पिंजरलेच टाकायचा ईचार हाये"
"आमचा अथर्व म्हने का, अमरावतीले टाकलं म्हनून"



"कुटी हो पाटील, अमरावतीले रुम करून रा लागते, कुनाच्या भरवश्यावर ठेवता तथी. भंटोलपना करतीन लेकाचे. त्यापेक्षा आपल्यापासीच बरं. घरच्या भाकरीवर होते"

"मीही थेच म्हनून रायलो पोट्याले, आयकू नाई रायलं लेकाचं, नाईतन म्हन्ते औरंगाबादले जावू द्या, शिक्याले"

"नाई हो, औरंगाबादले फक्त दलितासाठीच शाळा हायेत काळेल, आपल्यासाठी थोडीच हाये?"

"सांगा बाँ, पोट्टं लेकाचं आयकुनच नाई रायलं"

"पिंजरले जा अन् नाव टाकून या, त्याचं काय आईकता. लेक्राची जात हाये"

"तससच करतो मंग"

"तससच करा, अथर्व हुशार हाये, आमच्या काट्यासारखं हाये काय. अथर्व काय हरिपाठ म्हन्ते राज्या ओंकारराव पाटील. साऱ्या गावात चांगला. मी म्हन्तो येनाऱ्या कार्तिकात त्याले आपून आळंदीले पाटवू, कीर्तनाच्या प्रशिक्षनाले, पायजे तं मी खर्च लावतो, पन त्याले आळंदीला पाठवाच"

ओंकारराव मनातल्या मनात खुश झाले. तोंडावरील हास्य त्यांना लपवता आलं नाही. हसतच ते म्हणाले.

"आ, काय म्हन्ता. खरंच काय!"

"खरंच पाटील, यावर आपून मंग बोलूच, आता कामाची गडबड हाये"

"बरं बरं"

सेवकरामभाऊनी केलेली स्तुती ओंकारराव पाटलाच्या मनात घोळत होती. दोघही रस्त्यानं चालते झाले. अथर्वला आता पिंजरलाच टाकायचं म्हणून ओंकारराव पाटलांनी मनात पक्कं केलं. दुसऱ्या दिवशी ते अथर्वला घेऊन पिंजरला गेले. नाव टाकलं. नवे कपडे अन् पुस्तकं आपून अकोल्यावरून आणू म्हणून अथर्वला हरकून दिलं. दोघही घरी आले. अकरावीच्या वर्षात शाळेत फारशी जाण्याची गरज नसते. गेलं तरी मास्तर शिकवतही नाहीत. म्हणून अथर्व घरचा, शेतीचा सर्व कामधंदा बघायचा. कधी गडी माणसामागं, कधी खतपाणी आणणं, कधी जनावरांचं शेणपाणी करणं यात तो रमून जात असे.

संध्याकाळ झाली की नेमानं हातपाय धुवून, तो मंदिरात हरिपाठासाठी बसायचा. सेवकरामभाऊ कुलकर्णी दरवाजाच्या बाजूला वीणा घेऊन उभे असायचे. गावातून सर्वप्रथम अथर्वच तयारीनं यायचा. वीणेकऱ्याचं दर्शन घेऊन एक-एक जण हरिपाठाला बसायचा. माईकच्या समोरच अथर्व पुस्तक घेऊन टाळ वाजवत,

आपल्या गोड आवाजात एकेक रचना म्हणायचा. त्याचा आवाज मधुर होता. ''पांडुरंग वर्दे'' आवाज निघाला, की गावात प्रसन्नता नांदायची. हरिपाठाचा आवाज सर्वत्र गावभर पसरायचा. लोकं आपापल्या घरातून ऐकायची. रात्र जस-जशी पुढे जायची तस-तशी हरिपाठाची मधुरता वाढायची. ''जय जय राम क्रिस्न हंsss'' ह्या गजरानं सर्व गाव मंत्रमुग्ध व्हायचं. मध्येच कधीतरी पाऊस येऊन जायचा. त्या तल्लीनतेत पावसाला सुरुवात व्हायची ते सुद्धा कळत नव्हतं. बाहेर रिमझिम पाऊस पडायचा. वातावरणात गारवा असायचा अन् हरिपाठातील 'रामकृष्ण विठ्ठल हरि नारायन' चा मंत्र गावात घुमायचा. अथर्व हा हरिपाठ चांगला म्हणतो याची गावात चर्चा वाढली. अथर्वच्या आई-बापाला त्याचं कौतुक वाटत होतं. जमीन-जनावरांचं करून पोरगं हरिपाठास जाते. गावातील इतर लेकरांसारखं रिकामं हिंडत नाही. इथं-तिथं बसत नाही. शाळेच्या नावावर जाऊन भटोलपणा करत नाही. म्हणून ओंकारराव पाटील त्याच्यावर खुष होते. पिकं घरात येऊ लागली. मूंग निघू लागला. कामधंद्यामूळे गावात पैसा खेळत होता. गणेश चतुर्थीचा महिना आला. अथर्वनेच पुढाकार घेऊन वर्गणी गोळा केली. गणपती बसले. एक गाव एक गणपती ही पद्धत राबवल्या गेली. गणपतीचे दहा दिवस अथर्व फारसा घरी, शेतातील कामाला दिसत नसे. तो गणपती मंडळाचं सर्व काम पाहात असे. त्या दिवसातली आरती तोच म्हणायचा! कुठे लायटिंग लावणं. कार्यक्रमाची व्यवस्था करणं. दहा दिवसांच्या सांस्कृतिक कार्यक्रम. धार्मिक कार्यक्रम. यांची आखणी करणं. हे सर्व अथर्व आपल्यापेक्षा वयानं मोठ्या असलेल्या मित्रांना घेऊन करत असे. मंडळाचे अध्यक्ष मात्र सेवकरामभाऊच असायचे. त्यांच्या नियंत्रणात हे सगळं घडत असे. यावर्षी कुणाच्या हातात कार्यकारी सूत्र द्यावीत हे सेवकरामभाऊच ठरवत असत. नंतर मात्र मीटिंगमध्ये त्यांची नावं जाहीर करत. सर्वजण त्यास मान्यता देऊन कार्यक्रमात सहभागी होत असत.

सेवकरामभाऊ कुणकर्णी हे गावामधील एक श्रीमंत नि प्रतिष्ठित नाव. धार्मिक कार्यक्रमात खर्च करण्यास ते कधीही मागेपुढे पाहात नसत. भागवत सप्ताह. पंढरपूर दिंडी. देहू-आळंदी दिंडी. शेगाव दिंडी. त्यासाठी लागणारा खर्च ते स्वत:च्या खिशातून करत असत. गावात त्यांच्या शब्दास प्रचंड मान होता. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या गावातल्या राजकारणाची सर्व सूत्रेही तेच हलवीत असत. गावकऱ्यांना ते जवळचे वाटतात. शहरातील लहान-सहान कामासाठीसुद्धा ते लोकांना मदत करतात. त्यांच्या बऱ्याच ओळखी होत्या. ते शहराशी संबंधित राहायचे. जिल्ह्याच्या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांना ते आवर्जून उपस्थित राहायचे. नागपूरला होणाऱ्या पहिल्या फळीच्या मेळाव्यास ते हजर असत. श्रीमंत परंतु



नेहमी दानधर्म करणारा माणूस म्हणून त्यांचं नाव होतं. त्यांनीच ओंकारराव पाटलांच्या मुलाला पुढं केलं होतं. म्हणून गावात लोक चांगलं बोलायचे. ''ओंकारराव पाटलानेच त्याईले निवडणुकीत जाऊन विरोध केला. भाऊ तं म्हनत तेल्याकडून ये, उपसरपंच कर्तो. पन ओंकाररावनं नाई आईकलं.''

गावात निवडणूक झाली की एक-दोन महिने वातावरण तापलेलं असायचं. एखादा धार्मिक कार्यक्रम असला की, सर्व राजकीय मतभेद विसरून सर्वजण त्यात सामील होत. पिकपाणी भरपूर असल्यानं गावात वातावरण चांगलं होतं. गणपतीचे दहा दिवस माहीत न पडता निघून जाऊन लगेच दुर्गादेवी आल्या. चंदा जमा झाला. सोबत अन्नधान्य जमा झालं होतं. भव्य सजावटीसह दुर्गादेवी बसल्या. जोर-जोरात गाणी वाजवली जाऊ लागली. कार्यक्रम होऊ लागले. संध्याकाळच्या प्रखर उजेडात सारं गाव आरतीला जमा होई. लगेच नाटक तर कधी सिनेमा असे कर्यक्रम होऊ लागले. दुर्गादेवीचं फार काळजीपूर्वक बारीक-सारीक करावं लागे. सर्व मंडळ काळजी घ्यायचं. रात्र-रात्रभर मूलं-माणसं. पत्ते खेळत. गप्पा मारत. दुर्गादेवी मंडपात रमलेली असत. शेवटच्या दिवशी भव्य भंडारा देण्यात आला. पूर्ण गावातून धान्य जमा झालं होतं. बौद्ध, मुस्लीम यांचीही भंडाऱ्यासाठी देणगी असे. सर्व जेवणाच्या पंगती उठायच्या. नंतर बौद्ध, मुस्लीम यांची पंगत बसत असे. काही बौद्धातील व मुसलमानातील नवीन विचारांची पोरं या पंगतीला येत नसत. तरीही गावच्या सहभागातून हा भंडारा चांगला व्हायचा. गावात एक चैतन्य नांदायचं. अथर्वला सेवकरामभाऊ जे एकांतात सांगायचे, त्याचप्रमाणे तो सगळं करीत असयचा. त्यातही हरिपाठ कधीच बंद नसल्याने त्यांच्या भेटी होतच असतात.

दुर्गादेवीचा भंडारा नि दसरा मोठ्या उत्साहात साजरा झाला. अथर्व आणि काही लहान-मोठी पोरं, माणसं सगळं गाव फिरून आली. सोनं नि चांदी वाटून आली. आपटा आणि सौंदळ सर्वत्र गावात पसरला होता. आजूबाजूच्या शेतातून, जंगलातून आपटा, सौंदळ तोडून आणला. झाडं बुची झाली. आजच्या दिवशी या झाडांना महत्त्व असतं. ओरबडून निघालेली झाडं उभी होती. गावातली माणसं सोनं-चांदी घेऊन एकमेकांना देत, भेटत, पाया पडत. सेवकरामभाऊ घरी बसले होते. बैठकीत काही वयानं, वजनानं मोठी माणसं बसून होती. ती येणाऱ्या-जाणाऱ्यांचं अभिवादन स्वीकारीत. कोण आलं. कोण नाही आलं. यावर सेवकरामभाऊचं पूर्ण लक्ष असायचं; परंतु ते काही बोलून दाखवत नसतं. तसेही ते फार कमी बोलत.

गावातल्या वातावरणात धार्मिकता वाढली. रात्रीची ढोलाची भजनं होत असत. त्यांच्या झांज्याचा ताल ऐकू येई. रात्रीच्या शांत हवेत ते भजनं मनाला.

दिवसाला होणारी भजनं, आरती यात तो असायचा. मध्येच अथर्व छान गातो म्हणून, आळंदीला ह.भ.प. कीर्तनकारासाठी जे प्रशिक्षण देण्यात येतं, त्याला जाऊन आला. आता त्याची भक्ती वाढली होती. कुठे दिंडी जायची असली की, तोच सर्व करायचा. तयारी करून घ्यायचा. दिंडीचं नेतृत्व तोच करू लागला. पखवाज वाजवण्यात पटाईत झाला. त्याच्याशिवाय पखवाज आता वाजत नसे.

माघ महिन्यात गावात सेवकरामभाऊंनी भागवत सप्ताह लावला. सकाळी मोठी आरती व्हायची. दिवसभर भागवत चालायचं. संध्याकाळी पुन्हा कीर्तन चालायचं. सेवकरामभाऊ गावात फिरत असत. मुलांना गोळा करत असत. भाऊ घरी आल्यानं सर्व लोक मुलांना कीर्तनात, मंदिरात पाठवत असत. आई-वडिलांना आपली मुलं मंदिरात जावीत असं वाटे. म्हणून ते म्हणायचे,

''अभ्यास काय तिकळून आल्यावरड होते, मंदिरातून येनं पयले''


''नाई हो बाबा, बारावीचं वर्ष हाये. माचा अभ्यास पडते, मी नाई जात.''

''मोठा अभ्यास करनारा झाला, जाय पयले''

मग मुलं मंदिरात येऊ लागत. कीर्तनात, हरिपाठात दंग होत. 'अथर्व हरिपाठात असते. घरच्या कामात असते. तरीही सत्तर टक्क्याने पास होते.' म्हणून लोकं आपल्या मुलांना सांगत असत. भागवताच्या सप्ताहात गावात दणदण वाटे. लोकं लेकराबाळांसह दिवसभर भागवतात बसून असायचे. शेवटच्या दिवशी शेगावला प्रगटदिनासाठी जाण्याचं सांगून सप्ताह संपून गेला. प्रगटदिनाची तयारी झाली. गावातील तरुण पोरंपोरी, बायामाणसं, पायदळ वारीसाठी शेगावला निघाली होती. शाळेतील मुलांनीही आपली वेगळी दिंडी काढली होती. सर्वच गावांतील दिंड्या प्रगटदिनाला पोहोचल्या होत्या. दर्शन झालं. प्रसाद झाला. आणि सर्व दिंड्या परत निघाल्या. गावात त्यांचं स्वागत झालं. परीक्षांना सुरुवात झाली होती. दिंडीत जाणाऱ्या मुलामुलींनी कशीबशी परीक्षा दिली होती. अथर्व यावर्षी अकरावीला होता. त्यामुळे त्याला अभ्यासाची फारशी काळजी नव्हती. याच वर्षी त्याला भरपूर पीक झालं होतं. म्हणून त्याच्या वाघाईच्या शेतात विहीर खोदण्याचं काम सुरू झालं होतं.

उन्हाळा संपला. पावसाला सुरुवात झाली. शाळा सुरू झाल्या. अथर्वला आता बारावीसाठी ओंकारराव पाटलांनी एक मोटार बाईक घेऊन दिली. गाडी घरापुढे उभी राहिली. बाजारासाठी, शहराला जाण्यासाठी, आणि अथर्वला शाळेत जाण्याकरिता ती घेण्यात आली होती. अथर्व अकरावी कसातरी पास झाला. पेरणीस सुरुवात झाली. बाजारात गर्दी वाढली. बी-बियाणं, मजुरी करणारे, शाळकरी पोरांचं कपडे-पुस्तकं याची [illegible] झाली. [illegible]वी-बारावीचा निकाल

SARASWATI ARTS COLLEGE DAHIHANDA



लागला होता. गावातून फारशी पोरं पास झाली नव्हती. दहावी-बारावी करून शिक्षण होण्या. त्या पिंजरला व्हायच्या. गावात फक्त सातव्या वर्गापर्यंतच शाळा होती. कुणीतरी शाळा काढण्यासाठी प्रयत्न केला होता. पण तो यशस्वी झाला नव्हता. शाळेसाठी लागणारी जागा द्यायला गावात कुणीच तयार नव्हतं. यापूर्वी शाळेचा एक प्रस्ताव सेवकरामभाऊंनी टाकला होता. तो कशात तरी अडकून असल्यानं पडून होता. त्यामुळे नवीन मानसाला शाळेची परवानगी मिळू शकत नव्हती. सेवकरामभाऊ काळजी घेत असत. 'एक-दोन वर्षांत आपुनच आपल्या गावासाठी शाळा आनू.' असं ते म्हणत असल्याचं लोकं ऐकत असत.

पेरणी होऊन शेतातील कामं वाढली, तशा शाळाही जोगत सुरू झाल्या. अथर्व सर्व कामं करायचा. तो मेहनती होता. अंगानं वाढला होता. जनावरांचं करून तो संघटना आटपायचा. नंतर हरिपाठात जायचा. रात्री उशिरानंच जेवण करून अभ्यासाला बसायचा. पुस्तक हाती घेऊन तो वाचू लागे. थोड्याच वेळात पुस्तकातल्या ओळींवरून त्याची नजर हटून उद्याच्या कीर्तनाची आखणी करू लागे. त्याचं नियोजन त्याच्या मनात रेंगाळे. शाळेतला गोल, मोठ्या डोळ्यांचा चेहरा त्याच्या नजरेपुढे उभा राही. डोळ्यांत गुंगी जमून डोळे भारी होत असत. त्याला काही कळायच्या आत तो सुस्त पडत असे. आई-वडिलांनी त्याला कधीच अभ्यासाबाबत काहीही म्हटलं नाही. उलट 'शिकला तं शिकला नाई तं आपलं जमीन हायेच! नंगी हवो काय लोकाइच्या वानी?' असं म्हटल्याचं अथर्वला आठवत असे. शाळेत न जाता रोज रात्रीला तो अभ्यासाचे प्रयत्न करीत असे. यावर्षीही त्याला गणपती व दुर्गादेवी उत्सवाचा कार्यकारी ठेवलं होतं. तो 'नाय नाई' म्हणत असतानाही त्यालाच ठेवण्यात आलं होतं.

"रावनं बे अध्यक्ष. लोकं म्हनतात तं. दुसऱ्यांदा रायाचा कोनालेच जमत नसते, पन तुले आला तं रायइ काऊन नाइ म्हनत."

ओंकारराव पाटलानं अथर्वले घरी असं म्हणताच तो मनाविरुद्ध उत्सव कार्यकारी अध्यक्ष झाला. अथर्वच्या आई-वडिलांची छाती फुगली. आपला अभ्यास बुडतो. शाळा बुडते. संध्याकाळी संघटना. हरिपाठामधून तो दमून जातो. म्हणून त्यानं नकार दिला होता; परंतु वडिलांमुळे आणि सेवकरामभाऊंच्या शब्दांपुढे तो बोलू शकला नाही. गणपती. दुर्गादेवीचे दहा-बारा दिवसांचे भरगच्च कार्यक्रम करून दोन्ही उत्सवाचे भव्य भंडारे झाले.

यावर्षी गणपतीलेच सेवकरामभाऊंनी देहू-आळंदीले गावातून तीन पोरं पाठवली होती. कुणाच्याही आई-बापाची परवानगी न घेता त्यांची नावं दिली होती. 'धार्मिक कामाले कोनी नाइ नसते म्हनत.' म्हणून ह.भ.प. प्रशिक्षणासाठी जायची



तयारी झाली. एक अथर्व जुनाच होता. एक गणपत मास्तरचं पोरगं होतं. ते दहावीला होतं. अभ्यासात हुशार. बोलण्यास चतुर होतं. ते जाण्यासाठी 'नाइ' म्हणालं. 'अभ्यास डुबतो.' म्हणून रडायला लागलं. त्याची आई समजावत म्हणाली,

"ज्ञानोबाच्या कृपेनं त्याईचं दर्शन घडायलं अन् तू नाई म्हनत"

"माया अभ्यास मागं राईन"

"तिकडून आल्यावर करजो"

"मी नाई जात, नाई तर मी शाळा सोडून देईन"

"मोठा शाळेची धवस देनारा झाला. चाल जाय पयले प्रशिक्षनाले. तो कोयाचा निळकंठ्या नाई काय. तो तं बीएस्सी करे"

आईच्या नाईलाजाला तो शरण गेला. तिघेही ह.भ.प. प्रशिक्षणाला गेले. सर्व पैसा सेवकरामभाऊंनी खर्च केला होता. यावर्षीचा प्रशिक्षणाचा कालावधी वाढला होता. मध्येच दिवाळी आल्यानं पोरं दोन दिवसांसाठी घरी येऊन गेली. पुन्हा प्रशिक्षणात रममाण झाली. तिकडून परत आल्यावर ते गोरे-गोमटे दिसू लागले. थोडीशी भाषा बदलली होती. काही दिवस त्यांना तिकडच्या गप्पा सांगाव्याशा वाटल्या. दिवाळीच्या सुटी व्यतिरिक्त काही दिवस शाळा पडली होती. अथर्वला अभ्यासाची चिंता वाटू लागली. त्याच्याकडे कामासाठी घरगडी ठेवला होता. पण अथर्व घरी येताच तो बंद झाला. त्याच्या गैरहजेरीत संघटना, हरिपाठात पुढे असणारा श्रीपाद शिम्पी हाही दहावीचा पोरगा होता. सेवकरामभाऊंनी त्याची हुशारी बघून त्याला ते काम सोपवलं होतं. अथर्व आणि त्याचे प्रशिक्षण सहकारी दररोज हरिपाठात भेटत असत.

पिंजर येथे एका भव्य कार्यक्रमाच्या आयोजनाची तयारी झाली होती. अकोल्याच्या काही दात्यांनी पैसा मिळवून दिला होता. सुवर्ण व्यवसायिकाकडून हा कार्यक्रम घडत असल्यानं पैशाची अडचण नव्हती. कार्यक्रमाची जाहिरात झाली. भिंतीवर, दुकानात त्याची पत्रकं चिकटवण्यात आली. यासाठी सर्वत्र केवळ शाळेची लेकरं कामाला लावली होती. प्रज्ञाकुमारी ठाकूर येणार असल्यानं सर्वत्र आनंद पसरला. ती चांगलं बोलते म्हणून तिची ख्याती होती. पुन्हा ती पंतप्रधानापर्यंत ओळख असणारी मोठ्या कीर्तीची होती. देवळीतून त्यासाठी शाळकरी मुलांची दिंडी जाणार होती. गावागावातून दिंड्या येणार होत्या. गावात तयारी झाली. शाळकरी मुलांची पुढे दिंडी वाजत-गाजत चालली. मागे माय-बाप कौतुक पाहात गावकऱ्यांसोबत पायी निघाले होते. आजूबाजूच्या गावातून शाळकरी लेकरांच्या दिंड्या एकत्र झाल्या. प्रज्ञाकुमारी ठाकूर यांच्या आसनाच्या बाजूनच दिंडी विसर्जन होतं. तिथे ज्ञानोबा माउलींची पादुका, समाधीची अधिष्ठापना केली होती. सबंध जिल्ह्यामधून,

जिल्ह्याबाहेरून प्रचंड जनसमुदाय जमला होता. भव्य मंडप. मंडपात टी.व्ही. सी व्यवस्था. त्यांचीच मान्यता असलेली व्यावसायिक दुकानं. प्रज्ञाकुमारी ठाकूर यांच्या आसनाच्या बाजूला बंदुकधारी कमान्डोज होते. संध्याकाळी भाविक भक्तांसाठी भव्य मोफत भंडारा होता. यांची व्यवस्था बघण्यासाठी आजूबाजूच्या गावातील धार्मिक. सेवाभावी माणसं. विद्यार्थी पूर्ण दिवस तिथेच असायची. शेतीची का थांबवली होती. कापूस. तूर. हरभरा अशी पिकं शेतात फुलली होती. शाळेतील मुलांची संख्या रोडावली होती. शिक्षकही फारसे शाळेत हजर नसायचे. या दिवसाचा सर्वांनीच फायदा घेतला.

एकदाचा कार्यक्रम संपला. सर्व आपापल्या कामात पूर्ववत गुंतून गेली. अथर्व आपल्या शेनपानी, संघटनेत जाणे आणि हरिपाठ यात आवडीने जाऊ लागला. शेगावचा प्रगटदिन जवळ आल्यानं तो आनंदात होता. अधून-मधून आजूबाजूच्या गावात त्याला कार्यक्रमानिमित्त तर कधी हरिपाठासाठी बोलावणं येत असे. तोही सर्व मंडळींसह तिथे आवडीनं जात असे.

शेगावला सर्व तयारीनिशी दिंडी निघाली. बरेच दिवस लागणार म्हणून आता ओंकाररावांनी शेणपानी आणि घरकाम करण्यासाठी एक गडी ठेवला होता. अथर्वला आता फारसा वेळ मिळत नाही, म्हणून ही व्यवस्था होती. शेगावावरून दिंडी परत आली. आपली परीक्षाही आता जवळ आल्याचं अथर्वच्या लक्षात आलं. त्यानं गाईड आणून अभ्यासाला सुरुवात केली. रात्री जेवणानंतर खूप उशिरानंच तो अभ्यासाला सुरुवात करू शकत होता. त्यापूर्वी त्याला रिकामपण मिळत नसे. त्यातही गावात भागवत सप्ताह लागला होता. पूर्ण दिवस त्यात जाई. नंतर संघटना. हरिपाठ यातून तो थकून जाई, अभ्यास होत नाही म्हणून तो काळजी करीत असे. रात्र खूप झाली होती. अथर्व अभ्यासात मग्न झाला होता. अचानक त्याच्या खांद्यावर श्रीपादनं हात ठेवला. तसा तो भानावर येऊन म्हणाला,

"अरे तू"

"अथर्व, म्या पयले आवाज देला तू बोलला नाई, मले वाटलं काय क रयला. पन दरवाजा उघडा दिसल्यानं अंदर आलो"

"हं सांग काय म्हंन्तं"

"अमृता गोसायाच्या घरी भजन हाये चाल्लं काय"

"जाय बे तू, फालतू डोक्सं खाऊ नोको"

अथर्व चिडल्यानं श्रीपाद न बोलताच निघून गेला. परीक्षेच्या काळजीत अथ होता; परंतु त्याची सर्व मानसिकता धार्मिक कार्य. हरिपाठ. भजन. यांच्यात गुंतून गेली होती. तो अभ्यासात लक्ष घालण्याचे पूर्ण प्रयत्न करत होता. प



त्याचे लक्ष लागत नव्हते. त्यामुळे तो स्वत:वर चिडत असे. तरीही त्याची मानसिकता, त्याला अभ्यासापर्यंत येऊ देत नव्हती. परीक्षा सुरू झाली. अथर्व परीक्षेमुळे घरातच वावरू लागला. परीक्षा संपेपर्यंत त्याला कुणीही काही म्हटलं नाही. परीक्षा होताच तो पूर्ववत संघटना आणि हरिपाठात रमू लागला. परीक्षेनंतर त्यानं उन्हाळ्याच्या शेतातील कामात अधिक लक्ष घातलं. हळूहळू त्याचं संघटनेत जाणं कमी झालं. हरिपाठातच तो रमू लागला. सेवकरामभाऊंनी त्याला संघटनेत येण्याबाबत हटकलं नाही. तो येत नसल्याचं त्यांना कळलं होतं. कोण येत नाही. कोण येतो. कोण काय म्हणतं, याची बातमी सेवकरामभाऊंना घरपोच कळत असे.

प्रचंड उन्हाळा तापला. प्रखर उन्हात रान ओसाड झालं. पांढरी ढगांची झिगुळ दिसू लागली. ती पांढऱ्याची काळी झाली. पावसाळा लागला. धामधूम झाली. शेतकरी पेरणीस सुरुवात करू लागला. काही परीक्षांचा निकाल लागला. दहावीचा, बारावीचा निकालही जवळपास येऊन ठेपला. अथर्वला निकालाची वाट नव्हती. तो निकालाच्या आठवणीत उदास व्हायचा अन् कामात स्वत:ला गुंतवून घ्यायचा. दहावीचा निकाल लागला. गावातून जेमतेमच पोरं पास झाली होती. त्यात बौद्धांची पोरं अधिक होती. लवकरच बारावीचा निकालही लागला. पेपर गावात आला. त्यात आदित्य सेवकराम कुलकर्णी जिल्ह्यात प्रथम आल्याची बातमी होती. फोटो होता. याबद्दलची काही चर्चा गावात पोहोचली होती. आदित्यला सेवकरामभाऊंनी अमरावतीला विज्ञानशाखेत टाकून रूम भाड्यानं करून दिली होती. तो अमरावतीला शिकत होता. फारसा गावात येत नसे. अथर्वचा पेपरात नंबर नव्हता. तो पूर्ण नापास झाला होता. क्षणभरासाठी त्यानं आत्महत्येचा विचार केला; परंतु गावातले त्याचे इतर वर्गबंधूही नापास झाल्याचं त्याला कळलं होतं. दहावीला केवळ पन्नास टक्क्यांनी पास होणारा आदित्य आता जिल्ह्यात प्रथम आल्याचे पेढे त्याला मिळाले होते. आपल्या गोठ्यातल्या बाजीवर अथर्व कामाधंद्याच्या वेळेतही पडून होता. संध्याकाळी तो बाहेर निघाला नाही. ओंकारराव पाटील गोठ्यात आले. तेव्हा झ्याल पडली होती. हरिपाठाला सुरुवात होणार होती. तसं जाहीर झालं होतं. काहीतरी बोलायचं म्हणून ओंकारराव पाटील म्हणाले,

"जानं रे हरिपाठात. जात नाईस काय?"

अथर्व न बोलताच उठला. आणि तसाच हरिपाठाला जायला निघाला. 'पोरगं आपल्या म्हटल्यानं आइकते. आपल्या पुढे खालची मान वरही करत नाही.' अशा खुशीत ओंकारराव पाटील मनातल्या मनात हसत होते. हरिपाठाला निघालेल्या अथर्वला पाठमोऱ्या बघत होते.

# भाडेकरू

माझी अकोट तालुक्यातून बदली झाली. बार्शिटाकळी तालुक्यातील कुठलंतरी गाव मिळणार होतं. गाव नक्की कळलं नाही; परंतु पंधरा जूनपर्यंत कळणार असल्यामुळे मला कुटुंब अकोट मधून अकोल्याला हलवायचं होतं. त्या दृष्टीनं मी प्रयत्न चालू केले. बार्शिटाकळीत विझोरा, एरंडा, आळंदा यापैकी गाव मिळावं म्हणून धडपड केली. एजन्टला ओळखसंबंध दाखवून एका लाखात बोलणी केली. या क्षेत्रात पैसे न देता बदली होणं कठीणच. बदलीची खात्री झाल्यानं ते गाव जवळ पडील अशी राहाण्याची व्यवस्था करायची होती. त्याच परिसरातील बापदेव जोशी शाळेत मुलीला घातलं. त्याचेही भरपूर पैसे द्यावे लागले. पूर्वी शाळेत प्रवेश दिला जात नव्हता. शाळाबंदी होती. आता प्रवेशासाठी डोनेशन द्यावे लागते. शोषणाच्या दृष्टीनं अंतर काय? पूर्वी धर्मापासून दूर ठेवण्यात येत होतं. आता शाळेत धार्मिकच शिक्षण देतात. गुलामीत फरक काय? एकंदरीत शोषण आणि गुलामी कायम राहावी म्हणून व्यवस्थेनं घेतलेली ही काळजी आहे. पैसा गेला म्हणून माझा जीव तुटत होता.

राहण्यासाठी खोली किंवा घर शोधण्यासाठी म्हणून मी फिरू लागलो. रिसोडला दोन-तीन दिवस फिरलो. घर सापडेना. नंतर कौलखेड. घर मिळेना. नेरा तहरिया नगरात विचारपूस करत फिरलो. दररोज सकाळीच यावं लागे. कारण दुपारला दरवाजे बंद होत. लोकं बाहेर येत नसत. प्रचंड ऊन असायचं. म्हणून सकाळी यावं लागे. दुपारच्या दरम्यान एक घर सापडलं. दोन मजली होतं. दारात एक म्हातारी बसली होती.

"आजीबाई घर खाली हाये काय"

"आ... हो"

पुढे आजीबाई खूप वेळ बोलल्या नाहीत. उठून पुढे आल्या नाहीत. माझ्याकडे बसल्या जागेवरूनच सारख्या बघत होत्या. माझा अंदाज घेत होत्या. माझा हुलिया बघून त्या गोंधळून गेल्या असाव्यात. शेवटी मीच बोललो.

"मग दाखवता काय"

"हो दाखवतो. तुमी कोन्ती नवकरी कर्ता?"

"मास्तर"

"कुटी"

"बार्शिटाकळीले"

तेवढ्यात आजीबाई चालत आल्या. त्या फाटकाच्या आतून व बाहेरून मी उभा. असा आमचा संवाद चालू झाला.

"कितीक झनाचं कुटूंब हाये"

"तिगाचं, बायको एक लेकरू अन् मी"

"मंग बर हाये, तुमचं अळनाव काय हाये?"

"कांबळे"

म्हातारीनं नाक जमा केलं. माझ्या आडनावावरून तिनं जातीचा अंदाज घेतला असावा. ती लगेच परत बसण्यासाठी म्हणून निघाली. मी उभाच होतो. म्हातारी बसली व सहज मला म्हणाली.

"आमी बुद्दाले घर नाई देत"

मी ते ऐकलं व वेळ न घालवता तेथून निघालो. माझ्या डोक्यात आलं. भारत महासत्ता होतोय. आपण एकविसाव्या शतकात वावरतोय. पण अजूनही या लोकांच्या मनातला जातीयद्वेष गेला नाही. जोपर्यंत येथील धर्मसंस्कृती कायम आहे तोपर्यंत ही विषमता टिकून राहाणार आहे. येथे केवळ समानतेच्या, परिवर्तनाच्या गप्पा होत राहातील आणि त्याचवेळेला येथील धर्म माणसाला माणसापासून तोडत राहील. प्रत्येक कालखंडात आता पहिल्यासारखं काही राहिलं नाही. असं लोक म्हणत असतात आणि संस्कृतीचं पालन करत राहातात. जातीयद्वेष आणि उच्चनीचता ही या संस्कृतीची अविभाज्य अंगं आहेत. लोकं त्यालाच माणुसकी समजून जगत असतात. जातीचा याही काळात हा अनुभव आल्यानं मला विचित्र वाटलं. मध्येच थोडं हसूही येत होतं. म्हातारीला बोलताना थोडीही भीती वाटली नव्हती. उलट आपण आपल्या संस्कृतीचं पालन करतो हा अविर्भाव तिच्या शब्दांत होता. भारतीय समाज आणि संस्कृतीचं खरं दर्शन मला या काळात घडत होतं. मी अंदाज घेत होतो. पेशवेकाळात या जातीचे काय हाल असतील. पुढे मला घर शोधावंसं वाटलं नाही. मी सरळ गाडी पकडून अकोटला निघून आलो. संध्याकाळी वाचत होतो. नागपूरवरून एका डी. एड. वर्गबंधूचा फोन आला. तो नागपूर जिल्ह्यात लागला होता. व मी अकोला जिल्ह्यात. काही वर्षांपासून आम्ही

संपर्कात होतो. एक-दोन वेळा भेटी सुद्धा झाल्या होत्या. फोन नेहमीचाच.

"काय शीवा, काय करतोस, झ्यालं की नाई बदलीचं"

"हो ना जमलं ना."

"जास्त पैसे दिले काय? आवाज खूप उतरलेला दिस्तो. की, वहिनी गेल्या सोडून तुला"

"नाई रे ते कुठलं भाग्य आमचं"

"आज्यून काय च्यालू आहे मंग"

"काई नाई घर शोधनं चालू आहे"

"सापडले नायी आज्यून?"

"नाई"

"अरे, आमचे मामांची बदली झ्याली तेथून त्यांचं घर असनार खाली, त्यांना विचारून बघ"

"कुठे आहे त्यांचं घर"

"काई माईत नसे गा, हा नंबर घे त्यांचा आनी त्यांनाच विचार, माझ्या नाव सांग, तसे ते तुला नावाने ओळ्कतातच"

मित्रानं नातेवाईकांचा नंबर दिला. मी दिलेल्या नंबरवरती फोन केला.

"हं बोला मी कुलकर्णी बोलतो. हो हो जोगेश्वरनं सर्व सांगितलं, मी फोन देतो. तुम्ही तेथे जा. तुमचं काम होऊन जाईल."

दुसऱ्या दिवशी सकाळीच मी अकोल्यासाठी निघालो. आणि त्याच नगरात त्याच गल्लीत आलो. म्हातारीच्या घरापासून हे घर पाचव्या नंबरचं. शेजाऱ्यांकडून चाबी घेतली. घर बघितलं व सोबतच चाबी आणली. घरमालकांनी शेजाऱ्यांना सगळं सांगितलेलं होतं. घर भाड्यानं मिळालं म्हणून मला बरं वाटलं. मी लगेच राहायला आलो.

भरपूर पाऊस पडत होता. शाळा सुरू झाल्या होत्या. मी आळंदा येथून ये-जा करीत होतो. एक काळे नावाचा मित्र बार्शिटाकळीवरून ये-जा करीत होता. दोघांच्याही बदल्या याच वर्षी झाल्या होत्या. तो अजूनही घराच्या शोधात होता. म्हणून मी त्याला म्हातारीचं घर दाखवलं. म्हातारीनं त्याला घर भाड्यानं दिलं. तो जातीनं भोई होता. म्हणून त्याला अडचण आली नसावी.

मुलीची ट्युशन सुरू झाली. गोल्डी संध्याकाळची ट्युशनला जायची. तिला सोडवायला, आणायला तिची आई जात असे. संध्याकाळचं आभाळ भरून आलं. विजा चमकू लागल्या. अंधारलेल्या आभाळातून टपोरे थेंब पडू लागले. जोराचा पाऊस सुरू झाला. पावसाला वेग होता. पाऊस उतरण्याचं चिन्ह नव्हतं.



ट्युशन सुटायची वेळ झाली. मी मुलीला आणायला निघालो. माझ्या घरापासून पूर्वेला जाऊन थोडं कललं की, शहरात जाणारा मोठा रस्ता लागतो. त्या कोपऱ्यावरच्या मोठ्या घरामागे खाली जागा आहे. त्यात झाडं-झुडपं उगवले. लोकं तेथे कचरा टाकतात. तेथेच थोडा रस्ताही उखरलेला आहे. मी पावसात निघालो. कोपऱ्यावरून कललो. जोराचा पाऊस. पावसाला आवाज. रस्त्याच्या बाजूला कोणीतरी पडलेलं होतं. मी जाऊन बघितलं. ती कोणीतरी वयोवृद्ध महिला व्यक्ती होती. हा नगरातला रस्ता होता. तो सिमेंटचा होता. त्याचा कोपरा त्या म्हातारीच्या डोक्याला लागला असावा. डोक्यातून रक्त निघत होतं. म्हातारीनं एक हात डोक्याला लावला होता. ती खोल आवाजात ओरडत होती. तिला उठता येत नव्हतं. तिच्या अंगाला खूप लागलं असावं. बाजूला औषधीची कॅरीबॅग पडलेली होती. मी तिला उचलण्यासाठी तिच्या जवळ गेलो. अन् पटकन म्हातारीची ओळख पटली. 'ती' घरावाली म्हातारी होती. माझं मन तिला उचलण्यास तयार झालं नाही. मी मागे सरलो व चालू लागलो. पण माझं मन मला मागं खेचत होतं. आणि डोकं पुढे पाऊल टाकीत होतं. मनात आलं म्हातारीनं जातीयद्वेष पाळला. पण आपण तर माणुसकी विसरलो. आपल्या शिक्षणाला काय अर्थ. म्हातारीनं तर तिचा धर्म पाळला. संस्कृती पाळली. आपल्या संस्कृतीत विषमता आहे हे म्हातारीला कुठं ठाऊक आहे. ते काहीही असो. आपण म्हातारीला उचलायचं नाही. बस. मुलगी वाट बघत होती. मी मुलीला घेऊन परत आलो. तरी म्हातारी तशीच पडून होती. बाजूचं पाण्याचं डबरं रक्तानं लाल झालं होतं. तेथून जातानी गोल्डी म्हणाली.

"पप्पा, तती कोन पळेल हाये"

"बेटा, एक म्हातारी पडलेली आहे"

"चला ना. आपून तिले उचलू ना"

मला प्रश्न पडला. नेमकं काय करावं. मुलीला काय सांगावं. दुर्लक्ष करून निघावं तर या मुलीच्या मनात काय येईल. काय संस्कार होतील. मदत करावी तर म्हातारीनं माझं माणूसपण नाकारलं होतं. ज्या धर्मानं, संस्कृतीनं माझं माणूसपण हिरावून घेतलेलं आहे. तो धर्म. ती संस्कृती. तिथं रक्ताच्या थारोळ्यात पडलेली आहे. त्या जातीयवादाला वाचवणं मला कठीण जाऊ लागलं. पण मुलगी मात्र "चला आपून तिले उचलू" म्हणून सारखा तगादा लावू लागली. तिच्या शब्दानं माझं मन बुध्द झालं. आम्ही परत गेलो. म्हातारी मदतीसाठी हळुवार आवाज देत होती. विव्हळत होती. आम्ही तिला दिसलो असेल म्हणून ती म्हणाली.

"अरे रामा, वाचव रे, उचल रे बाबू, देव तालं भलं करीन."

तिच्या बोलण्यावरुन तिची मानसिकता लक्षात येत होती. तिचा जीव वाचल्यानंतर

किंवा ती बरी झाल्यानंतर, मी तिला वाचवलं किंवा मदत केली असं ती म्हणणार नव्हती. 'मला देवानंच वाचवलं' असंच ती समजणार होती. आणि देवाच्या नावावर माझ्यासारख्या माणसाची माणुसकी ती विसरणार होती. मी मुलीला 'आपण घरी जाऊन गाडी घेऊन येऊ व म्हातारीला उचलून नेऊ'. अशी समजूत काढून तिला घरी आणलं. पाऊस चालूच होता. गोल्डी घरी आल्यावर खेळण्यात गुंतली.

दुसऱ्या दिवशी सकाळी काळे माझ्या घरी आला. तो घाईत होता. म्हणाला, "आमची घरमालकीन काल रस्त्यात पडली. खूप रक्त गेलं. सध्या ती दवाखान्यात बेशुद्ध हाये. तिला रक्त हवे आहे, तू देतोस का. तुझं 'बी' पॉझीटिव्ह हाये." काळे हा माझा वर्गमित्र होता. म्हातारीची रुम मीच त्याला सांगतली होती. हा भाडेकरू मालकीणीच्या जीवासाठी रक्त शोधत होता. त्याला माझा रक्तगट माहीत होता. म्हातारीला कुणीतरी उचलून दवाखान्यात नेलं होतं. त्याला उशीर झाला होता. पण रक्त दिल्यानं म्हातारीचा प्राण वाचणार होता.

मी दवाखान्यात जाऊन रक्त दिलं. काही इतरांकडून घेतलं. सांडलेलं रक्त पुन्हा गोळा करून म्हातारी आठवड्याभरानं बरी होऊन घरी आली. अधून-मधून दारातून फिरायला जातांनी दिसायची. तिला कुणी तरी सांगितलं होतं, 'मी तिला रक्त दिल्याचं'. त्यामुळे कदाचित ती माझ्यासोबत एखादा शब्द बोलायची. 'तुम्ही तुमी रक्त देतं मले. लय माणुसकीचं काम केलं.' म्हणायची. माझ्या मुलीसोबत सहज बोलायची.

विद्यार्थ्यांच्या शिकवण्याकडे दुर्लक्ष व्हावं म्हणून शिक्षकांना अवांतर भरपूर कामं दिली जातात. त्यात पूर्ण दिवस जायचा. तीस दिवसांसाठी दिवाळीच्या सुट्या लागल्या. आम्ही सुटी घालवण्यासाठी म्हणून घरी आलो. गावात काही दिवस राहिलो. गोल्डी अकोल्याले जाण्यासाठी सारखा नांदा लावत होती. ती गावात कंटाळली होती. आजू-बाजूच्या घरावर लायटिंग होती. दारावर पणत्या होत्या. संध्याकाळी फटाके फुटायचे. त्यांच्याकडे खायला गोडधोड केलं होतं. ते बघून मुलगी म्हणायची,

"आपला घरी काऊन नाई"

तिची समजूत काढावी लागे.

"बेटा, या दिवशी आपल्या राज्याला दगाबाजी करून मारन्यात आलं. आनं म्हनून या दिवशी सन साजरा करनं म्हन्जे गुलामी हाये."

"मंग लोकं कसे करतात."

"ते मानसिक गुलाम हात"



मुलीला हे समजलं नाही. तरीही ती शांत झाली. आमची सुटी संपली. आम्ही अकोल्याला आलो. त्याच दिवशी घरमालक आले. आणि म्हणाले.

"आमचे लहान बंधू येथे रायाले येत आहेत, तुमी दुसरे घर बघा."

मला घर शोधायचं टेन्शन आलं. एका महिन्यात घर शोधायचं होतं. मी शोध सुरू केला. दिवाळी मध्ये फारसे घरं खाली होत नाहीत. ते शोधायला त्रास होतो. दिवसभर शाळा करून संध्याकाळला घराचा शोध घेत फिरत होतो. घर सापडत नव्हतं. बार्शिटाकळी रोडवर घर असणं सोयीचं होतं. त्यामुळे त्याच भागात मी फिरत होतो. काळेचं घर बंद होतं. त्याला घेऊन फिरायचं मी ठरवलं. तो भेटत नव्हता. दोन-चार दिवसानं काळे अचानक भेटला.

"अरे, आजकाल तुमी दिसत नाई." मी.

"बराबर हाये तुमचं. मी बदली करून घेतली, कसा दिसीन"

"कदी"

"दिवायीत"

"पन तीन-चार मयन्यात बदली. कसं शक्य हाये."

"महाशय जात आनी पैसा काहिई करू शक्ते."

"बराब्बर हाये तुमचं."

माझ्या चटकन लक्षात आलं. "मंग तुमी घर खाली केलं का?"

"बाप्पा. कईक दिवस झाले, बरं येतो. गळबळ हाये थोळीशी."

काळे गेला. मी थोडा शांततेत घरी आलो. मला जवळच घर मिळालं होतं. काळेच्या जातीचा अकोटला शिक्षण सभापती होता. म्हणून पाच वर्षाच्या अकोटच्या सेवेनंतर पुन्हा त्याला अकोट तालुका व स्वत:चं गावच मिळालं होतं. तो गेल्यानं मला त्याची खाली झालेली रुम मिळवायची होती. माझी रुम शोधायची भ्रमंती संपली होती. मी घरी येऊन संध्याकाळी म्हातारीकडे जायचं ठरवलं. सामान हलवायच्या दृष्टीनंही ते सोयीचं ठरणारं होतं. वेळ जाऊ नये म्हणून मी कुटुंबासोबत त्याच संध्याकाळला म्हातारीकडे गेलो. म्हातारी संध्याकाळची दारापुढे खुर्चीवर बसली होती. थोडी खोकलत होती. आम्ही फाटकातून आत गेलो. म्हातारीनं अनोळखी चेहऱ्यानं पाहिलं. तिनं ओळखलं नव्हतच. ती म्हणाली.

"कोन पायजे."

"कोनी नाई, तुमीच पायजे होत्या"

"बरं, बरं बोला"

अगदी सरळ विषयावर येण्यापेक्षा मी तब्येतीची विचारपूस करायला सुरुवात केली.

"काय म्हन्ते तब्बेत"

"लखोट, लखोट बरी नाई"
"हे खोकलाई झाला वाटे. मी काळेचा मित्र. बाजूले राहतो."
"म्हणजे कुलकर्णीच्या घरातले का?"
"हो"
"काळ्यानेच सांगतलं मले. तुमी रक्त देल्याचं, असी मानुसकी दाखवनारे लोकं फार कमी सापडतात"
मी दिलेल्या रक्ताला तिने 'देवाची कृपा' म्हटलं नाही. मला बरं वाटलं.
"कोणाच्याही मदतीला धावून जावाव, दुसरं काय"
"हे बरं, मानुसकी हाच खरा धर्म हाये"
उगाच वेळ घालवायचा नाही म्हणून मी सरळ विषयावर आलो.
"तुमचं घर खाली हावे ना."
"हो, खालीच हवे, काळे गेला तईपासून भाळेकरूच नाई. मयनाभऱ्याचं नुकसान झालं"
"मीही घर शोधत आहे भाड्यानं. तुमी म्हनत असान तं आन्तो सामायन"
म्हातारी थोडी बुचकळ्यात पडली. मी रक्त दिलं आहे. पण मी नेमका कोणत्या जातीचं कोण. म्हणून तिला आठवत नसावं. ते जाणण्यासाठी म्हणून ती सरळ म्हणाली.
"तुमचं आळनाव आठवत नाई मले"
"कांबळे, कांबळे हाये आळनाव."
म्हातारी उगाच खोकलायला लागली. पुढे तिला खरंच खोकला सुरू झाला. उबळ गेल्यावर शांततेत म्हणाली.
"सांगतो दोन-चार दिवसानं"
म्हातारीच्या खोकल्यानं मला तेव्हाच सांगितलं होतं. आणि यापूर्वीही सांगितलं होतं. तरीही मी म्हातारीकडे गेलो होतो. म्हातारीला शरीरात माझं रक्त चालत होतं. पण मी मात्र घरात चालत नव्हतो. आम्ही फाटकाबाहेर आलो. म्हातारी माझं रक्त घेऊन शांत बसलेली होती आणि मी घर शोधण्यासाठी रक्त आठवत होतो.



# ठकन

रघुनाथ फारसा काम-धंद्याले जात नव्हता. एखाद्याच वेळेस तो बायकोच्या भांडण्यामुळे, ते टाळण्यासाठी जिवावर दगड ठेवून कामाला जायचा. त्या कामात केलेल्या कामचुकारपणामुळे त्याला दुसऱ्या दिवसी मालक कामावर येऊ द्यायला उत्सुक नसायचा. गावातले कामाचे गडी त्याला फारसे सोबत नेत नसत. अडी-अडचणीला किंवा दुसरा माणूस मिळतच नसला, तर रघुनाथला मजबुरीनं कामावर नेलं जात असे. तो लहानपणापासूनच आई-बापाचा लाडका होता. त्यात चार-पाच बहिणी कामाच्या असल्यानं त्याच्यावर कामधंदा करून जगण्याची फारशी वेळ आली नव्हती, पण बहिणींच्या लग्नानंतर त्याचे लाड, हट्ट पुरविणारं कुणी नव्हतं. आई-वडील म्हातारे होवून त्यांनी काम सोडलं होतं. त्यांच्याकडून आता कुठलंच काम होत नव्हतं. ते कामं करीत असतानाच रघुनाथची लेकरं मोठी होत होती. रघुनाथ तेवढा हरिपाठात जाऊन देवधर्म, मंदिराची झाडपूस किंवा सामाजिक कामं तेवढी करत असायचा. खरं तर तो देवधर्माच्या नावावर स्वत:चा आळस लपवत होता. पण तो आळशी नव्हता. त्याच्यावर कामधंदा करून घर आणि कुटूंब पोसण्याची जबाबदारी पडलीच नव्हती. सगळं सहज चालत असल्यानं तेही चालू द्यायचा. एखाद्या दिवशी घरच्या शेतात जायचा. चक्कर मारायचा. त्याची बायको कर्तबगार. करारी. धाडसी आणि त्यापेक्षा जास्त धार्मिक अन् पारंपरिक होती. कष्ट करून ती घर चालवायची. लेकरं शिकवायची. पण त्यांची मुलं खूप शिकली नाहीत. मुलगा दहावी नापास झाला होता. तो रामचंद्राच्या खटल्यात कामाले जात होता. मुलगी पास होऊनही शाळेत जात नव्हती. तिचं नाव टाकलं होतं. पण मुर्तिजापूरला दररोज ये-जा करून मुलगी नाक नकटं करील म्हणून तिची शाळा थांबवली होती. यावर्षी तिचं लग्न करण्याच्या तयारीनं त्या दोघाही नवरा-बायकोनं विचार अन् प्रयत्न सुरू केले होते. मुलीच्या लग्नाची चिंता त्यांना भेडसावत होती. त्यातच आपला नवरा काही धडपड करत नाही



288)

म्हणून रघुनाथची बायको रुखमा सकाळीच त्याच्यावर रागावली होती.

"वावरातून एकांदा चक्कर मारुना. पराटी-गिराटी फुटली काय तं या पाऊन. धोरीच्या लग्नाची काई कायजी हाये तुमाले. का देवळातच बस्ता रिकाम्या गोटी करत."

"सर्के सोंनं वावरात जा म्हनून. इकून तिकून कायले बोल्तं."

"आलाई का तन्का, त्या दिवसी तुमाले म्हन्ल का त्या त्र्यंबकच्या घरी जाऊन पा वं, त्याच्या साळभावाचा पुतन्या हाय लग्नाचा तं नाई जमलं तुमच्याच्यानं"

"गेलतो ना वं, दोन-चार रोजानं सांग्तो म्हनत त्या वयनी"

"मंग या वर्षी जम्लं तं काय करसान लग्नाचं"

"तईच ताई पाऊ, आतच डोक्सं नोको खावू मालं. चाल्लो मी. वावरात चक्कर मारून येतो"

त्याला चक्कर मारायला जायचं नव्हतं. पण बायकोनं कटकट सुरू केली होती. सोबत एखादं काम तिनं लावून देऊ नये त्यापेक्षा वावरात चक्कर मारायला निघालेलं बरं. म्हणून तो निघाला होता. रघुनाथजवळ दोनच एक्कर शेती होती. त्यातील कापूस परवाच वेचून आणला होता. तरीही तो वावरात चालला होता.

संध्याकाळी तो चहा घेऊन हरिपाठाला जाणार होता. दिवसभर कापूस वेचून आलेली त्याची बायको हातपाय धुवत होती. मुलगी यावर्षी लग्नाले आल्यानं तिची शेती बंद केली होती. ती दिवस-रात्र तोंडाला उजळण्यासाठी काही तरी लावत होती. ती दिसायला बापाच्या वानावर होती. नाकी डोळी तेज आणि सुंदर होती. रोजचा स्वयंपाक तीच करत होती. आताही तिनं रघुनाथला चहा दिला. रघुनाथ चहा पिऊन बाहेर जाण्याअगोदर त्याची बायको म्हणाली.

"त्र्यंबक भाऊजी भेटले होते. इतवारी येतात म्हनत पावने, तयारीत रायजा"

"कुटी भेटले तुले"

"आता येता येता रस्त्यावर सांगतलं त्याईनं"

"बरं येऊ द्या म्हना, तयारीत हावो."

असं म्हणून तो हरिपाठात निघून गेला.

हरिपाठ आटोपला होता. गाव शांत होतं. हरिपाठानंतर मंदिरात एक मीटिंग ठरली होती. त्या मीटिंगची मंडळी एक-एक जमा झाली. सर्वजण आत बसले होते. बाहेर भरपूर थंडी होती. तिळसंक्रांत जवळ आली होती. इंग्रजी वर्ष नेमकंच लागलं होतं. गहू, हरबरा भरू लागला होता. कापूसही सुरूच होता. गाठोडं वेचून आल्यानं काही मंडळीला उशीर झाला होता. मीटिंग सुरू झाली आणि गोविंदराव पाटील बोलू लागले.



"हे पा मंडळी. आपुन माळीपुऱ्यात गजानन मंदिर बांदनार हावो, त्यासाठी घरपिच्छ्या आपुन दहा हजार रु. घ्याचे ठरोले. याच्या उप्पर जर कोनाले स्वखुसीनं आनखी काई द्याचं असीन तं, थो देऊ शक्ते. पन दहा हजार हे पक्के झाले. यावर कोनाचं काई म्हत्रं हाये काय?"

"नाई बॉ. कोनाचच नाई. आमाले मंजूर हाये"

म्हाल्याचा गणेश मोठ्या उत्साहानं सर्वांचं प्रतिनिधित्व करत बोलला. त्यावर गोविंदराव पाटील रघुनाथकडे बघून म्हणाले.

"मान्य हाय का रघू तुले."

रघुनाथ बोलायच्या आत परशुराम बामन त्याच्या वतीनं, व काही स्वत:चं बोलण्यासाठी म्हणाला.

"त्याले कावून मान्य नसीन. त्याच्याच डोक्शातलं व्हय हे अन् त्याच्याच पुऱ्यात हाये. एक डाव माळीपुऱ्यात गजानन म्हाराजांचं मंदिर झालं की, तो कायचा येते अथी हरिपाठाले. तिकडेच नाई करीन हरिपाठ ततल्ल्या तती."

"मंग तं त्यानं दुप्पट हिस्सा द्यायले पायजे."

गोविंदराव पाटलाच्या या बोलण्यावर रघुनाथ काहीतरी बोलणार होता. पण तो बोलला नाही.

गोविंदराव पाटील गावचा श्रीमंत माणूस. गावावर त्याचा रुबाब. दबदबा होता. तसाच त्याचा आदरही होता. कुणालाही आडी-अडचणीत पैस्याची मदत करण्यासाठी कधीही तयार असायचा. आणि तसं काही लिहून किंवा गहानही ठेवून घ्यायचा. त्या गोविंदरावच्या तोंडून निघालेला शब्द आपण कसा नाकारायचा. या पिढीत रघुनाथ होता. आपल्याच डोक्यातून काढलेल्या मंदिराच्या विचारासाठी सर्वजण तयार झाले. आता आपणच कसं मागं सरावं म्हणून तो गप्प बसला. तो ज्या पुऱ्यात राहात होता. त्या पुऱ्याचं नाव माळीपुरा. पण माळ्याची घरं तीनच होती. कोळ्याची. तेल्याची. भोयाची घरं जास्त होती. गावात एक जुनं हनुमान मंदिर होतं. त्यालाच वाढवून सभा मंडप बांधला. सेवाधारी रुम, भजन रुम, आवार करून ते मोठं संस्थान झालं होतं. ते गावाच्या मध्यभागी होतं. गावातील दाटी-वाटीमुळे काही लोक गावाला लागूनच सात-आठ घरांच्या पलाटात राहायला गेले. नवीन घरं झाली. पुरा वाढला. त्याला माळीपुरा नाव दिलं होतं. त्यात एखादं मंदिर बांधावं ही रघुनाथची कल्पना. म्हणून आता दुप्पटीनं द्यावे लागणारे पैसे तो नाही म्हणू शकला नाही. आणि एवढ्या लोकांत नाही म्हणण्याची त्याला लाजही वाटली. त्याची मूक सम्मती समजून सर्वांनी पैसे गोळा करण्याची तारीख निश्चित केली. कापसावर पाडव्याला सर्व पैसे जमा करायचे ठरलं होतं. मीटिंग

संपली. सर्वजण आपापास निघाले. तसा गोविंदराव पाटील म्हणाला,
"रघु अडचण असीन तं भेट एखान्द्या दिवसी''

सगळे आपआपल्या घरी निघून गेले. रघुनाथ चिंतेत पडला. त्याला या वर्षी मुलीचं लग्नही करायचं होतं. अन् मंदिराला वीस हजारही द्यायचे होते. त्याच्या जवळ केवळ दोन एकर शेती होती. त्याला लागूनच गोविंदराव पाटलाचा बायकोचा नंबर होता. रघुनाथ एवढा पैसा कुठून आणणार? म्हणून गोविंदराव पाटलाला मनाशी ठाऊक होतं. तो उसनवारी करील. किंवा व्याजानं तरी काढील. म्हणून त्याच मीटिंगमधून परतताना रघुनाथला भेटून गोविंदराव बोलले होते.

रविवारला रघुनाथच्या मुलीले पाहुणे बघायला आले. स्वत: मुलगाही आला होता. त्यानं तिला पसंत केलं होतं. पोराचे गावातील मावशी-मावशे मंदार असल्यानं त्याला अडचण नव्हती. त्यांनी त्यात भर घातली होती. मुलगा एकुलता एक होता. चार तिफना जमीन होती. त्यातील अर्धी ओलिताची होती. अर्धी कोरड वाहू. मुलगा दिसायला छान होता. मुलीलाही पसंत होता. ही सोयरिक हुकू द्यायची नाही म्हणून रुखमा रघुनाथजवळ बोलली होती. पाहुण्यांनी सरळ फायनलचा नेम दिला होता.

रघुनाथनंही तसं आपल्या पाहुण्यांना कळविलं होतं. त्याची बहीन, जावई, भानेभाऊ, आतोभाऊ, मावसभाऊ, मुलीचा मामा व मुलीकडील सगळेच नातेवाईक आणि मुलाकडील सर्व नातेवाईक फायनलला जमा झाले. रघुनाथनं दारी मंडप टाकला होता. त्यात पाव्हने मंडळी बोलण्यासाठी बसली आणि बोलणी सुरू करत मुलीचा मामा म्हणाला.

"बोला त्र्यंबक बाँ. मुलगी आता तुमी पायलीच हाये. तिकळच्या मं मंडळीले पसन हाये काय?''

"पसन हाये मनूनच आमी अती बसलो कानी.''

"बरोबर हाये, मंग कायले उसीर कर्ता, लावा टिळे.''

"हो, टिळे लाऊ. पन काई नाव तं ठेवा लागीन कानी''

"हो, बरोबर हाये तुमचं. बोला मंग''

"हे पा मी फिरून-फारून बोलनारा मानूस नो. आपल्याले सरकं अन् पन पायजे. आमीही खर्चात पळत नाई. अन् तुमीही खर्चात पळू नोका. आदर्श करू टाकू.''

त्र्यंबक हा मुलाकडून बोलत होता. त्याला मुलीकडील परिस्थिती माही होती. दोन्ही पार्टीला खर्चात पाडण्यात अर्थ नव्हता. आणि तिकडच्या मंडळींच्या सम्मतीनं तो असं बोलला होता. त्याच्या वाक्यावर थोडावेळ शांतता पसरली



मुलीच्या मामाला हे सगळं अनपेक्षित होतं. त्याला मुलगा श्रीमंत असल्यानं हुंडा मागतील, आणि तो कितीत बसवायचा हेच त्याला त्याच्या बहिनीनं व जावायानं सांगितलं होतं. त्यामुळे तो यावर काय बोलावं, यापेक्षा बहीन व जावई यांच्यासोबत चर्चा केलेली बरी, म्हणून गप्प होता. बाया दारात आडोश्याला बसल्या होत्या. पाहुणीनी तेवढ्या तळवावर गुपचूप बसल्या होत्या. मुलीचा मामा काहीच बोलत नव्हता. म्हणून सर्व शांत होते. मुलीच्या मामाला काय बोलावं कळत नव्हतं. म्हणून तो उठला व आत गेला.

"आइक्लं बाई, सांग मंग आता काय म्हन्तं.''

मुलीच्या मामाच्या मागं रघुनाथही घरात आला होता. त्याला त्र्यंबकचं बोलणं ऐकून आनंद झाला होता.

"तुमी, पक्कं म्हनून टाका.'' हे सांगण्यासाठी तो आत आला, पण बायकोच्या पुढे त्याचं काहीच चाललं नाही.

"नाई नाई, मले दारी लग्नाचा मांडव पाडाचा हाये, मले का शंबर पोरी हाईत काय?'' रुखमाच्या पुढे कोणाचंच चाललं नाही. तिचा भाऊ व नवरा गप्प बसले. दारी येऊन त्यानं लग्न करायचं आहे असं सांगून टाकलं. सर्व ठरलं. तारीख ठरली. पाहुणे आपापल्या घरी निघून गेले.

लग्नाचा दिवस जवळ येत होता. तयारी सुरू झाली होती. नातेवाईकांनी रघुनाथला काही पैसे दिले होते. काही त्याच्याकडे शेतातील कापसाचे होते. तरीही पैसे कमीच पडत होते. रघुनाथ पैशाविषयी बायकोकडे बोलला. पैशाचा व्यवहार तो एकटा करत नसे. पाडव्याला मंदिराची वर्गणी देण्याबाबतही त्यानं बायकोला सांगितलं होतं. बोलता बोलता तो गोविंदराव पाटलाले उसने पैसे मांगतो म्हणून बोलला होता. म्हणून रुखमीनं त्याला गोविंदराव पाटलाले पैसे मागायची सम्मती दर्शवली होती.

"देवासाठी देले तं काई नाई व्हत. तेवळच पुन्य पदरात पळते.'' रुखमा

"अन् पोरीच्या लग्नासाठीही मांगतो मंग. त्याईन काई लिऊन गिऊन मांगत्त तं मंग'' रघुनाथ

"देजा मंग'' रुखमा

गोविंदराव पाटलाले पैसे मागायचं रघुनाथच्या डोक्यात पक्कं झालं होतं. रुखमा मात्र स्वत:च बडबड करत होती.

"एकुलती एक पोरगी. सुखी घरी पडते. तिच्या लग्नासाठी एवढा खर्च केला तं काय बिघडते. पन पोरीचं तं चांगलं व्हते. आपलं काय आपून धावून खावू.''

तिनं नवऱ्याला गोविंदराव पाटलाच्या घरी पाठवलं. रघुनाथनं पैसे आणले.

काही कापसाचे पैसे होते. काही नातेवाईकांनी दिले होते. लग्नाची धावपळ सुरू झाली. पत्रिका काढल्या. मंडप सांगितला. कपडेलत्ते घेतले. लग्नाचा बाजार केला. मुलीले आंदन. पाना-पानाचे अहेर. जेवनावरचा अमाप खर्च. पाहुण्यांची सरबराई. पाहुनींना साड्या इत्यादी. लग्न धुमधडाक्यात पार पडलं. मुलीला दोन-तीन दिवसानं पाहुनचार करून सार केलं. नंतर राहिलेल्या पाहुण्यांना सार केलं. लग्न आटोपलं.

गणेश महाराजच्या घराले लागून उपाली बौद्धाचा खाली पलाट होता. ग्रामपंचायतनं पलाट पाडलेले होते. ते लोकांनी घेतले होते. त्याचे पैसे कुणीच भरले नव्हते. सर्वांनी आपापले पलाट ग्रामपंचायतमध्ये नोंद केले होते. पण उपालीनं मात्र तसं काहीच केलं नव्हतं. पलाटावर तो पराट्या टाकत होता. त्याला लागून काही खाली जागा होती. ती गावकरी मंडळी वापरत होती. त्या जागेवर पोळा भरत असे. गावातील एखादा कार्यक्रम होत असे. त्या जागेसहित उपालीच्या जागेवर नव्या गजानन मंदिराचं बांधकाम सुरू होऊन कॉलम उभे राहिले होते. उपालीच्या नावावर ग्रामपंचायतीत आठ-अ निघाला नसल्यानं. त्यानं आरडा-ओरड करूनही काहीच होऊ शकलं नव्हतं. त्याच्या वतीनं गावातलं कोणीच बोललं नव्हतं.

ठरल्याप्रमाणं एका संध्याकाळी गोविंदराव पाटलाचा गडी रघुनाथच्या घरी आला.

"सकाय सकाऊनच्या गाळीवर हजर रायजो म्हनून सांगत्ल बॉ तुमाले"

असं म्हणून गडी निघून गेला. नवीन मंदिराची देणगी अन् लग्नाचा झालेला खर्च रघुनाथला पाटलानं दिला होता. बोलीप्रमाणं उद्याला वावराचा सात-बारा, खरेदीखत, फोटो, इत्यादी कागदपत्रासह तो मुर्तिजापूरले जाणार होता. 'वावर,' बापजाद्याची आठवण. आयुष्यभर जगवणारी माय. तेही गेली म्हणून रघुनाथ खिन्न होता. रुखमाच्या ते लक्षात आलं होतं. तिही मनातून नाराज होती. पण ती काहीच करू शकत नव्हती. आणि ती नवऱ्याची नाराजी दूर व्हावी म्हणून म्हणाली.

"जाऊ द्या वावर गेलं तं. देवाले देल्यानं अन् एवं चांगलं लगन केल्यानं साऱ्या गावात आपली ठकन पळली, ते काय कमी हाये."

बायकोच्या बोलण्यानं त्याले आपला ताण कमी झाल्यासारखा वाटला. पण तो रात्रभर झोपण्याचे प्रयत्न करूनही त्याला झोप येत नव्हती. कुठेतरी कुत्रं भुंकत होतं. कुठे दूर टिटवी ओरडत होती. कधी घरावर मांजरीची पावलं वाजत होती. गर्भ ओरडल्यानं तो उठला आणि कागदपत्रांसह गावात येणाऱ्या सकाळच्या एसटीवर मुर्तिजापूरला जाण्यासाठी निघाला.

❦



# गडीमाणूस

थोडा वेळ वाट बघून तिनं त्याच्या घरी जायचं ठरवलं. बलावण्यासाठी म्हणून ती निघाली. दरवाजाजवळ घोटाळली. जाऊ की नको म्हणून तिनं विचार केला. आपून असं बाहेर जानं बरं नाही. लोकं काय म्हनतील. पंजाबराव काय म्हनतील. जिच्या कापायाले कुकू नाई, तिचा कोनी रखवाली नाई. पन घरचाच तं गडी आहे तो. त्याच्याकडून घेवू नये तर कोनाकडून घेवाव. पंजाबरावले तर त्याईचंच नाई झेपावत, या घरचं पायतीन का, त्या घरचं पायतीन. मग आपून काय तसंच रावावं काय. म्हनू दे समाज काय म्हनीन तं. समाजई वयकीचाच हाये, घरी जेवूनही ईकडे-तिकडे शीया भाकरी मांगते. आपूनच कावून उपाशी रावावं. जावूच दे. शेवटी तिनं दाराचा उंबरठा ओलांडला. गावातील प्रतापच्या घरी ती निघाली. आज दोन वर्षांनंतर ती घराच्याबाहेर पडली होती. लोकांनी तिला खूप दिवसांपासून पाहिलं सुद्धा नव्हतं. काहीजण नवलानं तिच्याकडे बघत, तर काही बघावं म्हणून बघत होते, काही जाणून-बुजून बोलत होते.

"कुटी चाल्ल्या वयनीसाहेब"

"कुटी नाई, पर्तापले बलावतो."

थोडं हसत ती डोक्यावरील पदर सावरत पुढे चालत राहिली. अंगणाच्या फार लांबूनच तिनं आवाज दिला.

"पर्ताप.... ओ पर्ताप.... चाल्न रे"

त्यानं लवकर घरातून निघून आपल्या मागं चालत यावं असं तिला वाटे. ती आतूर झाली. घरातून दबक्या स्वरातील आवाज बाहेर येत होता.

"हो..हो.. आलो...आलो"

म्हणत तो सरळ बाहेर येऊन चालत राहिला. त्याला थोडं वाईटही वाटलं. एवढी मोठी श्रीमंत बाई आपल्या घरालोग येनं म्हणजे लयचं झाली आपली. म्हणून तो काहीही सबब न दाखवता सरळ आपल्या मालकीनच्या मागं चालत

राहिला. त्याला एखाद्या मोठ्या व्यक्तीला दारावर येऊ देनं, एका दृष्टीनं अ
व एका दृष्टीनं स्वतःचा मोठेपणाही वाटत होता. काहीही न बोलता ते गायवाड्यात
आले. मालनबाईनं दरवाजा लावला व म्हणाल्या,

"तुले ताले कामं समजत नाईत काय? मानसानं मानसाचे कामं करावं, तुलं हेनं कामी मनीनं तं मले सांग."

त्याला मालकीन बाईचं बोलणं वेगळंच वाटलं. त्या आजकाल अधून-मधून असंच विषयाला सोडून बोलतात. म्हणून त्यानं काहीही न बोलता टोपलं उचललं व तो शेन काढू लागला. तो काहीच बोलला नाही. म्हणून ती थोडी मनातून चिडली व त्याच्यापासून थोड्या अंतरावर जाऊन उभी रायली. तो आपलं टोपलं भरून घाई-घाईनं मागील दरवाजातून बाहेर शेन टाकून पुन्हा टोपलं भरत होता. आपण शेन काढताना मालकीन आपल्यालेच पायत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. तो आणखीन लाजून अंगचोरत वागू लागला. कमरेला शेव खोचू मालकीन बाजूच्या दरवाजातून घराकडे निघून गेली. जाता-जाता त्या म्हणाल्या,

"शेन उचलल्यावर माळीवरचं तुरीचं मातेर आन खाली, बाया येतात धुवाले"

गायवाड्याची पुढची बाजू व घराच्या दरवाजाची पुढची बाजू एकमेकांन समान्तर होत्या. घराच्या डाव्या बाजूच्या दरवाज्यानं गायवाड्यात येता येत होतं. गायवाड्याचा मागचा दरवाजा म्हणजे शेनखताचा दरवाजा. चार-पाच टोपले शे बाकी असतानी मालकीन गेल्या. त्यानं अंग सैल सोडलं. चेहऱ्यावरील आवरलेल्य नसा सोडून दिल्या. आता रिकामं टोपलं घेऊन येताना त्याचे पाय-पायाला लाग नव्हते.

शेन उचलून तो माडीवर गेला. मालकीन सकाळचं जेवन बनवण्यात गुंतलं असावी या समजानं तो मंदगतीनं माडीवर जाऊन उभा राहिला. उजव्या कोपऱ्या तुरीचं मातेर होतं. त्याच्या बाजूला खताचे रिकामे पोते पडले होते. टोपल्या न्यावं की पोत्यानं न्यावं म्हणून तो विचार करत मातेऱ्याच्या ढिगाऱ्याकडे जाऊ खिडकीजवळ उभा राहिला. तेथून पुढे पाहिलं की गाव दिसत असे. काहींचं लक्षात येणारं घरापुढील अंगण दिसत होतं. काही ये-जा करणारी गावात बाया-मानसं दिसत होती. ढोरं-वासरं एखाद्या घराच्या बोळीत उभी असल्या दिसत होती. दूरवरची नजर जवळ येत येत त्यानं खाली पाहिले. न्हानीत अंघो चालू होती. तो पटकन जागचा हालला. आपल्याला कुणी पाहिलं तर नाही याची त्यानं खात्री केली. लगेच त्यानं मातेरं भरण्यास सुरुवात करून तो मा आणू लागला. आणखी एकदा हळूच डोकावून पाहावं असं त्याला वाटलं. प त्यानं स्वतःला आवरलं. मालकीनच्या लक्षात आलं तर. पंजाबरावांना दिस



तर. त्याच्या मनात थोडी भीती उत्पन्न झाली. तो मातेरं भरू लागला. पण त्याच्या मनात काहीतरी सुरू झालं. त्याच्या चालन्यात थोडा मंदपणा आला होता.

"कितीक झालं रे" केस सुकवत मालकीन बोलली.

तो भानावर आला. त्याची गती वाढली. तिला टाळून तो निघून गेला. त्याच्या नजरेत नवतारुण्यातील गोंधळलेपणा होता.

बाया येऊन मातेरं धुऊ लागल्या. प्रताप धुतलेलं मातेरं पुन्हा माडीवरती नेऊ लागला. येताना पाटीत नवीन मातेरं आणत होता. बायांसोबत गप्पाही मारत होता. त्यातील काही आवाज मालनबाईच्या कानावर यायचा. तिला वाटलं. प्रतापनं घरात येऊन आपल्या सोबत गप्पा कराव्या. आपल्या आजूबाजूला फिरावं. क्षणभर आपणही त्याच्या सोबत थट्टा करावी. 'नायी वाड्यात बाया हायेत, बाया काय म्हनतीन, मालकीननं मालकीनसारखं वागावं. घरच्या नौकरगड्याले एवढं लाडावून घेवू नये.' तिच्या मनातली इच्छा तिनं मारून टाकली. जेवन करून तिनं घरातील टी.व्ही. लावली. आवाज पूर्ण कमी केला. रिमोटने एक-एक चायनल, चित्र ती बघू लागली. पुढे जाऊन पुन्हा एक चायनल ती मागे आली. आवाज कमी असल्याची पुन्हा खात्री केली. हात थरथरत होता. तिला सर्व जग, वैभव व्यर्थ वाटू लागलं. तिनं रिमोटनं चायनल पुढे नेले. सह्याद्री लागलं. टी.व्ही. बंद झाली. तिनं रिमोट बसल्या खुर्चीत फेकलं. काहीतरी निर्णय घेऊन ती उठली. घाई-घाई जाऊन तिनं बाहेरच्या विहिरीवरील पडलेला दोर आजूबाजूला बघून आत विहिरीत लोटून दिला. गायवाड्यात जाऊन तिनं आवाज दिला.

"पर्तप काय कर्त रे"

"काई नाई, घास बनवत होतो, म्हसीचा"

"आताच"

"हो, रिकामा होतो म्हनून"

"अरे ईरित दोर पळ्ला, काळ बरं तेवळा"

"बरं"

त्यानं गायवाड्यातील मोठी सोपल घेऊन विहिरीच्या खिराडिला बांधली. अंगातला शर्ट काढला. विहिरीत उतरला. मालनबाई तेथे न थांबता आत गेल्या. घरातील आतील बाजूस जाऊन त्या पाहात होत्या. तो विहिरीत उतरल्यावर त्या पुन्हा आल्या.

"लागलारे ठाक"

"हो, लागला. पानी उतळ हाये ना." आतून खोल आवाज आला.

'तिला क्षणभर वाटलं. याला विहिरीतला ठाक लागला, पण आपल्या

मनातील ठक बसा अजून लागला नाही. बायाच्या जातीनं बोलावं तरी …
बघावं कसं हिम्मतवालं असावं'.

"काय चाल्लं हिरीत" पंजाबराव येत बोलला.

ती एकून उठली. तिची धांदल उडाली.

"काई नाई, दोर चढला होता, पर्तापले काळ्याले लावून गयलं"

ती बोलाय धरत गेली. पंजाबराव तिचा लहान दीर. गोविंदराव मधला … सर्व झाले. तत्पूर्वी त्यांनीच आपल्या हातानी हिस्सा-वाटण्या केल्या … पंजाबरावची बायको वेगळ्या विचाराची होती. तिला विभक्त पाहिजे होतं. … झगडा लावून तिनं पंजाबरावचं डोकं खाल्लं. शेवटी वाद होऊ नये म्हणून वेगळं बरं म्हणून दोन वाटे पाडले. सर्व अलग अलग झालं. गोविंदरावच्या मृत्यूनंतर या मोठ्या घराचं घर म्हणून पंजाबराव लक्ष देऊ लागला. गोविंदरावची पोरं त्यांनी अमरावतीच्या घरी ठेवली. आपले एक व भावाची दोन असे तीन … इंग्रजी शाळेत शिकत होती. त्यांच्या सोयीसाठी म्हणून आपली म्हातारी मदत … ठेवली. ती तीन नातवांचं करायची. अधून-मधून पंजाबराव, कधी मालनबाई … लेकाच्या भेटीसाठी अमरावतीला चक्कर व्हायची. पंजाबरावच्या बायकोला नवऱ्याने … मालनबाईच्या घरातील व्यवहार बघणं आवडायचं नाही. त्यानं तिकडे फिरकू नये असं तिला वाटत असे. ती तोंड करायची व घरातच नवऱ्याला खडसावून सांगायची.

"येनू द्या आपस टोले, काई नाई किराना आनून द्या लागत"

तरीही तो तिच्या चोरून तिला घर-व्यवहारात मदत करायचा. पंजाब… विहिरीजवळ थोडावेळ थांबला व म्हणाला,

"एवढ्यात परीक्षा होतात पोराईच्या चालू, येता का भेटून त्याईले"

"नाई, तुमीच या"

'हो बरं म्हटलं सकाय उभ्या-उभ्या' म्हणत पंजाबराव दारातून … दारूकनं आजूबाजूला न्याहाळत निघून गेला. मालनबाईला वाटलं, … बघनं पंजाबरावले खटकलं असावं. खरं तर आपून बशाले नोतं पायजे … पंजाबराव येतील याचा आपल्याले अंदाजई नोता. त्याईच्या लक्षात आलं … काय ते. ते काय ईच्यार करतील आपल्या विषयी. वयनीची चालचलन काई … दिसत नाई. गमावतात नाव आपल्या घराचं', 'खरंही हाये त्याईचं. पन … समजाले पायजे की, मानसाले काई पोटभर अन्न असलं म्हनजे झालं … विषय बाईले मन नसते काय. ते तं मानसाच्या मरनालोग सोबत … मनासारखे काय कसाही, कुठीही यज्ञ करता येते. पन बाईच्या जातीले …



असते. काई समाजाले भियाचं काम नाई. पन, पन प्रसंग कसा घडून आनावं. प्रताप शरीरान दनकट हाये. पन मनानं लय पोचट. त्याले फिरून बोलनं समजत नाही. एकन तो दुर्लक्ष करत असीन. मगाशी नाई काय आपून चार-पाच टोपले रायले तसे आंगोळीले बसलो. मग तो मातेरसाठी माडीवर येनार होताच. त्याले दिसावं म्हनून तं आपून न्हानीत बसलो. त्यानं पायलई आपल्याले. म्हनूनच त्यानं मातेरं नेतानी आपली नजर चुकवली होती. आज आपून काहीई करून. ती चालत गोठ्यात गेली. प्रताप विहिरीतून वर आला. त्याचा पिळदार उघडा देह नजरेत भरत होता. शर्ट घालून तो ओल्या अंगाचा घरी गेला होता. पुन्हा संध्याकाळच्या चारापाण्यासाठी परत येणार होता. संध्याकाळची ढोरं आली. गायी म्हशीचं दूध देऊन त्याला दूधवाल्याकडे ते सुपूर्त करायचं होतं. तो आपल्या कामात असतांनी मालकीनबाई म्हणाल्या.'

''जातांनी दरवाजा बन करून जाजो, सकाऊन येतानी आजच्या सारखा ऊशीर करू नोको लवकर येजो.''

सकाळी प्रताप येऊन त्यानं गोठ्यातलं शेनपानी केलं. झाड-झूड केली. घरातून चक्कर मारला. सर्व सामसूम होती. आज देवपूजा झाली नाही म्हणून त्याच्या लक्षात आलं. मालकीनबाई अजून झोपूनच होत्या. त्यानं घरातलं पाणी भरून टाकलं. झाडायचा आवाज व्हावा त्यासाठी त्यानं जोराने झाडू मारत सर्व आवार झाडला. खरं तर हे कामं त्याच्या कामात येत नाहीत तरीही एखाद्या वेळेस तो सहज म्हणून करायचा. आताचा वेळ काम नाही म्हणून त्यानं तेथे घालवला.

''परताप पंजाबराव गेले कारे अमरावतीले.'' मालकीनबाई.

''हो-हो सकाऊनच. जाता-जाता त्याईन मले सांगतलं.'' प्रताप थोडा सावध होऊन बोलला.

''गाई-म्हशीचं झालं''

''हो, मंगाच झालं.''

''अस्स कर बोरटीत चक्कर मार उभ्या-उभ्या, गऊ कसा हाये तं. अन् संध्याकाई लवकर येजो, जाय आता''

त्यानं हातचा फडा टाकला. वाड्याच्या बाहेर येत बोरटीची वाट धरली. तिकडूनच परत येऊन तो सरळ घरी जाणार होता. पूर्णदिवस घरी आराम करून संध्याकाळी मुक्कामासाठी तो वाड्यावर येऊन गायवाड्यात झोपणार होता. पंजाबराव बाहेरगावी गेले की, त्याची गायवाड्यात झोपायची ड्युटी लागायची. दोन्ही गायवाड्यात भरगच्च ढोरं. मोठ-मोठी घरं. दोन्ही घरांत एक-एक बाईमाणूस. सर्व वाडा शांत. म्हणून त्याला रात्रीचं झोपण्यासाठी बलवण्यात येत असे. त्या रात्रीची

त्याला एक मजुरी जास्त मिळायची. त्यामुळे त्यालाई बरं वाटे. संध्याकाळचं जेवन मिळायचं. नरमगादी व अंगावरील सुगंधी पांघरूण मिळायचं. म्हणून तोही मनातून थोडा हरिकला होता. बोराटीचं शेत केव्हा आलं तेही त्याला समजलं नाही. शेतातून त्यानं चक्कर मारली. गहू अजून भरायचा होता. सगळ्याच शेतीची देखरेख एकट्या बाईला बघून होत नसल्यानं मालकीनबाईनं ते गव्हाचं शेत बटाईनं लावून काढलं होतं. शेताचे चारही कोपरे फिरूनही प्रतापला शेतात कुणीच दिसलं नाही. तोही घराकडे निघाला. संध्याकाळी त्याची बायको कापसावरून आली होती. हातपाय धुऊन कापूस मोजण्यास गेली होती. त्याचं लहान लेकरू त्याच्या म्हाताऱ्या दिसणाऱ्या आईकडे होतं. प्रताप लाडिकपणे त्याच्याशी बोलू लागला. त्याला खेळवू लागला. संध्याकाळच्या जेवणाची वेळ होईपर्यंत मुलाजवळ खेळला. बायकोनं जेवणास हाक मारल्यानं तो जेवू लागला. जेवता-जेवताच मी खटल्यात झोपण्यासाठी जातो म्हणून त्यानं सांगतलं. त्यावर बायको म्हणाली,

"कापूस पंजाबराव नाईत का घरी"

"नाई ते अमरावतीले गेले, पोराईच्या परीक्षा हात म्हनून"

"मंग आपल्या घरी कोन हाये"

"आपल्या घरी कोन पायजे"

"तवा कायले पायजे"

"अवं तवा ढोरं-वासरं हात कोठ्यात अन् ते बायाही भेकाडया हात"

"असू द्या असल्यातं काई नाई जा लागतं"

"अवं मजुरी भेटतेना, फुकट हावो काय"

"मंग जा बॉ, तुमच्या मतानं, मंग जेवले कायले घरी"

"मले सरम लागते तती जेव्याची"

प्रतापच्या घरीही कुणी नव्हतं. एक आई होती. ती प्रतापच्या वडिलांच्या झालेल्या अचानक मृत्यूमुळे स्वत:ला म्हातारी समजत असे. आपल्या घरी ताटात येईल ते चुपचाप खात असे. प्रतापची बायको अन् प्रताप वयानं तसे लहानच होते. वडिलांच्या मृत्यूमुळे त्याचं लग्न कमी वयात केलं होतं. प्रतापची बायको तान्ह मूल सासूकडे ठेवून पोटातल्या गर्भासहित कामधंद्यास जात असे. नवऱ्याचं असं वाड्यात, खटल्यात झोपायला जानं तिला मान्य नव्हतं; परंतु मजुरीसाठी आणि तेही मालकीनकडे जावं लागते म्हणून ती जाऊ देत असे. प्रतापनं जेवन होता बरोबर रात्रीचा अंधार तुडवत कोईपुऱ्यातून मालकीनच्या घराकडे निघाला. वाड्याचा दरवाजा उघडाच होता. त्याला लागून त्याच भितीच्या शेवटच्या टोकाला गायवाड्याच्या दरवाजातून तो आत जायला निघाला. टिनपत्र्याचा दरवाजा त्यानं



लोटला तसा तो दचकला. दावणीतून काही थापराची जागा रिकामीच होती. तेथे बाज टाकून मालकीन उभ्या होत्या. तो थोडा सरमला. मग घाबरला. घाई गडबडीनं जाऊन तो गोठ्यातून उगाच वैरण उचलून टाकू लागला.

"जेवून आला वाट्टे"

"हो जीवून आलो" तो खालच्या मानेनं बोलला.

"लयच उशीर केला"

"हो, ते कापसाले गेल्ती ना म्हनून भाकर टाक्याले उशीर झाला"

"अस्सं, पायजो रात्रीचं, तो दरवाजा-गिरवाजा बराबर लाव"

मालकीन निघून गेली. उगाच वेळ घालवण्यासाठी जनावराजवळ उभा असणारा प्रताप बाजीवर येऊन बसला. मालकीन गेल्याची खात्री करून तो बाजीवर आडवा झाला. अंथरूण अंगाला मऊ लागलं. त्याला एक सुगंध होता. त्यातील एक वाकय त्याला ओळखीची वाटली. भर कापसावर तो एक सोबती घेऊन, बैलगाडीसह राखणीला जात असे. त्यावेळी असणारी वाकय ती हीच म्हणून त्याला आठवली. मोकळ्या हवेतही त्यानं उगाच वाकय अंगावर घेऊन झोपल्यासारखं केलं. हवेत गारवा होता. दिवसभऱ्याच्या कामानं प्रताप थकून जात असे. सकाळी लवकर उठून शेन-पाणी करावं, नंतर घरी जाऊन पुन्हा कामावर येऊ. एवढ्यात त्याला मंदिरातील हरिपाठाचा आवाज अचानक वाढल्यासारखा वाटला. तो सारखा घुमत घुमत मंद होत गेला. रात्र वाढत होती बाहेर अंधार होता. त्याला अंगावर ओझं पडल्यासारखं झालं. म्हणून तो उठायला लागला. तसा तो घाबरला. उठायची त्यानं धडपड केली. पण तो उठू शकला नाही आणि तेथून पुढे तो झोपूही शकला नाही. एकीकडे त्याच्या मनात आनंद होता. तरीही दिवस उजाळण्याची तो सारखा वाट बघू लागला. आणि लवकरच दिवस उजाळल्यासारखं वाटलं. तिचा यज्ञ संपला होता. तो एकटा झाला. त्याने उठून शेन-पानी केलं, गोठा झाडून काढला आणि घराच्या दिशेने निघाला. तो गावातून घरी जाऊ लागला तेव्हा कोळीपुऱ्यात कुणी उठलं नसल्याचं त्याला जानवलं. घरी जाऊन त्यानं दरवाजा वाजवला. त्याची बायको जांभया देत म्हणाली,

"लवकरचं आले"

"लवकरच आलो? दिवस निघाला ना बयाळे"

"अजून तं लयं रात हाये, शेन-पानी कऱ्याले जाता का डबल"

"नाई वं शेन-पानी करून आलो मी"

"एवढ्या लवकर"

बोलता-बोलताच त्यानं अंथरुनावर अंग टाकलं अन् तो झोपी गेला. त्याच्या

बायकोनं घरकामाला सुरुवात केली. दिवस निघून ऊन तापू लागलं तरी तो झोपेतून उठला नाही.

मालकीन प्रतापची वाट बघत होती. खूप वेळ होऊनही तो आला नाही म्हणून ती त्याला बलावण्यासाठी निघाली. बाहेरूनच आवाज देऊ लागली. तो कानावर आला तशी त्याची बायको म्हणाली,

"अजून झोपेलच हात. राती शेन-पानी करून आल्यावर डबल झोपले. उठू काय?"

"हो उठवनं. कामावर येत नाई का म्हना"

तिनं जवळ जावून उठवलं तसा तो गडबडीत उठत म्हणाला,

"काय झालं, किती वाजले?"

"अवं मालकीनबाई आल्या बलाव्याले"

"हो येतो म्हना तोंड धुवून"

ती मालकीनबाईला सांगण्यासाठी बाहेर आली तेव्हा ऐकण्यासाठी तेथे मालकीन हजर नव्हती. ते वापस गेल्याचं तिनं नवऱ्याला सांगितलं. प्रताप उठून कामावर जाण्यासाठी आवरा-आवर करू लागला. तो वाड्यात पोहोचला तेव्हा मालकीन काहीतरी कामात होत्या. प्रताप आल्याचं त्यांना दिसलं. तिनं त्याला वावरातून चक्कर मारून यायला सांगितलं. प्रताप तिची नजर चुकवत होता. न बोलता होकारार्थी मान हलवून तो चालायला लागला. चक्कर मारून दुपार झाली असल्यानं तो सरळ घरी आला. वाड्यावर जाण्याची त्याची हिम्मत झाली नाही. तो दिवसभर घरीच अंथरूणात लोळत राहिला. त्यानं फारस जेवनही केलं नव्हतं. त्याला झोपही येत नव्हती. त्याच्या डोक्यात सारखं काही-तरी तरळून जायचं. कोणाकडे काही सांगता न येण्यासारखं. कधी आनंद तर कधी भीती निर्माण करणारं.

संध्याकाळच्या शेन-पान्याची वेळ झाल्यानं तो सरळ गोठ्याकडे निघाला. दरवाजा उघडून आत गेला. शेन-पानी करू लागला. त्याच्या वाट्याची ढोरं त्याची वाटच बघत होती. त्यानं पाणी पाजून ढोरांना वैरण घातली. उगाच थोडंसं झाडावं म्हणून झाडलं. सगळं शांत होतं. तो घरी जाण्यासाठी निघाला. तसं मागून आवाज आला.

"परताप लवकर येजो जेवून, पंजाबराव आले नाईत, अजून"

त्यानं आवाजाच्या दिसेनं मागं वळून पाहिलं. मालकीनबाई घराकडील दरवाजात उभ्या होत्या. त्यानं हो आलोच" म्हणून चालायला सुरुवात केली.

तो पटकन जेवन गायवाड्यात झोपण्यासाठी आला. ऐस-पैस घर. रात्रीच्या अंधारात देनी वाड्यात भीती वाटावी असा अंधार पडे. थोडाफार उजेड असूनही ती शांतता भयाण वाटे. किमान गायवाड्यात का होईना पण माणूस असावा. म्हणून पंजाबराव नसल्यानं त्याला झोपण्यास यावं लागे. तो आला तेव्हा बाज टाकलेली होती. कुणी टाकलेली आहे त्याला माहीत होतं. का टाकली तेही माहीत झालेलंच होतं. थंडगार मऊ अंथरूणावर तो लोळला. थोडा वेळानं त्याला अचानक जाग आली. मंदिरातील हरिपाठाचा आवाजही येत नव्हता. त्यानं वेळेचा अंदाज घेण्याचा प्रयत्नही केला नाही. आता त्याची भीती कमी झाली होती. तो मोकळा वागत होता. सकाळी-सकाळी त्याला एकान्त मिळाला. तो झोपला. शेन-पान्याची वेळ निघून गेली होती. आजूबाजूचे आवाजही वाढले होते. गायवाड्याचा दरवाजा लावून होता. तो अजूनही झोपूनच होता. जाग येऊनही उठू नये असं त्याला वाटे. शरीर थकल्या सारखं वाटू लागलं. तरीही तो उठला. घाई-घाई त्यानं झाड- झूड केली. शेन-पानी करून तो घरी आला.

प्रताप स्वभावानं शांत. अबोल होता. सोशिक होता. आपल्या गरिबीमुळे त्याला कामधंदा करावा लागे. सारखा वर्षभर तो कामात असायचा. तो प्रामाणिक व मेहनती असल्यानं, पंजाबरावनं त्याला कामावर ठेवलं होतं. स्वत:च्या खटल्यात ते इतर गडी माणसं लावून काम करून घेत. त्याच्या मागे ते स्वत: राहात असत; परंतु आपल्या भावाच्या घरी फक्त बाईमाणूस असल्यानं गडीमाणसाच्या मागं राहाणं शक्य नव्हतं. म्हणून घरची, शेतीची प्रामाणिकपणे कामं करणारा घरगडी असावा म्हणून ते प्रतापलाच कामाला सांगत. आज कित्येक वर्षांपासून तो मालनबाईच्या कामावर होता. त्यामुळे पंजाबराव निश्चिंत होऊन आपल्या कामात असत. जबाबदारी म्हणून अधून-मधून प्रतापला येऊन उगाच काही कामं सांगत. मालनबाईकडील कामाचे निर्णय घेत. मालनबाईसुद्धा त्यांच्यापुढं काही बोलत नसे. प्रतापवर ते कामाचा गडी म्हणून खूष होते. त्याला सालगडी म्हणूनच ते वागवत असत. यंदाचं पेरणं-फेर-पीकपाणी सर्वच त्याच्याच हातून झालं होतं. उन्हाळी पिकंही त्यांच्याकडूनच सावळलं जात होतं. बाया जातील त्या वावरातून संध्याकायची गाठोडी आणण्याची, ती मोजण्याची व गंजी घालण्याची सर्व कामं त्याचीच होती. दिवस व रात्रीचा खूप वेळ त्याचा वाड्यावरच जायचा. गोठ्यातील-घरातील, शेतातील सर्व कामं त्यालाच बघावी लागत असत. त्याला घरी जाण्याची सुद्धा फुरसत नसे. कित्येकदा पंजाबराव त्याला उगाच मोठ्या आवाजात काम सांगून निघून जात. तो न बोलताच ती करायचा.

याही वर्षी भरपूर पीक झालं होतं. शेतात गहू पेरला होता. त्याचं पाणी देणं सुरू होतं. प्रचंड थंडी पडू लागली. इतर गडीमाणसं पाणी देत असतं. पंजाबराव आपल्याच हिश्यातील हिस्सा म्हणून सर्वच शेतातून चक्कर मारून येत. गड्याकडून

काम करून घेत. संध्याकाळी पंजाबराव घरी आले. जेवणानंतर आरामात बसले. बोलता-बोलता त्यांची बायको म्हणाली,

"परतापपेक्षा इतरही गडी माणसं कामाचे हाईत"

"काऊन काय झालं, परताप कामाचा नाई काय"

"हाये, पन वळीमानसाले एवळं घरात वावरू देऊ नये"

"कन्चे काय झालं"

"काई नाई, पंची म्हातीन म्हने, पातीवर परतापच्याच गोष्टी अस्तात."

"काय्च्या"

"असाव तुमच्या वयनीच्या बाऱ्यात, लोकाईच्या तोंडावर बोट ठेवता येते काय"

पंजाबराव थोडा गडबडलाच. पुढे काय बोलावं त्याला सुचलं नाही. विषय न बदलताच तो काय ते समजला. गाव काय बोलत असीन. आपून गावचे पाटील, जमनदार. आपलं नांव काय. उद्या आपल्याले नाक राहाणार नाही. भाऊ मेला त्यापासून वहिनी एकट्याच हायेत, आपून व्यवहार पायतो. जवान गडी माणसं घरी कामाले असतात. लोक चलकाईच बोलू लागले. कदाचित ते खरंही असू शकते. पण प्रताप तसा नाही. वहिणीही तशा नाहीत. पण काय सांगता येते, जवानी होय ते. पण आता काय करावं. प्रतापले कामावरून बंद करावं त चर्चा लय वाढते. चालू ठेवावं त प्रकरण वाढते. पंजाबराव सारखा बाजू बदलत होता. त्याला झोप येईना. काय करावं समजेना. मध्यरात्र उलटूनही तो जागाच होता. शेवटी कसली तरी योजना आखणं मनात सुरू झाली. ती योग्य नाई. म्हणून दुसरी, तिसरी. रात्र उलटली. सकाळ व्हायला लागली. त्याच्या योजना चालूच होत्या. सकाळचे आवाज, रेडिओ, आरती ऐकू येऊ लागली.

गहू फलायला लागला. हिस्सावाटणी नंतरही पंजाबराव शेताची काळजी घेत. दोघांचे शेतं एकालाएक लागून होती. विहिरीचं पाणी दोघंही घेत. मालकीणचा गहू होता. पंजाबरावचा भाजीपाला होता. पंजाबरावाचे काही दिवस विचार करण्यातच गेले. तोपर्यंत पंजाबरावची खात्री झाली. त्याला पायबंद घालण्याचा ते विचार करत होते. आपल्या वहिणीस काही म्हणू शकत नव्हते. जाणारी अब्रू रोखू शकत नव्हते. ते श्रीमंत असल्यानं मात्र गावात उघड-उघड चर्चा नव्हती. मोठ्यातली मोठी गोष्टही चपत लपून राहायची. पण पंजाबरावाची चिंता मात्र वाढू लागली. प्रताप काम करत बराच वेळ वाड्यात जायचा. पंजाबरावला हे दररोज कळत असे. त्या दिवशी खूप वेळ होऊनही प्रताप वाड्यात काम करीत होता. पंजाबराव जेवण करून आले. खूप रात्र झाली होती. प्रतापला हळूच म्हणाले,

"परताप, अरे बाळ्या तेली आल्ता सांग्याले तुमच्या बोराटीत गवात ढोरं हात



म्हनून, जाय ये बरं पावून"

हातचे काम सोडून प्रताप जायला लागला. दरवाजातून परत येऊन म्हणाला,

"ते किसान टार्च होती ना?"

"हो, हो त्या खुटीले हाये ते घेऊन जाय, अन् हाती काठीही नेजो"

प्रताप गायवाड्याकडच्या दरवाजातून बाहेर जात होता. मालकीन सर्व बघत होती. पंजाबराव पुन्हा प्रतापच्या पाठीमागं जाऊन हळूच म्हणाला,

"पर्ताप एकटाच जाजो, सोबती नोको नेवू, अन् लवकर येजो"

प्रताप हिम्मतबाज होता. तो रात्रीला एकटाच शेतात जात असे. आताही तो एकटाच जायला निघाला. गायवाड्यात रात्र असल्याने शांतता होती. दोन्ही वाड्यांत थोडासा उजेड तेवढा होता. बाकी सामसूम होती. प्रताप गेल्यानंतर पंजाबराव आपल्या घरी आले व अंथरूणावर शांत पडले. रात्र गेली.

सकाळी ऊन पडलं. आपला प्रताप घरी आला नाही. सकाऊनही आला नाही. प्रतापची स्वत:ला म्हातारी समजणारी आई वाड्यावर आली. मालकीनला प्रताप विषयी विचारलं. मालकीन म्हणाली,

"सयसंध्याकाई सकायच्यासाठी तो मातेरं काढत होता. अचानक न सांगता गेला. मले वाटे का घरीच गेला. मीच त शेन-पान्यासाठी त्याची वाट पाऊन रायली."

"हट माय थो तं घरीच नाई आला. मी म्हनो अतीस हाये", प्रतापची आई काळजीत पडली. गावात फिरून दिसेल त्याले विचारू लागली. तिची काळजी वाढली. विचारणाराले 'त्यानं सांगून तं जा लागत व्हतं.' असं म्हणू लागली. बाया-मानसं कामावर जाऊ लागली. प्रतापचा पत्ता नव्हता. कोणी तरी गावात येऊन सांगू लागलं.

"परताप मालनबाईच्या बोराटीनं मरून पळेल हाये" प्रतापच्या आईच्या व बायकोच्या चिंतेला आता मोठ्या दुःखानं वाचा फोडली. त्या धाय मोकळून रडू लागल्या. रडण्यानं सर्व गावात बातमी पसरली. कामावरील बाया-माणसं गावात परत आले. जाणारे थांबले. प्रतापच्या घराभोवती जमली. काही बोराटीत प्रतापला आणण्यासाठी गेली. सगळी मानसं बोराटीच्या रस्त्यानं दिसू लागली. प्रतापच्या घरी आरोय पडला. पंजाबरावही शेतावर गेले. लोकांसोबत प्रेत घेऊन गावात आले. प्रतापच्या घरातील रडणं गाव बघत होतं. प्रतापची आई, बायको, बहीण, डोक्याचे केस सुटू बेभान होऊन लोटांगण घेत होत्या. लोकांनी सोयऱ्यांना निरोप धाडला होता. काही आली, काही यायची होती. प्रेत बघून गावातील आयाबाया जात होत्या. पोलिस आले. पोलिसांनी पंचनामा केला होता. पंजाबरावच्या घरी पोलिसांना चहापाणी झालं. कुणी म्हणे पोस्टमॉर्टम करा. कुणी म्हणे पंजाबरावचा



2881

रिपोर्ट द्या. कुणी म्हणे, त्याच्याच वावरात मेला. कोणी म्हणे त्यानंच मारला. कोणी म्हणे त्याले वावर मांगा. दिवस मावळतीला लागला. मालकीनबाई बघायला आली. प्रतापची आई तिच्याकडे बघून म्हणाली, "पा ना बाई परतापले, आता आमी कोनाच्या भरोश्यावर जगू. त्याच्यापेक्षा मी काऊन नाई मेली." मालनबाई न बोलता निघून गेली. मानसांनी त्याला जाळण्यासाठी लाकडाची व्यवस्था केली. पंजाबरावच्या घरून लाकडं पांढरीत गेली. प्रेत उचललं तेव्हा एकच गलबला झाला. असं करा, तसं करा, म्हणत प्रतापचं प्रेत जाळून टाकलं. प्रतापची आई, बायको, बहीण, लेकरू, सर्व दुःखातच होते. घर भकास होतं. लोकं म्हणत, मालकीनकडून दोन एक्कर वावर घ्या लागत होतं. कुणी म्हणे अजूनही पंजाबरावना रिपोर्ट द्या. अक्कल देणाऱ्या बाया सल्ला देत. प्रतापच्या घरचे मात्र बोलायच्या मनःस्थितीत नव्हते.

काही दिवसानं लोकांना समजलं पंजाबरावनं वावरात करंट लावून प्रतापला मारलं. पोलिस पंचनाम्यात 'प्रताप पंजाबरावच्या वावरात चोरी करत्याले गेला असावा, आणि करंट लागून मेला' असं लिहिलं असल्याचं समजलं. पंजाबराव पैस्यावाला होता. त्यानं आपल्या आमदार असलेल्या नातेवाईकाकडून पैसे भरून केस दाबून टाकली. गरीब असणाऱ्या प्रतापच्या आई, बायकोला हे सगळं कळत नव्हतं. कोणत्या सोयऱ्यानंही त्यांची बाजू घेतली नाही. दोन वेळच्या जेवणासाठी कष्ट करावे. राबावे. एवढंच त्यांना कळत असे. नातेवाईक. गावकरी यांनी पैसेवाल्या पंजाबरावच्या विरोधात बोलणं टाळलं. सर्व गावात प्रताप कसा मेला कोणं मारलं हे माहीत झालं. पण कुणीही बोलत नसे. मालनबाईलाही हे सगळं कळलं होतं, पण ती काहीही करू शकली नाही. पंजाबरावची ही करामत कशासाठी होती हेही तिला माहीत होतं. प्रतापने आपल्या वाट्याचा घास खाल्ल्याचं दुःख पंजाबरावला झालं होतं; परंतु मालकीनबाईला पंजाबरावपेक्षा गडीमाणूस शोधायचा होता. मालकीनबाईला आता नव्यानं घरकामासाठी गडीमाणूस शोधावा लागेल याची चिंता होती. ती गडीमाणसाच्या विचारातच मग्न उभी होती.



# उसनवारी

मृगात पाऊस आला. शेतकरी मनातून लदबदले. कामधंद्याची घाई सुरू झाली. सकाळीच गडीमाणसं बैलजोडीसह शेतात जाऊ लागले. काही ठिकाणी ट्रॅक्टर जात होता. बाया काळे-फनं वेचण्यास जाऊ लागल्या. गावातली जि.प.ची शाळा उघडली. लेकरांनी कपडे, पुस्तकं, यांची मागणी सुरू केली. शेतीसाठी लागणारा पैसा, नि लेकराच्या शाळेसाठी लागणाऱ्या पैशामुळे शेतकरी अडचणीत आले होते. कुणी कर्ज काढून पैसे जुळवत होते. कुणी उसनवारी करून पैसे जुळवत होते. शारजानं उन्हाळाभर काम करून घर चालवलं होतं. तिचा नवरा काशीनाथ कधी कामाला जायचा, तर कधी दारू पिऊन पडायचा. शारजाच्या मजुरीचे पैसे तो परस्पर उचलून घ्यायचा. अश्रूनेही उन्हाळ्यात मजुरी केली होती. बाजारहाटाला मदत केली होती. त्याची शाळा सुरू झाली होती. पण त्याला जाण्यासाठी पैसे नव्हते. म्हणून अश्रू चिंतेत पडला होता.

अश्रू हा औरंगाबादला शिकत होता. शेजारच्या गावातल्या शाळेतून त्यानं बारावा वर्ग पास केला आणि पुढील शिक्षणासाठी त्याची आई शारजानं त्याला आपल्या माहेरातल्या दूरच्या भावाबरोबर औरंगाबादला पाठवलं होतं. ती माहेरला गेली की, औरंगाबादच्या गोष्टी निघत. तिथे डॉ. बाबासाहेबांनी गरिबांच्या लेकरासाठी शाळा काढली. कोणतीच फी पडत नाही. उलट शिकणाऱ्यालेच स्कॉलरशीप भेटते. तिच्या माहेरातल्या औरंगाबादला शिकायला गेलेल्या पोरांनी शाळा शिकून मोठ-मोठ्या नौकऱ्या मिळवल्या होत्या. म्हणून तिनं आपला मुलगा अश्रू बारावी पास झाल्याबरोबर शिक्षणासाठी औरंगाबादला पाठवण्याचा आग्रह धरला. पैशाची जुळवा-जुळव करून, तिनं माहेरातल्या औरंगाबादला जाणाऱ्या पोरांबरोबर अश्रूलाही कागदपत्रासह पुढच्या शिक्षणासाठी औरंगाबादला पाठवलं होतं.

शारजाचा अश्रूवर भारी जीव. माहेरचा तिला फारसा आधार नव्हता. म्हणून काशीनाथ तिला त्रास देण्याची एकही संधी सोडत नसे. खरंतर तो जाणीवपूर्वक

पण त्याच्या जगण्याच्या बेफिकीरीमुळे, व्यसनामुळे शारजाला
त्रास देत नव्हता. पण त्याचं धान काशीनाथ ठेवत नव्हता.
त्रास होत असे. त्याचं धान काशीनाथ ठेवत नव्हता.

"राचावं असीन तं राय, नायतन पटकन चाल्ली जाय, सकाय दुसरं बायको
आनो." असं म्हणायचा

हे त्याचं दारू पिल्यावरचं नेहमीचं बोलनं. असं शारजा सगळं सहन करत
असे. तिचे सुरुवातीचे तिन लेकरं होऊन मेली होती. चौथं लेकरू पोटात
असतानी सासूनं तिला माहेरी आणलं होतं. सोबत तीही आली होती. दुसऱ्या
दिवशी तिला दोनदच्या असरामातेजवळ नेलं. तिला अंघोळ घातली. देवीले नवस
केला. 'लेकरू वाचू दे.' शारजा माहेरला गेली. सासू घरी परत आली. नवमास
लेकरू झालं. म्हणून त्याचं नाव अश्रू ठेवलं.

अश्रू शिकावा म्हणून शारजा जीव तोडत होती. काशीनाथ मात्र बेफिकीर
होता. कष्ट करायचा, पैसे घ्यायचा. दारू प्यायचा. कधी-मधी घरात काही आणायचा
पण कोणतीच जबाबदारी तो स्वीकारत नव्हता. दारू पिल्यावर शारजाला काम
नसतानाही मारत असे. शारजा दररोज वावरात जायची. त्यात खाणं-पिणं
कपडा-लत्ता, सण-उत्सव, लग्नसराई भागवत असे. त्यातूनच पैसे जमा करून
अश्रूला मयन्याकाठी मनीऑर्डर पाठवायची. आज दोन वर्षापासून तिचा हा
कार्यक्रम होता. अश्रू त्यावर शिकायचा. दरवर्षी पास व्हायचा.

आता त्याची जाण्याची वेळ झाली होती. शारजा त्याला लागणाऱ्या पैशाच्या
चिंतेत होती. उन्हाळ्यात तिनं पैसे जमा केले होते. पण माहेरातल्या एका लग्नात
ते खर्च झाले होते. अश्रूला लागणारा दायदाना. मिरची कूट. वळ्या. कपडं ति
हलू-हलू जमा करून ठेवलं होतं, पण जाण्यासाठी लागणाऱ्या पैशाची ती चिं
करत होती. आपली चिंता लपवत तिनं संध्याकाळी दारात बाजीवर बसलेल्या
अश्रूला म्हटलं

"ताली शाळा उघळ्ळी असीन्रा आता?"

अश्रूला ऐकू आलं होतं. पण तो काहीच बोलला नाही. शारजाला त्याचं ग
बसणं कळलं होतं. म्हणून तीच पुन्हा बोलली.

"मंग जातं काय सकाय?"

अश्रूला वाटलं आता आपलं गप्प बसणं बरं नाही. म्हणून तो म
म्हणाला

"बापाची काई सोयतं नाई"

"तू त्याची बायले कायजी कर्तं. ताला टाईम झाला का सांग?"

अश्रूला वाटलं. उगाच आडे-वेढे घेण्यात अर्थ नाही. घरची अडचण अ



पण आपल्या मायसोबत स्पष्ट बोल्याले काहीच हरकत नाही. म्हणून तो
म्हणाला

"टाइम तं झाला माला, रिझल्टही लागला असीन"

"मंग तुले उशीर होऊन रायला तं सांगत काऊन नाईस"

"काय सांगतं बिचारे काई ताळाले मेळ हाये. परवाचा धिंगाना पाय बरं माया
बापाचा, तेई पेले अन् लोकांयलेई पाजली अन् साऱ्या गावात कोयकोय केली."

"त्याइचं आऊ दे तू, चालतेच हाये. त्याइचा ईचार नोको करू. तू शीक
फक्त ध्यान धरून. मी पयस्याचा बंदोबस्त कर्तो."

त्याचं पुढचं बोलणं ऐकण्यासाठी ती थांबली नव्हती. संध्याकाळ झाली
होती. त्या अंधूक सांजवेळात ती चालत गेली. अश्रू बाजीवर पडून होता.

काशीनाथ घरी आला. घरातील अंधार पाहून तो म्हणाला.

"दिवा कसा इजलारे"

अश्रू बोलला नाही. काशीनाथ घरात गेला. डब्बी शोधून त्यानं दिवा लावला.
एक कंदील बाहेर आणला. अश्रूच्या बाजीजवळ कंदील ठेवत काशीनाथ म्हणाला

"ताली माय कुटी गेली रे"

जवळच आलेल्या आवाजानं तो भानावर आला.

"कोनाच्या तरी घरी गेली असीन."

"दिवा तं लावा लागत होता तिनं"

त्यावर कुणीच काही बोललं नाही

उद्या सकाळी आपल्या पोराची जाण्याची तयारी करावी लागते म्हणून शारजा
उसने पैसे मागण्यासाठी रात्रीची फिरत होती.

"झालं काय वं च्यापानी"

"कोन व्हय वं, अंदारात दिसतई नाई माय. आमासिक उजिळात येनं, आता
माय सारजा व्हय कायं वं"

"हो"

"येनं, बस न आमासिक, पान-मान खायं, कसं येनं केलं वं सयसंद्याकाई"

शारजा काळजीत होती. या वेळेला कोणी पैसे देईलच याची शाश्वती
नव्हती. त्यातल्या त्यात शाळेसाठी पायजत म्हणून तर लोक अजिबात देणार
नाहीत. हेही तिला माहीत होतं. आपल्या उसनवारीतील चार-पाच घरी जाऊन पैसे
मागायचे. त्यापैकी कोणीतरी देईल, म्हणून ती जाताबरोबर विषय काढत होती.
तिचं हे तिसरं घर होतं. सगळ्यांनी पेरण्यापाण्याची अडचण दाखवली होती. ती
खरीही होती. ज्याच्याजवळ तीन-चार एक्कर जमीन होती ते पेरण्यासाठी पैसा

जमा करून ठेवत असत. ती त्यांच्या शेतात कामाला जायची. म्हणून निर्मी
उसनवारी होत असे. आता ती शांताबुढीच्या घरी आली व म्हणाली.

"आजीबाई मले कानी तीनशे रुपये पायजे होते उसने"

"आता माय कायले वं"

"असं कानी सकाय शाळेत चाल्ला होता. त्याले जायाले पैसेच नाईत. मं

"असं कानी सकाय शाळेत चाल्ला होता. पाइले कानी केशवराव पाटलाच्या घरून आन्यान
देतो तुमचे मंग, बजारलोग. पाइले कानी केशवराव पाटलाच्या घरून आन्यान
लावतो आंगावर, ते तुमाले दीन"

"पैसे तं नात वं सारजे आता. काशीनाथले आताच केशवराव पाटलाच्या
घरी धाड नं."

"अवं आजीबाई थे लोकं रातचे पैसे देत नाईत म्हनून, नाईतं याईलन
केशवराव पाटील एका शब्दात पैसे देत कदीना"

"हो मायं सारजे, काशीनाथले कइसाई पैसे भेटतात तथून, पन मायापासं न
काइच नात वं मायं, त्या यमुनीजवळ पाय असतीन तं"

शारजाला येवे वेळ घालवण्यात अर्थ वाटला नाही.

"तिच्या जवळ पायतो मंग" ती बोलतच अंधारात दिसेनाशी झाली. शारजान
प्रयत्न केले, पण ते व्यर्थ गेले. तिच्या आशा मावळल्या. शेवटी ती पैशाच्या
विचारातच घरी आली. दारात पावलं वाजल्यानं काशीनाथनं ओळखलं.

"कुठी गेल्ती वं"

"गेल्ती पैसे मांग्याले"

"सकाय जाते का असरू"

"हो, पाटवून देऊ त्याले"

"मंग"

"मंग काय? पैस्याचं जमलंच तं नाई"

"नाई तं नाई, त्याले म्हना तयारी करून ठेव. मी पायटीच आन्तो मांगून
केशवराव पाटलाले"

ती उत्साहानं संयपाकासाठी चुलित काड्या मोडू लागली. अश्रूनं हा स
संवाद ऐकला होता. त्यानं सामानाची सगळी बांदबुंद करून ठेवली. काशीना
सकाळी उठला. चहा घेतानी म्हणाला.

"आलोच मी केशवराव पाटलाच्या घरून पैसे घेऊन"

केशवराव पाटील गावातील श्रीमंत माणूस. त्याच्याकडे शेतीची कामं करण्यासाठी
ढोरं-वासरांचं शेणपाणी करण्यासाठी, नेहमी गडी माणसाची गरज पडायची
माणसं कामावर यावी म्हणून तो उसनवारीत पैसे देत असे. काशीनाथला मात्र



कधीही मागितले तेवढे पैसे देत असे. काशीनाथ भरपूर दारू पीत असे. आपल्या कमाईचा सर्व पैसा तो दारूत गमावत असे. तसा तो कामाचा गडी होता. धाडसी होता. स्वभावाने मऊ होता. प्रामाणिक होता. कष्टाळू होता. म्हणून केशवराव पाटील काशीनाथला केव्हाही हवे तेवढे पैसे देत होता. तेव्हा काशीनाथ कामासाठी पक्का होत असे. नंतर मजुरीतून ते पैसे कापले जात असत. काशीनाथला केशवराव पाटलाकडून पैसे भेटतात हे नक्की ठाऊक होतं. यापूर्वीही त्यानं अनेकदा हातउसने पैसे आणले होते. त्याची नेहमीचीच उसनवारीची घाई असे. काशीनाथ कधीही बाजारच्या नावावर पैसे घ्यायचा. दारू प्यायचा. इतरांना पाजायचा. तो दारू पिऊन पडलेला. कित्येक वेळा बडबडतानी केशवराव पाटलानं पाहिलं होतं. आणि म्हणूनच ते काशीनाथला उसनवारी, किंवा अंगावर पैसे देत असत. दुसऱ्या दिवशी दारू उतरल्यावर काशीनाथ न बोलता कामावर येत असे. तेव्हा काशीनाथला आपल्याले अंगावर पैसे मिळतात म्हणून माहीत होतं. तो आत्मविश्वासानं कुनबी पुऱ्याकडे चालू लागला. सरळ चालत गोठ्याकडे आला. केशवराव पाटील गाईला उलप लावत होते. वासरू गाईला पेत होतं.

पेतांनी ढुशा मारत होतं.

"कसा आला रे काश्या पायटीच" काशीनाथला बघून केशवराव म्हणाला.

"काई नाई भाऊ थोडेशेक पैसे पायजत होते" काशीनाथच्या उसनवारीला केशवरावनं गृहीत धरलं होतं.

"बरं बरं मी आता आन्तो, तू वासरू बाजूले बांद अन् गाय पाय तेवळी"

केशवराव पाटलानं लहानशी बकेट काशीनाथ जवळ देली आणि ते घराकडे पैसे आणण्यासाठी निघून गेले. काशीनाथनं ताकदीनं वासरू ओढलं. बाजूला बांधलं. गाय दोयाले सुरुवात केली. लहानशी बकेट भरू लागली. वर फेस तरारू लागला. गाय दोवून झाली. अन् केशवराव पाटील आले. त्यांच्या हाती पैसे होते. सहज विचारावं म्हणून ते बोलले.

"कायले पायजे होते रे काश्या पयशे"

"काई नाई भाऊ ते पोरगं चाल्लं होतं शाळेत औरंगाबादले. त्याच्यासाठी पायजे होते"

केशवराव पाटील मनातून दचकले. त्यांचा चेहरा बदलला. खोटं हसत ते म्हणाले.

"असं काय, मंग असं कर्न काश्या, जऱ्या भऱ्यानं येनं"

"पोट्टं तयारी करून बसलं होतं"

"हो, पन पैसेच नाई गड्या. हे कानी. त्या दुकानदाराले द्या लागतात.

गाईच्या अलपावें''

केशवराव पाटील नेहमीच्यापेक्षा तुटक-तुटक बोलत होते. त्यांनी काशीनाथच्या हातची दुधाची बकेट घेतली अन् ते घराकडे निघाले. काशीनाथ थोडा नाराज झाला. घराकडे निघाला. त्याच्या डोक्यात विचार सुरू झाला होता. केशवराव पाटलांच्या हातातील पैसे त्यानं पाहिले होते. 'पन भाऊनं आपल्याले पैसे काऊन देले नाईत?' एरवी ते पटकनच पैसे देत असतात. आपलं काई चुकलं काय. परवा आपून दारू पिऊन धिंगाणा घातला म्हनून देले नस्तीन काय. पन त्याईनं ते पैसे हाती आनले होते देयाले, पन काऊन देले नस्तीन. काशीनाथच्या डोक्यातील प्रश्नाची उत्तरं त्याला मिळाली नाहीत. तेवढ्यात काशीनाथ घरी पोहेचला.

"कावं आन्ले पैसे''

"नाई बॉ देलेच नाई केशवराव पाटलानं''

"मले माईतच होतं तली पैसे भेटनं नाई म्हनून''

"कसं काय''

"तुमी सांगल्तं असीन्न कायले पायजत म्हनून''

"हो, माया पोराले शाळेसाटी पायजत म्हनून सांग्ल''

शारजानं काशीनाथ, केशवराव पाटलाकडे निघाला असतांनी ती सावकाराकडे गेली होती. व आपल्या गळ्यातील पोत गहाण ठेवून तिनं पैसे आणले होते. काशीनाथ आल्यावर ती म्हणाली.

"चाल रे बबू घे तूय सामान'' ती अब्रूचं बांधलेलं सामान डोक्यावर घेऊन बसस्टॅण्डकडे निघाली. मागे काशीनाथ, अब्रूही निघाला. शारजाने पैश्याची सोय केली होती. काशीनाथला याचा अंदाज आला होता. मुलाने शाळा शिकावी म्हणून काशीनाथला मनातून वाटत होतं. 'पन कइसाई उसने पयशे देणाऱ्या केशवराव पाटलानं आज उसने पयशे काऊन नस्तीन देले.' या विचारात काशीनाथ गुंतला होता. अब्रू गाडीत बसून निघून गेला. शारजाही परत घराकडे निघाली. अन् काशीनाथही विचारातच घराकडे निघाला.



# शाळा

दिवाळीच्या सुट्या लागणार होत्या. मनातल्या मनात मले आनंद झाला होता. आज शाळेचा दिवस होता. पण उद्या मी, बुद्धाचा सुऱ्या, मांगाचा नाम्या, पाटलाचा ईठ्या, गोसावी गुरुजीचा पक्या, शाळेच्या आवारात खेळण्यासाठी येणार म्हणून बोला केली होती. आम्हाला चौथीला चितमपल्ली गुरुजी होते. सुटीच्या वेळेस ते वर्गात आले. आम्ही खेळतच होतो. सगळेजण आपापल्या जागेवर बसलो. गुरुजी म्हणाले,

"मुलांनो, उद्यापासून तुम्हाला दिवाळीची सुटी हाये. पण तुमची कॉलरशीपची परीक्षा असल्यामुळे तुमी सकाय पैसे घेऊन शाळेत या. माझ्याकडे द्या. मी कॉलरशीपचा अर्ज भरतो.''

"कारे अय ईठ्ठल्या चुपचाप बसनं बे. दिवाईची सुट्टी झाली की, परीक्षा हात. तुमी सुटीत अभ्यास करजा. अय अजाज सकाय तुया बापाले घेऊन येजो शाळेत. म्या बलावलं म्हना.'' शाळेची घंटी वाजली. शाळेचे लेकरं दप्तर घेऊन कल्ला करत धावत सुटले. मी घरी आलो माझ्या अम्मीले विचारलं,

"अब्बा कहाँ है''

"अभी आ जायेंगे''

मी अब्बाची वाट बघत होतो. ते गावात भंगार घेयाले जातात. बाहेर गावातूनही भंगार आनतात. सायकलवर दोन्हीकडून पोते भरलेले असतात. खोऱ्यातही भंगार असते. त्यामुळे त्यांना घरी येयाले उशीर होते. कधी-कधी अंधार होते. रात्रही होते. मी त्याईची वाटच पाहात असतो. आजही मी गुरुजींच्या सांगण्यावरून वाट पाहात होतो. ते येत नाहीत म्हणून मी खेयाले गेलो. बुद्धपुऱ्यात माले दोस्त हाईत. माया वर्गातले सुऱ्या. किसन्या. पाचवीतला भुजंग्या. त्याचा ढोरं वयणारा मोठा भाऊ, त्याच्यासोबत मी खेळत असतो. कधी-कधी त्याच्या घरी जेवतोही. मग सुऱ्याही माया घरी मटण असलं की जेवत अस्ते. तवा आमच्या संग

असणाऱ्या पटलाच्या ईंठ्या बाजूनं बसते. जेवत नाई. पन घासाकळे पायते. आमी तिथं अनं अन् गोसावी गुरुजीचा पक्या चांगले दोस्त हावो. एकमेकांच्या घरी जातो. पटलाच्या ईंठ्या म्हने, 'आमी मटन खातो पन बोराईच्या मटनानं नाई खात.' मग मी अन गुन्याच जेवत असतो. सोबतच सगळेजन खेळत असतो बुद्धपुऱ्यातच खेळतो. पाटीलपुऱ्यात खेळ्याले जात नाही. रात झाल्याच्यान मी घरी आलो. अब्बा आले होते. मी त्यायले सकाय गुरुजीनं शाळेत बलावलं म्हणून सांगतलं.

सकाळी उठून अब्बा मी गुरुजीले शाळेत भेटाले गेलो. अब्बानं गुरुजीले पैसे देले, मंग आमी घरी आलो. अब्बाले मी विचारलं,

"पैसे कायकू दिये गुरुजी को"

"तेरी कॉलरशीपकी इम्तिहान है ना इसलिए"

"फिर तो मैं दे सकता था, आपकू कायकू बुलाया गुरुजीने"

"बोल रहे थे बच्चा हुशार है, छुट्टीमें पढाई करके लो"

अब्बा घरी आल्यावर सायकल घेऊन भंगारसाठी निघून गेले. मी दिवसभर खेळत होतो. सुटी लागल्यावर शाळेत जायचं नव्हतं म्हणून बुद्धपुऱ्यात जाऊन खेळत होतो. बुद्धपुऱ्याले लागूनच आम्ही राहात होतो. वरतीच्या भागात माळी, कोळी, पाटील राहतात. म्हणून तिकडे खेळायला जायचे नाही. ते मारतात म्हणून अम्मी मला सांगत असे. संध्याकायी आल्यावर अब्बानं मला बलाव्यानं पढवलं. माझ्या मोठ्या बहिणी नेहमी घरीच असत. मी एकटाच असल्यानं कुठेही फिरे. आम्ही सर्व घाऊ. अब्बा. अम्मी सगळे सोबतच जेवत असू. मी काहीही केलं तरी मला घरी कोणीच मारत नसे. मी घरी आलो. आमी सोबत जेवण केलं. नंतर अब्बाने माझा अभ्यास घेतला. खूप रात्र होईपर्यंत ते मला शिकवत होते. अब्बाले मराठी येत होता. असा ते माझा दररोज अभ्यास घेत. त्यांना झोप येत नसे. मला झोप येई. पण अब्बा शिकवत असतानी झोपू देत नसत. अब्बा दिवसभर थकूनही मले रात्र-रात्र शिकवत. माझी दिवाळीची सुटी असूनही माझी [illegible] अब्बानं सुरू केली.

शाळा लागल्या. मी दिवसभर शाळेत असे. रात्री अब्बाच्या शाळेत असे. आम्ही मुलं सोबत अंजनगावला परीक्षेला गेलो. अब्बानी जे शिकवलं होतं तसंच पेपरात होतं. अब्बाला कसं माईत हेच पेपरात येतं म्हणून. गुरुजीनं त्यायचं पेपर [illegible] असेल. आमची शाळा सुरू झाली. मला ईदीला एकच दिवसाची सुटी होती. अब्बानं मला अंजनगावला मज्जीतमध्ये नेलं होतं. तेथे सारे आमचे लोक होते. नवीन कपडे घातलेले. टोप्या घातलेले. अब्बानंही टोपी घातली होती.



मलाही टोपी दिली होती. माझ्या अंगाचा वास येत होता. तेथे सर्वांच्याच अंगाचा वास येत होता. आमच्या घरी क्षीर-खुरमा बनवल्या होत्या. अब्बानं त्याईच्या दोस्ताईले बलावलं होतं. म्या शाळेच्या दिवशी सुन्या, ईठ्या, नाम्या, पक्याले क्षीर-खुरमा दिला होता. अम्मीनंच त्याईले आण्याचं सांगितलं होतं. आमी सोबतच रायत जायो. शाळेत सारखेच दंगळो करत होतो.

आता ऊन जास्तीचीच लागून रायली होती. गुरुजी म्हणत तुमची आता बोर्डाची परीक्षा हाये, अब्बा मला रोजच शिकवत होते. म्हणून मी परीक्षेले घाबरलो नाही, कॉलरशीप सारखंच अब्बानं शिकवलेलं परीक्षेत येते. म्हणून मी हरकून गेलो होतो. परीक्षेच्या दिवशी सकाळी आमी आमच्या शाळेत आलो. सुकळीचे पोरं-पोरी. मास्तर. आमच्या गावात आले होते. त्यायच्या गावात चौथी लोगच शाळा होती. आमच्या गावात सातवी लोग शाळा होती. म्हणून केंद्र आमची शाळा होती. पेपर सुरू झाला. बरोबर अब्बानं शिकवलेलंच पेपरात आलं होतं. मी लिहिलं. गुरुजी फळ्यावर लिहून देत होते. पोरं ते लियत होते. मीही कधी-कधी माझं खोडून फळ्यावरचं लिहीत होतो. काही पोरं लिहीत होते. काही रडत होते. आमच्या वर्गावर असणारे गुरुजी काही पोराइले जवळ जाऊन सांगत होते. आमचे पेपर झाले. आम्ही खेळण्यासाठी मोकळे झालो. 'एक मे च्या रोजी येजा.' म्हणून गुरुजीनं शेवटच्या पेपरच्या वेळेस सांगितलं होतं. मी पोरासोबत दिवसभर खेळत असे. अब्बा मला सकाळी म्हणाले,

'कल तुमारा रिझल्ट है.'

मी दिवसभर खेळतानी उद्याच्या दिवसाची वाट पाहात होतो. दिवस लय मोठा होता. मला रात्री जाग आली. मी उठलो. तेव्हा अम्मी म्हणाली,

"अभी सो जा दिन निकलनेकू बहोत देर है"

मी पुन्हा झोपलो. दिवसा आज मी अंघोळ करून शाळेत आलो. शाळेत पयलीपासून सातवीपर्यन्तची पोरं. मास्तरं. गावातले मानसं. सगळी शाळाच भरली होती. मुख्याध्यापकांनी आमचे एक-एक वर्गाचा निकाल सांगणं सुरू केला. आमच्या चौथ्या वर्गाचा नंबर लागला. मले कसंतरीच होत होतं. मुख्याध्यापक म्हणाले,

"अजाज पठाण पयला नंबर. टाळ्या वाजवा"

मी उभा रायलो. सगळे जन टाळ्या वाजवत होते. सरपंचानं मले मार्कलिस्ट देली. तेव्हा माझे अब्बाही हजर होते. मी गोळ्या खाऊन घरी निघालो. सगळेच पोरं पळत सुटली होती. नापास झालेली रडत होती. अब्बा मुख्याध्यापकाजवळ काही तरी बोलत होते. घरी येऊन अब्बा म्हणाले

"तु पुरे सेंटर मे पहिला है. मास्टरजी बोल रहे थे. उसको अंजनगांव में भेजो पढनेकू"

मी अम्मी अब्बाले सोडून गेलो नाही. अब्बा म्हणाले.

"पैसे का बंदोबस्त नही होता."

उन्हाळ्यात मी, सुन्या, नाम्या, त्याचा मोठा भाऊ खूप खेळलो. कधी-कधी इठ्या, पक्या, ईश्न्या यायच्याई सोबत खेळलो. पण ते जास्त खेळण्यासाठी दुसऱ्याच पोट्याईत असतं. ऊन लय तपत होती. मग आमी झाडाच्या सावलीत खेळलो. नाईतर झाडावरच खेळलो.

पाणी येऊ लागलं. आम्ही नाल्याच्या पुरात पोयत होतो. अम्मी अब्बाला मी सांगत नव्हतो. शाळा उघडल्या. मला पाचवीच्या वर्गात बसा लागे. आम्हाला आता चितमपल्ली गुरूजी नव्हते. पाचविले आता इंग्रजी शिका लागत होते. इंग्रजीचे सर वेगळे. गणिताचे वेगळे. साऱ्या विषयाचे सर वेगळे-वेगळे होते. आता गुरुजीले सर म्हणा लागत होते. आमाले नवीन सर आले होते. ते याच वर्षी आले. ते लय हुशार आहेत म्हणतं. ते मलकापुरचे असून लय कडक आहेत म्हणतं. आमच्या शाळा सुरू झाल्या. नवीन सरांनी आमचा ड्रेस बदलवला. मुलांसाठी खाकी हाप चड्डी अन् पांढरा शर्ट. मुलींसाठी अगोदरचाच ठेवला. मी शाळेत जावो. सुन्या, नाम्या, ईठ्या, पक्या, ईश्न्या सारे पास होऊन पाचवीत आलो. सगळेच एका वर्गात होतो. सरांनी वर्गात येता बराबर हजेरी घेतली. ईठ्याले पुढे बसवलं. मग गोसावी गुरुजींच्या पक्याले, मग इश्नू काळ्याले, मग नाम्याले, सर्वात शेवटी सुन्याले. त्याच्या अगोदर मले बसवलं. मग दुसरी रांग केली. पोरीलेही तसंच बसवलं. सर वर्गात आल्यावर उभे राहावे लागे. सर खुर्चीवर बसत. आमी खाली बसो. नवीन सर आमाले गायत्री मंत्र म्हणून दाखवत. आम्ही मागे म्हणत जावो. दररोज सर पयले गायत्री मंत्र म्हणायले लावायचे. नंतर शिकवायचे. शाळा सुटायची वेळ आली की पसायदान म्हणायचे. आम्ही त्यांच्या मागे म्हणत असू, आता आमची सर्व शाळाच वर्गातून सुरुवातीला गायत्री मंत्र म्हणते. शेवटी सुटीच्या वेळेस पसायदान म्हणते. मी इंग्रजी शिकवण्याची वाट बघत होतो. सरांनी दिवाळीच्या सुटीपर्यंत इंग्रजी शिकवलंच नाही. सर गोसावी गुरुजींच्या ओळखीचे होते. ते त्यांच्या घरी जात. चहापाणी घेत. असं पक्या दुसऱ्या दिवसी आम्हाले सांगे. ते ईठ्याच्याही घरी जात. "सरपंच साहेब आहेत काय घरी" म्हणत. मी पयतच घरात गेलो. लपून रायलो. असं ईठ्या सांगे. दुसऱ्या दिवशी ते ईठ्यासंग चांगले बोलत. पक्यासंग चांगले बोलत. सुन्याले ते लय मारत. सुन्या आमच्यात हुशार होता. त्याला जोडाक्षरही वाचता येत होते.



बेचे पाढेही त्याच्याच पाठ होते. मागच्या वर्षी आम्ही त्याच्या हातचा मार खाल्ला होता. गुरुजी एकेकाले उभे करून पाढे म्हणायले लावत. जाले आले नाही. तो सांगणारा त्याले मारत जाये. सुन्याच साऱ्या पोराले मारत जाये. पक्याले सगळ्यात जास्त मार खावा लागे, पण सर यावर्षी सुन्यालेच मारत जातं. आम्ही सारेच जन धिंगाना करो. पण ते सुन्यालेच पकडत. व मारत. कधी-कधी 'सुन्या इंग्रजीची ए बी सी डी पाठ करून दाखव' म्हणत अन् मारत. "बेटा ईठ्ठला, सकाय पाठ करून येजो बाळा." म्हणत. "प्रकाश अभ्यास करत जाय" म्हणत. मलेही मारत. नाम्याले. वर्गातल्या लय पोरांना मारत म्हणूनच त्याईले कडकसर म्हणत असत. मी अब्बाले घेऊन अभ्यास करत होतो. पण अब्बांनी गायत्रीमंत्र. पसायदान. पुस्तकात नाही म्हणून शिकवलं नव्हतं. सरांनी ते प्रत्येकाकडून पाठ करून घेतलं होतं. मला गायत्री मंत्र, पसायदान, पाठ झालं होतं. ते सुन्याचं पाठ झालं नाही. सर मारतात म्हणून तो कधी-कधी शाळेत येत नव्हता. वावरात जाये. जेव्हा शाळेत आला तेव्हा गुरुजी त्यालेच म्हन्याले लावत. येत नाही म्हणून तो हात पुढे करे. गुरुजी जोऱ्याने बोलत. तो थरथर कापे. त्याचे हात लाल होयेलोग सर त्याले मारत. तो तोंडानंही लाल होत जाये. मग अजून तो काही दिवस येत नसे. सर मले व नाम्यालेच रायाले सांगत. ईठ्या, पक्या आमच्या संग रायत नसत. सरांच्या देखत बोलत नसत. सर बोलतात म्हणून ते आमच्या संग सरांच्या चोरून बोलत. शाळेच्या बाहेरच बोलत. मग आमीही त्याईच्या संग सरांच्या चोरूनच बोलो. सर त्याईच्या घरी जाऊन काय शिकवत. सांगत. ते-ते मले. नाम्याले वर्गाइतल्या पोराले पयले-पयले सांगत असत. आता तेही सांगनं त्याइनं बंद केलं. दिवाळीच्या सुट्या लागल्या. मी, सुन्या, नाम्या, त्याचा मोठा भाऊ एकत्रच लय खेळत जावो. यावक्ती ईठ्या, पक्या, ईश्न्या आणि तिकडचे पोरं आमच्या संग जास्त खेळत नसतं. अब्बा माझ्या सुटीतही दररोज अभ्यास घेत असत. पण नवीन सर आमाले घरून अभ्यास करून आन्याले सांगत नसत. ते वर्गातच शिकवत. ईठ्याचा बाप शाळेत आला की, सर म्हणत. जागेवर उभे रायत जा ते आपल्या गावचे सरपंच आहेत. मग सर त्यांच्यासोबत पटांगणात फिरत. उभे राऊन खूप वेळ बोलत. ते एवढ्यात लय खेप आले होते. त्यावक्ती ईठ्या आमच्या संग बोलत नसे. आता तो अन् पक्या आमच्यासंग जास्त बोलत नसत. नवीन सर त्याईच्यासोबत लाळानं बोलत असत. ईठ्या अन् पक्या वहीवर काहीतरी लिहून आने. सरांना दाखवे. आमाले दाखवत नसत. सरांनी आमाले निबंध लिहून आन्याले सांगतले. मी दोनच निबंध लिहिले. नाम्यानंही दोनच लिहिले, त्या दिवसी सुन्या आला नव्हता. तो आता येतच नसते. गुरुजी मारतात

म्हणून तो शाळा सोडून ढोरंच चारतो म्हने. आजही तो आला नाही. सर वर्गात आले "एजाज पठाण उभा राय." मी उभा रायलो. येता बरोबर सरांनी मलेच उभं केलं. काऊन उभं केलं म्हनून मी घाबरलो होतो.

"निबंध लिवून आन्ले काय?"

मी घेत-घेतच "हो" म्हनालो.

"मग दाखवनं. चाल आन ईकडे"

मी लिहिलेल्या निबंधाची वही घेऊन सरांजवळ गेलो. मले भेव लगत होता. म्या फक्त दोनच निबंध लिहिले होते. सरांनी माझी वही घेतली. निबंध पायले. टेबलावरची छडी घेतली.

"चाल हात पुढे कर"

मी चुपचाप हात पुढे केला.

"एक निबंध काऊन नाई लिहिला. तीन निबंध सांगितले होते ना?"

"सर एक निबंध पुस्तकात सापडलाच नाई"

"मंग सापडला नाई तं लियत नाईस काय? कुठूनई लिवून आनायचा होता"

सरांनी मले दोन्ही हातावर छळ्या मारल्या. हात लय दुखत व्हते. दिवसभर मले त्या हातांनी काईच लियता आलं नाई. संध्याकायी अब्बानं. अम्मीनं. मले विचारलं.

"इतना किसलिए मारा तेरेकू" अम्मी.

"मैंने निबंध नहीं लिखा था ना"

"तेरे अब्बा तो रोज पढाते तेरेकू फिर भी नही लिखा तुने"

"डाक्तर बेगीवार का निबंध है वो. अब्बा कह रहे थे तेरे किताब मे नही"

"किताब के बाहर का बोला था क्या सर ने, तो फिर बाकी पोट्टोने कैसा लिखा"

"स्यामकू ओ मंदिर मे आखाडा नही भरता क्या उसमे मालूम गिरा पोट्टे कू"

"फिर तू जाया कर ना आखाडा मे"

"जाने नही देते वो, कैते है मुसलमान और बुद्ध लोगों के लिए नहीं"

"फिर उसमे क्या, लिखनेकू बोलते क्या सर, ठयर. कल मैं आती तेरे स्कुल मे, सरकू मिलने कू"

"ओ तू मत जावो रे स्कूल मे, ओ मास्टर अच्छा नही" अब्बा.

"अच्छा नही तो क्या बच्चे की जान लेगा क्या"

"ओ सब आर्य धर्म का पढता ओ, पुरे बौद्ध लोग बोल रहे, उसका बंदोबस्त करनेकू, साले ने कोईच धर्म का पढाना नही, चुपचाप किताबे पढाना. अब देख बच्चो को कितना मारा, उसके पोट्टोको मारता नही" अब्बा.



रात्री अब्बानी माला अभ्यास घेतला नाही. मी जेवन करून झोपलो. दुसऱ्या दिवशी शाळेतच गेलो नाही. मले कोनी घरी बोलावण्यास आलं नाही. ईठ्या, पक्या, ईश्न्या कोणी घरी असलं की पोट्टे बलाव्याले जात. मी घरी कोणी बलाव्याले येते का याची वाट पाहात होतो. पण मले कुणीच बलाव्याले आलं नाही. सुऱ्याची शाळा सुटली होती. सर त्याले मारत. आता मलेही मारलं. मलाही शाळा सुटीन म्हणून मी दुसऱ्या दिवशीच शाळेत गेलो. गायत्री मंत्र झाल्यावर आमी लिहिलेले तीनही निबंध पाठ केले. माल्या जवळ नसलेला डाक्तर बेगीवारचा निबंध मी पक्या जवळून लिहून घेतला. सर वर्गात नसले की, ईठ्या, पक्या, ईश्न्या मले दाखवत जात. आम्ही धिगाना करो. यावर्षी लय धिगाना करता आला नाही. एकत्र बसून अभ्यासही करता आला नाही. आमच्या परीक्षा जवळ आल्या. अब्बानंच माझा पूरा अभ्यास घेतला होता. काही पोरांना ए बी सी डी येत नव्हती. मांगाचा नाम्या मी परीक्षा देत नाई म्हने, सुऱ्या तं शाळेचं नावही काळत नाई. आमी संध्याकाई सोबत खेळतो. तो सरांचं नाव जरी काढलं तरी घरी पयत सुटते. परीक्षा सुरू झाली. मांगाच्या नाम्या खरंच पेपराले आला नाही. पेपर सोपे होते. अब्बानं शिकवलेलं सगळं पेपरात आलं होतं. मी पेपर भरून लिहिला. ईठल्या पेपरात रडत जाये. त्याच्या पेपरावर खोड-तोड करत जाये. इकडे-तिकडे पायत जाये. सर आमाले काई उत्तरं सांगत जात. इठ्या खालचं वर, वरचं खाली लियत जाये. पक्या चोरून माया पेपरावरचं पाये. अब्बानं शिकवलेलं पेपरात ये. पेपर अब्बाले माहीत असते काय. सर तं अब्बासोबत बोलतई नसत. मी सगळा पेपर भरून लियत जावो. ईठ्ठल्या लियासाठी साऱ्या वर्गात फिरे. सर त्याले काईच म्हनत नसत. सर मारतीन म्हनून मी जाग्यावरून उठो नाई. सरांनी दिलेला एकही निबंध पेपरात आला नाही. आमचे सर्व पेपर झाले. सरांनी सकाय पासून शाळेत यायचं नाही तुमाले सुट्या लागल्या म्हणून सांगतलं.

सुटीत आम्ही खेळ्याले वावरात, जंगलात जात जावो. शाळा आमाले उघळीच दिसत जाये. काही वर्गातले लेकरं येत-जात. सर पण येत होते. काही पोरांना सुट्या होत्या. आमालेही सुट्या होत्या. तरीपण शाळा चालूच दिसे.

लवकरच पास का नापास आलं मी शाळेत गेलो सर्वजन आले होते. पास-नापास सुरू झालं. पयलीपासून चौथ्या वर्गालोक झालं. काही लेकरं रडत. काही बसून होते. काही इकडे-तिकडे पायत असत. आमच्या वर्गाचा नंबर लागला. ईठ्या आमच्या वर्गातून पयला आला. त्याले त्याच्याच बापाच्या हातानं मार्कलिस्ट भेटली. त्याचे बाबा सरपंच होते. मागच्या वर्षी मी चौथीत असतांनी मले पयल्या

नंबरची मार्कलिस्ट घेटली होती तेव्हा सरपंच दुसरे होते. आता ईठ्याचे बाबाच होते. दुसरा नंबर गोसावी गुरुजीच्या पक्याले भेटला. मी मले कईसा भेटते म्हणून वाट पयत जावो. पाचव्या नंबरावर माल नाव आलं. मी मार्कलिस्ट घेतली. गोळ्या घेतल्या. उड्या मारतच घरी आलो. अब्बा शाळेतच होते. काही वेळानं ते घरी आले. ते नाराज होते. अम्मी खूष होती. अब्बाला ते म्हणाली,

"अजी अजाज पाचवे नंबरसे पास हुवा जी"

पन अब्बाले हे पयलेच माइत होतं. ते शाळेतूनच घरी आले होते. ते हळू आवाजात अम्मी सोबत बोलले.

"साला ये नया मास्टरने मुह देखके नंबर दिये पोट्टे को"

"कैसे जी"

"सरपंच का छोकरा पुरा ढब्बू है, फिर भी उसका पयला नंबर, बाप के वजहसे"

"और दुसरा कौन जी"

"दुसरा गोसावी मास्तर का छोकरा, उसका और वो जोशी मास्तर का दोस्ताना है ना. इसलिए। साले मास्तरने ऐसा भेदभाव किया तो कैसे पढाना बच्चेकू, अच्छा था उसके जात का नही था कोई स्कूल मे नही तो उसको ही पयला नंबर देता था"

"जाने दो ना हो पढायेंगे तबतक पढायेंगे नही तो धंदे पे लगायेंगे"

अब्बा त्या दिवशी धंद्यावर गेले नाहीत. ते बाजीवर पडून होते. मी पोरासोबत खेळत होतो. लय ऊन होतं. सुट्या खेळन्यात जात होत्या. शाळा सोडलेला बुद्धाचा सुन्या. परीक्षा न देणारा मांगाचा नाम्या. त्याचा मोठा भाऊ आम्ही सोबतच खेळत असो. डाबडुबली. चोर-पोलीस. रेस्टीप. आंबे-पाळणी. धाबाधुबी. आटीच्या गोयातली रजाराणी. बेंग्या. कधीकधी सावलीत खेळो. कधीकधी उनीत खेळो.

पाणी येऊ लागलं. पूर आला. शाळा डबल सुरू झाल्या. मी शाळेत सहाव्या वर्गात गेला होतो. माले सोबती शाळेत नव्हते. ते आता शाळा शिकत नव्हते. मले गावातच खेळतानी भेटत. ईठ्या, पक्या, ईस्न्या. सगळेखत अजूनही माल्यासोबत बोलत नसत. आमचे सर आता आमच्या शाळेचे हेडमास्तर झाले होते. त्याईन लय चांगलं काम केलं म्हनून त्याईले हेडमास्तर केल होतं. माले सोबती शाळेत नाईत. म्हनून मले शाळेत गमत नाई. पन तरीही मी दररोज शाळेत जात अस्तो. अब्बा मले घरी शिकवत अस्तात.



# जमानत

चौदा एप्रिल जवळ आली होती. गावातली पोरं राहूलची आतुरतेनं वाट पाहात होते. राहूल हा औरंगाबादला शिकायला होता. त्याची उन्हाळ्याची परीक्षा आटोपून तो गावात येत असे. शेवटच्या दोन-तीन दिवसांत गावातली पाच-सहा पोरं घेऊन तो वर्गणी जमा करत असे व मिरवणुकीची तयारी करे. मग बुद्धगुन्यातील सर्व लोक त्यात सहभागी होत असत. या कार्यक्रमाची मोठी मिरवणूक निघे. गेल्या चार-पाच वर्षांपासून त्या मिरवणुकीची धुरा राहूलच्या खांद्यावर आली होती. तो एवढ्यात येईल व मिरवणुकीची तयारी करील म्हणून त्याची वाट पाहाणं चालू होतं.

बाबासाहेबांनी गरीबाच्या लेकरासाठी औरंगाबादला शिक्षणाची सोय करून ठेवली. नागसेनवन परिसरात असलेल्या महाविद्यालयात देश-विदेशांतून विद्यार्थी येऊन शिक्षण घेतात. राहूल हा मिलिंद महाविद्यालयात शिक्षण घेत होता. त्या परिसरातील परिवर्तनवादी विचारानं तो भारावून गेलेला होता. तेथील वातावरणाचा त्याच्या आचार-विचारांवर प्रभाव पडलेला होता. समाजजागृतीचा विस्तव घेऊन तो फिरत होता. सुटीच्या दरम्यान होणाऱ्या गावातल्या कार्यक्रमात तोच अग्रेसर असे. गावात भाषणं देत असे. लेकरांना मार्गदर्शन करत असे. गेल्या चार-पाच वर्षांपासून मिरवणुकीचं नेतृत्व त्यानंच केलेलं होतं.

देवळी हजार-बाराशे लोकवस्तीचं गाव. आर्यांनी निर्माण केलेल्या अठरा पगड जाती या गावात नाहीत. बुद्धाची. माळ्याची. कुणब्याची. सारखी घरं. एक म्हाली अन् एक बामणाचं घर. गावात सर्व समाजात सलोखा. सर्व खेळी-मेळीनं राहातात. एकमेकांच्या लग्नात-मरणात सहभागी होतात. मागील वर्षी बुद्धबांधवांनी काढलेल्या चौदा एप्रिलच्या मिरवणुकीत बाबासाहेबांच्या फोटोसोबत महात्मा फुलेंचा फोटो लावलेला होता. त्या फोटोला नीळ लावलेली होती. ते प्रत्येक वेळेला लावलेली असायची; परंतु या वर्षी मात्र त्या निळीवरून कुणब्यांच्या पोरांनी

माळ्याच्या पोरसोबत वर्षभर चर्चा चालवली होती. माळ्याच्या काही तरुण पोरांनी त्यावर चिंता व्यक्त केली होती. त्यावर आपसांत काहीतरी निर्णय घेतला होता. 'यावर्षी जर महात्मा फुलेंच्या फोटोला नीळ लावली, तर आपण मिरवणूक अडवायला पाहिजे.' असं काहीतरी त्यांच्यात ठरलं होतं. त्यामुळे यावर्षी निघणाऱ्या चौदा एप्रिलच्या मिरवणुकीची ते चाहूल घेत होते.

बुद्धबांधवांच्या घरात बाबासाहेबांची, गौतम बुद्धांची प्रतिमा लावलेली असते. सोबतच महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शिवाजी महाराज, शाहू महाराज, गाडगे महाराज यांच्याही प्रतिमा असतात. बौद्धबांधव त्यांच्या जयंत्याही साजऱ्या करतात. गावागावांत, समाजात प्रबोधनाचं वारं वाहू लागलं. तेंव्हा इतर जातीत अचानक स्व-जातीची अस्मिता जागृत व्हायला लागली. प्रत्येक जात स्व-जातीत बंदिस्त व्हायला लागली. म्हणूनच प्रत्येक जातीची एक संघटना उदयास येत होती. त्यातूनच आपल्या जातीच्या महापुरुषांना आपला देव मानण्याची पद्धत निर्माण होत होती. मागील वर्षी मिरवणुकीत महात्मा फुलेंच्या प्रतिमेला निळा टिळा लावला व त्यांच्या बाजूला निळा झेंडा लावलेला बघून गावातल्या माळी जातीतल्या लोकांच्या चर्चेला उधाण आलं होतं. माळी समाजातील नव्या रक्ताची काही शिकले-सवरलेले पोरं या चर्चेत सहभागी करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी म्हणून राहूल गावात आला. पोरांचा उत्साह वाढला. दोन-चार दिवस राहून पोरांनी कार्यक्रमाची तयारी केली. मिरवणुकीची आखणी केली. अकरा एप्रिल महात्मा फुले जयंती व चौदा एप्रिल बाबासाहेबांची जयंती हे दोन्ही कार्यक्रम एकत्र करायचे असं नेहमीप्रमाणं ठरलेलं होतं. चौदा एप्रिलला सकाळीच बुद्ध विहारात डीजे सुरू झाला. पांढरे वस्त्र परिधान करून सर्वांनी बुद्ध वंदना घेतली. बुद्धपुऱ्यात उत्साहाचं वातावरण होतं. सर्वांच्या अंगात नवीन कपडे होते. काही घरांवर गुढ्या उभारल्या होत्या. रस्ता, गल्ली, घरदारं स्वच्छ केलं होतं. प्रत्येक घरात उत्साहानं सण साजरा होत होता.

बुद्धविहाराला निळ्या व पंचशिलाच्या तोरणानं सजवलं होतं. दुपारपासून बुद्धविहाराजवळ मिरवणुकीची तयारी सुरू झाली. टॅक्टर धुऊन सजवण्यात आला. टालीत भगवान बुद्धाची, बाबासाहेबांची व महात्मा फुलेंची पुरुषभर उंचीच्या उभ्या प्रतिमा लावण्यात आल्या. टालीत डीजे ठेवण्यात आला. निळ्या पताका. फुलंहारं लावून ट्रॅक्टर सजवला होता. मुलं-मुली माईकवर घोषणा देऊ लागले, नारे लावू लागले, गाणे म्हणू लागले. संध्याकाळी बुद्धबांधव पांढरे वस्त्र परिधान करून मिरवणुकीसाठी जमा झाले. महापुरुषांच्या नावानं घोषणा झाली. मिरवणूक निघाली. ट्रॅक्टरच्या पुढे पोरं नाचत होते. मागे काही मुली व महिला



नाचत होत्या. काही गाणे म्हणत होत्या. त्यांच्या मागे वयोवृद्ध, भारमसुद पुरुष मंडळी चालत होती. बुद्धविहार बुद्धपुऱ्याच्या मधोमध होता. मिरवणूक पुढे निघाली. बुद्धपुरा ओलांडला. कुणबीपुरा सुरू झाला. ट्रॅक्टरवर लाईन घेण्यासाठी एक-दोन पोरं रस्त्याजवळच्या घरात जात होते. लाईन घेत होते. हे दरवर्षी प्रमाणं चालू होतं. लहान-सहान चौकांत मिरवणूक थांबे. ट्रॅक्टरपुढे पोरं नाचत. मागे महिला नाचत. कधी नारे लावत. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर की, जय. महात्मा फुले की, जय. गौतम बुद्धाचा, विजय असो.' मिरवणूक पुन्हा चालू लागे. डीजे वाजू लागे. गाणं सुरू होत असे. कुणबीपुरा संपला.

माळीपुरा लागला. लाईन भेटली. लहान चौकांत डान्स झाला. गावातील लोकं कुतूहलानं बघू लागले. मिरवणूक पुढे निघाली. कुतुहलानं बघणारे चार-पाच तरुण पोरं त्या चौकातून पुढच्या चौकात सोबतच आले. पुढील ठिकाणी डान्स सुरू झाला. नारे सुरू झाले. अचानक डीजे बंद झाला. लाईन काढून टाकण्यात आली. मिरवणूक थांबली. कुणीतरी विचारलं.

''काऊन बंद केला डीजे.''

''लाईट गेली.'' ट्रॅक्टर जवळची महिला बोलली.

''लाईन नाई गेली, बराबर पा.'' मागून आवाज आला.

''लाईन नाई देत म्हन्ते.'' बाजूच्या घरात लाईन घेण्यासाठी गेलेलं पोरगं दाराच्या वट्यावर येऊन म्हणालं.

''कोन नाई देत म्हन्ते, बलावरे त्याले बाहर.''

ट्रॅक्टर पुढचे नाचणारे तरुण पोरं ओरडले. तसे घराच्या ओट्यावर उभे असणारे माळ्याचे सात-आठ तरुण पोरं पुढे आले.

''घरमालकाचं काई म्हन्न नाई, तुमाले लाईट भेटीन, पयले आमचं म्हन्न आयकून घ्या.'' त्यातला ज्ञानेश्वर म्हणाला.

ज्ञानेश्वर हा चोवीस-पंचवीस वर्षांचा तरुण पोरगा. माळीपुऱ्यातील एका वार्डाचा ग्रामपंचायतचा सदस्य होता. एका सांस्कृतिक संघटनेचा गावचा अध्यक्ष होता. सोबतच एका राजकीय पक्षात काम करत होता. गळ्यात राजकीय पक्षाची भगवी शापी टाकून रास्ता रोको, तोडफोड, भांडणं इत्यादी कामं करत होता. व स्वतःला समाजसेवक म्हणून घेत होता. एवढ्यातच महात्मा फुले जातीनं माळी आहेत, हे त्याला माहीत होतं. माळीपुऱ्याचा मी नेता आहे, अशा आविर्भावात तो कित्येक दिवसांपासून वावरत होता.

''सांग तालं म्हन्न काय हाये.'' ट्रॅक्टरपुढचे नाचणारे पोरं पुढे आले व म्हणाले.

चार-पाच पोरांचा एकच आवाज आला. गलका पडला.

"कोन व्हय रे तो."

मागून आवाज आला.

गडबड वाढली. ट्रॅक्टरमागचे सर्वच लोक पुढे आले. गोंधळ सुरू झाला कोणतरी म्हटलं.

"शांत रा. फक्त राहूल बोलीन."

"सांग रे राहुल्या तालं म्हन्न काय हाये." राहूल.

"भाये म्हन्न येवढंच हाये, तुमी जोतीराव फुलेचा फोटो काऊन लावला." ज्ञानेश्वर.

"लावला, जे होईन ते करून घे." एकजण म्हणाला

"थांबरे, तू बोलू नोको, राहुल्ले बोलू दे." दुसरा म्हणाला

"ते आमचे आदर्श हाईत." राहूल पुढे होत बोलला.

"ते तुमचे आदर्श कसे. ते आमच्या माळी जातीचे हायेत." ज्ञानेश्वर.

"हो, ते माळी हायेत. तं मंग माळी त्याईचा फोटो आपल्या घरात काऊन लावत नाईत." राहूल.

ज्ञानेश्वर बुचकळ्यात पडला. व म्हणाला.

"तुमी त्याईले नीळ काऊन लावता."

"नीळ समतेचं प्रतीक हाये. त्याईनं आमाले समता शिकवली." राहूल.

ज्ञानेश्वर सोबतचे सात-आठ पोरं काहीच बोलत नव्हते. मिरवणुकीतल्या गर्दीसमोर बोलताना ज्ञानेश्वर मनातून खचला होता. राहूलचे आदर्श, समता, प्रतीक असे शब्द ऐकून गोंधळला होता. आणखी काय बोलावं म्हणून त्याला सुचत नव्हतं. चर्चेत ठरलेलंच तो बोलला.

"ज्योतीराव फुले आमच्या माळी जातीचा होता तुमी त्याईले नीळ लावू नोका. बस्स."

मिरवणुकीत गडबड सुरू झाली.

"नीळ लावतो, तात्याकडून जे होईन ते करून घे." मागून एकजण बोलला.

"महात्मा फुलेलेच काय तुलेई निळ लावतो. कर काय कर्त तं." गर्दीतून दुसरा म्हणाला.

गोंधळ वाढू नये म्हणून सर्वांना शांत करत राहूल म्हणाला.

"आमी महात्मा फुलेले नीळ लावनं बन कर्तो. पन तुमाले त्याईचा फोटो घरात लावा लागीन अन् त्याईची मिरवणूक काळा लागीन."



"हो, तुमी त्याईले नीळ लावनं बन करा. मी त्याईची मिरवणूक काढनी."

काय बोलावं या प्रश्नात ज्ञानेश्वर पटकनच बोलून गेला.

"कई काळशीन त्याईची मिरवणूक."

राहूल केव्हा बोलीन त्याची वाट न पाहता अगोदरच मिरवणुकीतील कुणीतरी बोललं.

आपलं बोलनं फार चांगलं सुरू आहे. असं समजून ज्ञानेश्वरही पटकनच बोलला.

"आता दा-पंद्रा दिवसांत हनुमान जयंती हाये, त्याले काढतो मी जोतीराव फुलेची मिरवणूक."

न राहवल्या गेल्यानं आणि राहूलच्या शांत शब्दांतलं बोलणं सहन न झाल्यानं एकान बोलून टाकलं.

"अबे म्यार डोक्शाच्या महात्मा फुलेची जयंती कई हाये हेच तं माईत नाई तुले, अन् चालला मोठा मिरवणूक काढ्याले. चाल व्हय बाजूनं."

मिरवणुकीत आवाज सुरू झाला. गोंधळ वाढला. कुणीतरी म्हणालं

"हानारे याले."

"जास्ती बोलू नोको. चाल व्हय बाजूनं." आणखी एक आवाज आला.

डीजे थांबला. गाणं थांबलं. गडबड वाढली. म्हणून गावातले काही लोक जमा झाले होते. भांडण-तंटा होऊ नये. म्हणून काही लोकांनी मध्यस्थी केली. ज्ञानेश्वरला सोबत घेऊन गेले. त्याच्या सोबतीला असलेल्या पोरांनी एक शब्दही काढला नव्हता. ज्ञानेश्वरलाही आता पुढे काही बोलता येईना. आपण एकटेच पडलो असल्याचं त्याच्या लक्षात आलं. पुढे बोलणं सुचत नसल्यानं तो थांबला होता. मध्यस्थी झाल्यानं तो मुकाट्यानं त्यांच्या सोबत निघून गेला.

त्याच घरी मिरवणुकीला लाईन देण्यात आली. जोरजोरानं नारे लावले. नाचणं सुरू झालं. महात्मा फुलेला नीळ लावण्याबाबतचा नवीन एक नारा तयार झाला. पोरांच्या नाचण्यात पूर्वीपेक्षा अधिक जोश होता. डीजेच्या आवाजात उत्साहात मिरवणूक गावाला चक्कर मारून बुद्धविहाराजवळ आली. शेवटी बुद्धवंदना होऊन मिरवणूक संपन्न झाली. पुढे खूप रात्र होईपर्यंत बुद्धविहारात गाणे चालूच होते.

दुसऱ्या दिवशी गावातील लहान-सहान चौकांत, मीटिंगात, महात्मा फुलेची नीळ आणि मिरवणूक याच विषयावर चर्चा चालल्या होत्या. उन्हाळ्याचे शेतीचे कामं करण्यासाठी शेतात गेलेली बाया-माणसं, त्यांच्या जवळही रात्रीच्या मिरवणुकीचाच विषय होता. बुद्धपुऱ्यातही याच विषयावर खूप चर्चा सुरू झाली. कुणाला वाटे,

'त्याला कोण्यातरी राजकीय पक्षाचा सपोट आहे.' कुणी म्हणे, 'जातीयवादी संघटनेनं त्याले पेटवलेलं आहे.' बरेच लोकं म्हणत, 'त्याले अचानक महात्मा फुलेंची आठवण कशी झाली.' अशा अनेक तर्कवितर्कानंतर सर्वांनाच वाटू लागलं की, येत्या हनुमान जयंतीच्या दिवशी महात्मा फुलेची मिरवणूक निघते काय बघावी. किमान महात्मा फुलेंचा फोटोतरी तेथे लावला जातो काय बघावा. कारण दरवर्षी होणाऱ्या हनुमान जयंतीच्या कार्यक्रमाचा अध्यक्ष ज्ञानेश्वरच असायचा. म्हणून संपूर्ण बुद्धपुरा हनुमान जयंतीची वाट बघत होता.

एक दिवस अचानक सकाळीच गावातल्या हनुमान मंदिरावर हनुमान चालीसा लागला. हनुमान जयंती साजरी होत आहे. म्हणून गावाला कळलं होतं. गाणं दिवसभर चालूच होते. बुद्धबांधव मिरवणुकीची वाट बघत होते. गावातली लोकं मंदिरावर जाऊन जेवण करून येत होते. संध्याकाळ झाली. रात्र झाली. मिरवणूक निघालीच नाही. बुद्धपुऱ्यातील लोकांचा हिरमूस झाला.

दसऱ्याला गावात लगबग वाढली. बुद्धपुऱ्यात मात्र विजयादशमीची तयारी सुरू झाली. या दिवशी आपल्याले बाबासाहेबांनी बुद्धधम्माची दीक्षा दिली. तेव्हा हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा करण्यात येते. या दिवशीही मिरवणूक काढण्यात येत असे. सकाळपासून केलेल्या तयारीनं संध्याकाळी बुद्धविहाराजवळ पांढरे वस्त्र परिधान करून मिरवणुकीसाठी गर्दी झाली. ट्रॅक्टर सजवला. ट्रॅक्टरवर गौतम बुद्ध. महात्मा फुले. बाबासाहेबांची उंच प्रतिमा लावली. डीजे, गाणे, नारे सुरू झाले. लोकांच्या प्रचंड उत्साहात मिरवणूक निघाली. मागील मिरवणुकीच्या अनुभवावरून या मिरवणुकीत चांगला उत्साह होता. जोश होता. आवाज होता. मिरवणुकीत लहान-मोठ्यांची संख्याही जास्त होती. रस्त्याजवळच्या घरातून मिरवणुकीला लाईन मिळत होती. वाजत-नाचत मिरवणूक पुढे जात होती. मिरवणुकीच्या मागे चालणाऱ्या वयोवृद्धांना काहीही विपरीत घडू नये याची चिंता वाटत होती. काही घडू नये म्हणून ते काळजी घेत होते. तरुण पोरांना जास्त नाचू देत नव्हते. जोराने नारे लावू देत नव्हते. अधिक वेळ थांबू देत नव्हते पुढे पुढे नेत होते. लहान-मोठ्या चौकांसह कुणबीपुरा मागे पडला. माळीपुऱ्यात मिरवणूक आली. कुणीतरी जाऊन घरातून लाईट घेतली चौदा एप्रिलच्या मिरवणुकीत याच ठिकाणी झालेला व्यत्यय सर्वांना आठवला. पोरं अधिकच नाचू लागले. डीजेचा आवाज वाढलेला होता. अचानक डीजे बंद पडला. अंधार पडला. लाईन गेली. सर्व गावात अंधार झाला. काय झालं काय झालं म्हणून लोक गडबड करू लागले. तेवढ्यात कुणाच्यातरी डोक्यात दगड बसला. त्यानं जोराचा आवाज केला. लगेच महिलांचाही ओरडण्याचा आवाज झाला. मिरवणुकीवर अचानक



दगड पडू लागले. गावात अंधार. कोण दगड मारते. दगड कुठून येतात. कळत नव्हतं. मायबाप आपआपली लेकरं शोधत होते. आपलाही जीव वाचवत होते. दगडांचा मारा अधिकच वाढला. लोकं वाट सापडेल तिकडे धावू लागले. मिरवणुकीच्या मागून आणि पुढून दगडांचा मारा सुरू झाला. काही दगड टिन पत्र्यांवर पडण्याचा आवाज येत होता. बायामाणसांचा ओरडण्याचा, रडण्याचा आवाज वाढला. मिरवणुकीतील लोकं जीव वाचवण्यासाठी आजूबाजूच्या घरांत घुसत होते. ते घरवालेही त्यांना आत घेत होते. सर्वत्र गोंधळ उडाला. अर्धातास गोटमार सुरू असल्यानं रस्ता मागून-पुढून बंद झाला होता. अनेकांचे डोके फुटले. मुका मार बसला. आजूबाजूच्या घरात लोकं लपले. गोटमार बंद झाली. तसे मिरवणुकीतील काही तरणी पोरं, वयोवृद्ध माणसं गोटमार झाली त्या दिशेनं धावत सुटले. दगड आले त्या दिशेनं गावाच्या बाहेर अंधारात धावत गेले. कोणीच हाती सापडलं नाही. परत आले. मिरवणूक पांगली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच काही जखमी लोकं व काही मिरवणुकीतील लोक पोलिस स्टेशनला रिपोर्ट देण्यासाठी गेले. पोलिसांनी सर्व ऐकून घेतलं आणि त्यांनाच अटक केली. नंतर गावात येऊन मिरवणूक काढणाऱ्या मंडळातील तरुणांना शिक्षण विचारू विचारू अटक केली. 'तुम्ही मिरवणुकीची परवानगी घेतलेली नव्हती. या नियमाखाली मंडळाला अटक करण्यात आली.'

गावात मिरवणुका दरवर्षीच निघत होत्या. बुद्धपुऱ्यात मात्र चौदा एप्रिल आणि विजयादशमीची मिरवणूक निघायची. इतर समाजात मात्र अनेक मिरवणुका निघत असत. प्रगट दिनाची, रामनवमीची, हनुमान जयंतीची, परशुराम जयंतीची, आषाढाची, गणपतीची, दुर्गादेवीची इत्यादी या मिरवणुकीची सुद्धा परवानगी काढलेली नसायची. गावात सलोखा होता. मिरवणुकीवरून गावात कधीच वाद झालेला नव्हता. सर्व गाव शांत सभ्यतेनं नांदत होतं. आदर्श म्हणून जिल्ह्यात नाव होतं. त्यामुळे गावातील कोणत्याच मिरवणुकीला पोलिस स्टेशन लेखी परवानगी न देता तोंडी परवानगी देत असे. कुठल्याच मिरवणुकीसाठी गावात कधीच पोलिस येत नसत. मिरवणूक शांततेत निघत असल्यामुळे याहीवर्षी पोलिसांनी नेहमीप्रमाणं तुमच्या जबाबदारीवर मिरवणुकीची तोंडी परवानगी देली होती. लेखी परवानगी मात्र याही वेळेला नव्हती; परंतु मिरवणुकीत झालेल्या गोटमारीमुळे पोलिस स्टेशनला रिपोर्ट देण्यास आलेल्या लोकांवरच कार्यवाही करण्यात आली होती. त्यात शिक्षण घेणारी पोरं अधिक होती. राहूलला तेथेच पकडण्यात आलं. पोलिसांनी गावात येऊन सर्व शिक्षण घेत असलेल्या पोरांनाच पकडून नेलं व त्यांच्यावर केसेस दाखल केल्या.

अकोला हे जिल्ह्याचं ठिकाण होतं. या शहरात दसरा सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यासाठी अनेक जिल्ह्यांतून, शहरांतून कार्यकर्ते आलेले होते. त्यात देवळीचेही काही तरुण पोरं सहभागी होते. प्रामुख्याने ज्ञानेश्वर व त्याचे काही-मित्र त्या कार्यक्रमात होते. गावातील संघटनेचा तो अध्यक्ष असल्याने आयोजकासोबत त्यांचे चांगले संबंध होते.

गोटमारीनंतर गावात विविध पक्षांचे नेते आले. कार्यकर्ते आले. गावाला भेट देत होते; परंतु मिरवणुकीवर झालेल्या गोटमारीची बातमी कोणत्याच वृत्तपत्रातून छापून आलेली नव्हती.

गावातल्या पोरांना पोलिसांनी पकडून नेल्याने गाव उदास वाटत होतं. गावात मिरवणुकीवर गोटमार कोणं केली याचा अंदाज बांधला जात होता. आणि बुद्धपुऱ्यात मात्र आपल्या शिकलेल्या तरुण पोरांनाच अटक झाल्यानं उदासीनता पसरली होती. त्या पोरांच्या जमानतीसाठी त्यांचे मायबाप कागदपत्रं गोळा करण्यासाठी धडपड करत होते.

❦



# वाघाई

"कुठीसा चाल्लारे देवराव घाईघाईनं" त्यानं आवाजाच्या दिसेनं बघितलं. किसना आवाराच्या दरवाजातून बाहेर येत होता. तसा देवराव दांदरला. "अं काई नाई ... येतो म्हन्ल अंबराईतून पराटी फुटली - गिटली का पायतो ..."

"आज बाया गेल्या वाटतेना" किसना अंदाज घेत बोलला.

"नाई, बाया सटवाईत गेल्या"

"अस्स"

"तुमाले कसं माईत?"

देवरावच्या या प्रश्नावर किसना थोडा दचकला. त्याचा लक्षात येऊ नये व त्याला टाळावं म्हणून तो म्हणाला.

"नाई, तुई भाबी म्हने .... ये मंग अंबराईतून."

देवराव रस्त्यानं लागला. त्याच्या डोक्यात आलं. 'आपुन बाया कापूस येच्याले पाठवल्या हे याले कसं माईत. भाबीनं सांगल्लं म्हने. अन् भाबीले कोनं सांगल्लं. कदाचित रस्त्यानं आतांनी इचारलं असीन तिनं. एखांद्या बाईले. साऱ्या बायां तिच्याच दारातून जातात.' देवराव चालत होता. तो रस्ता सरळ अंबराईच्या शेताकडे निघत होता. तिथूनच एक रस्ता टाकळी गावाकडे जात होता. त्या रस्त्यावरच देवरावचा गाई-म्हसीचा गोठा होता. हा गोठा म्हणजे गावातील शेवटचं घर. तिथून पुढं बंदी सुरू व्हायची. त्या बंदीत लहान-लहान पराटीची-हिवराची झुडपं होती. त्या रस्त्यालगतच्या भागात गावातील बाया शौच्यास बसत. देवराव लगबगीनं येऊन गोठ्याचं मोठं टपरी गेट उघडून आत गेला. दरवाजा पुन्हा बंद झाला. गोठ्याच्या मागच्या दारातून कमली आत येऊन देवरावची वाट पाहात होती.

"लयच उसीर केला."

"हो, आमासक थांबलो होतो रस्त्यात."

तो जवळ गेला तशी ती पुन्हा बोलू लागली.

''कोनी इत्रा. आज राऊ द्या. थांबाना.''

'धाडकन' गोठ्याचा मागचा टपराचा असलेला दरवाजा वाजला. किसना गडबडीत आत येत होता. पुढे देवराव पाहून तो घाबरला. अन् थोडा दचकलाही. त्याला वाटलं होतं. देवराव आंबराईत गेला. आता आपण गोठ्यातून एखादी सागाची बल्ली आणावी. देवरावच्या धुऱ्यानं साग लावलेला होता. त्यातील काही झाडं तोडून आणून त्यानं गोठ्यात ठेवले होते. ते नेण्यासाठी म्हणून किसना नेहमीप्रमाणे चोरी करण्यासाठी गायवाड्यात आला. अन् पुढे असणाऱ्या देवरावला पाहून घाबरून गेला. कमली अन् देवराव स्वत:ला लपवण्याचे प्रयत्न करत होते. सावरा-सावर करीत होते. आणि आपणच चोरी पकडली या भावनेत किसना उभा राहिला. देवरावच स्वत:च्या गायवाड्यात अपराधी भावनेनं किसनाकडे बघत होता.

''मले वाटलं मन्यानं दुपारचे ढोरं सोडलेच नाईत काय ...? म्हनून जाता-जाता पायाले आलो ...'' किसना

आपली चोरी किसनाने बाहेर सांगू नये म्हणून त्याच्या जवळ जात देवराव म्हणाला.

''नाई नाई, ढोरं मंगाच सोळ्ले त्यानं''

''अस्सं काय. जातो मंग मी, वावरात चाल्लो होतो.''

बोलतानी किसना भितीजवळच्या नव्यानेच तोडलेल्या सागाच्या बल्ल्याकडे बघत होता. ते लक्षात आल्यानं देवराव म्हणाला.

''बल्ली लागत अशीन तं घेवून जाना एखांदी. किसना भौ''

दरम्यान कमली सर्व आवरून मागील दरवाजातून निघून जात होती. तिला पाठमोऱ्या पाहात किसना म्हणाला.

''आलोच तं द्या बरं एकांदी, आवताले लावत होतो.''

देवरावानं आपल्या हातानं किसनाले एक बल्ली काढून देली.

किसना बल्ली घेऊन आता पुढच्या दरवाजातूनच निघाला होता. दरवाजाजवळ येऊन देवराव म्हणाला,

''किसनभाऊ. पायजा गनपत-गीनपतले नोका सांगू. फालतू भांडनाची कय.''

किसना विजयी मुद्रेने हसत म्हणाला.

''नाई-नाई हे काई सांग्याची गोट हाये काय?''

गणपत अन् किसना सोबतच राहायचे. सोबतच चोऱ्या करायचे. किसना ही गोष्ट गणतपजवळ केव्हाही जाऊ शकते म्हणून देवराव चिंतेत पडला होता.



गणपत भांडगोडा माणूस. अन् किसना कपटी. विश्वासघातकी माणूस. किसना गणपतले भेटायच्या अगोदर आपणच किसनाले काहीतरी आमीस द्यावं म्हणून तो त्याले भेटण्याच्या काळजीत पडला. दुपारपासून तो लक्षविचलित वागत होता. दिवस पुरता डुबायला आला नसतानी तो संध्याकाळचं चारापाणी करण्यासाठी गोठ्यात आला होता. हाच रस्ता किसनाच्या शेताकडे जात होता. तो परत येईल म्हणून देवराव दरवाजात घुटमळत होता. दिवस पटकन खाली उतरला नाही. रस्त्यात वरदळ नव्हती. भरपूर वाट बघितल्यानंतर रस्त्यावर येणारे-जाणारे दिसू लागले. बायांच्या डोळ्यांवर गाठोडे होते. लगबगीने रस्ता चालू झाला. चालत येणाऱ्या वच्छलीनं गाठोडं सावरत म्हटलं,

''अवं देवराव बंडी काऊन नाई पाठोली. गोठोड्याले. कईची वाठ पाऊन रायलो आमी.''

देवराव गठोड्यासाठी बंडी पाठवण्याचं विसरला होता. ते लपवत तो म्हणाला,

''आँ, हो, बयलं नाई आले ना आजून घरी.''

उत्तर ऐकण्यासाठी न थांबणाऱ्या बाया पुढे गेल्या होत्या. सर्वांत शेवटी हळू-हळू येणाऱ्या शेवंताबुढीले त्यानं विचारलं.

''लयच लवकर झालं वावरं''

''हो, डाबरीकळून तं अवचटच बोंड होतं.''

''काऊन काल पायलं म्यां त लयच फुटेल होती तिखून''

''कायचं रे बापा. काईच तं नोतं तिखून. म्हनूनच तं लवकर झालं आमाले वावर''

ती चालत-चालतच बोलत होती.

''बरं-बरं संध्याकाई लवकर येजा कापूस मोज्याले''

कापून ठेवलेल्या वांग्यासारखा उजेड काळसर होत होता. मन्या येऊन ढोराचं चारापाणी करू लागला. देवराव त्याच्यासोबत सहज बोलावं म्हणून बोलत होता. आता अंधार वाढू लागला होता. ते घरी जायला दरवाजात आले तशी दोन माणसं लगबगीनं रस्त्यानं जात होते. त्या अंधारातही देवरावनं त्यांना ओळखलं होतं. गणपतच्या डोक्यावर दोन बायांच्या वेच्याचं कापसाचं गाठोडं होतं. त्याच्यामागे किसना चालत होता. ते जवळ येताच देवराव म्हणाला,

''काय किसनाभू.या ना आमासेक इकडे''

गणपतच घाबरून उभा राहिला.

''आँ काय म्हन्त''

''नाई-नाई. तुमाले नाई. तुमी जा. भारी होईन्ना गाठोळ.''

"तू जाय गनपत, मामी अन् तू गाठोळ मोजून घेजो"

गणपत थोडा धाकधुगीतच तिथून निघाला.

देवराव सहज म्हणून बोलला.

"दोन गाठोळे हात काय?"

किसना काहीतरी लपवत म्हणाला,

"नाई-नाई, मंग अतून गेलो कानी. तवा पासून येचली एकान्दी खंदाळी, ते व्हय."

ते बोलत असल्यानं मन्याही त्याच्याजवळ उभा राहिला होता.

"मन्या तू जाय. त्या घेऊन लवकर ये. कापूस मोज्याले."

मन्या थांबणार होता. पण जाय म्हटल्यानं तो रस्त्यानं लागला.

"काय किसनाभो. पायजा बॉ ते. नायतन गनपतले."

त्याचं अर्धवट वाक्य तोडत किसना म्हणाला,

"नाई-नाई देवराव पाटील तुमचं सांगीन काय मी राज्या, आमाले रायनं नाई काय गावात, तुमी काऊन भिऊन रायले, मी हावोना तुमच्या पाटीमांगं."

"ते तं हायेच म्हनाव, दारू-गीरू पेता काय?"

"मी तं पेत नस्तो ... पन तुमी म्हन्ता तं या जराभऱ्या घेऊन... कापूस-मापूस मोजल्यावर."

"हो तसं करू मंग, गावरानच आन्तो."

"कोन्तीई आना, या जराभऱ्यानं."

किसना निघून गेला. देवरावनं गोठ्यातून एक चक्कर मारली. आणि तोही घरी निघाला. गावात लोडशेडिंग होती. गल्लीत भरपूर अंधार पसरला होता. अंदाजानं रस्ता तुडवत तो पुंड्याच्या घराकडे निघाला होता. पुंड्या गावात दारू विकायचा. त्याचा हप्ता तो पोलिसांना द्यायचा. पोलीस येऊन दारू पिऊन सोबत साहेबासाठीही दारू न्यायचे. देवराव किसनाले चांगला ओळखून होता. आज किसनाले दारू पाजून त्याचं तोंड बंद करायचं होतं. त्याच्यासाठी आजचा दिवस महत्त्वाचा होता. कुत्रं अंगावर धावल्यानं तो दचकला.

"हाळ-हाळ, पुंड्या लेका खायाले अन नाई अन् कायले कुत्रे-मांजरे पोस्त वे."

"हाडं, कोन? देवराव पाटील व्हतं काय?"

"हो"

"बापा एवढ्या अंदाराचे कायले आले. काई बाया-गिया पायजत काय? इकडे कोनी नाई येन्यासारखं."



"बाया-गिया नाई पायजत, दारूच पायजे व्हती, हाये काय जरासिक?"

"कोनी पावने-गीवने आले वाट्टे."

"नाई, मलेच पायजे व्हती."

"बापा कई पासून? डुबवता शीरकुन्ना पाटलाले."

"नाई, किसना भाऊले पायजे व्हती."

"कोन्या देसमुखाच्या."

"नाई. बामनाच्या"

"तुमी त्याईच्या नांदी लागले का आता"

"नाई रे. काम व्हतं त्याईच्या संगं"

"पायजा तो बामन म्हन्जे कपटी बामन. अच्छेकाले फसवते बरं"

"नाई-नाई. तसं काई नाई. आपून काय कमी हावो मंग"

"हो तेच म्हन्तो, आता नेता की मन्याले देता धाडून"

"मन्याले देतो धाडून, दोनेक सीस्या देजो"

"हो-हो"

देवराव. पुंड्याच्या घराकडे खूप दिवसानंतर आला होता. तो दारू पीत नसल्याचं पुंड्याला माहीत होतं. घरी जावाई, साळा किंवा पाहुणे आले की, तो दारूसाठी यायचा. कधी मन्याला पाठवायचा. आज तो स्वत:च आला होता. त्याला आपलं प्रकरण झाकण्यासाठी किसनाले निंद करायचं होतं. तसं कमली प्रकरण झाकते म्हणून त्याला खात्री होतीच. तो घरी आला तसी त्याची बायको म्हणाली.

"शेवंता बुडी म्हने डाबरीकून येचून नेलं की काय, वाट्टे बाई"

"कुटल्लवं, फुटलंच नसीन अजून"

"तं पयला ऐचा तं लय निंगाला होता, तरी मी म्हनो किसना बामनाले खरवालीले दया म्हनून.

"तो कायचा राखते वं इमानदारीनं, तोच तं नेते येचून"

"अवं तो नेते. पन कमी नेत होता. आता पा बरं. अर्ध्याले अर्धा येचा नेला. मले तं वाट्टे त्यानंच नेला येचून."

"नाई वं तो कायले नेते येचून"

"काय भरवसा, तो हायेच तसा."

बायकोचा विषय मोडत तो बोलला.

"मन्या आला नाई का अजून, कई येते लेकाचा."

मन्यासोबत त्यानं कापूस मोजला व हळू आवाजात त्याला म्हणाला.

"पुंड्याच्या घरून दारू घेऊन किसना बामनाच्या घरी नेऊन ठेव."

"पुंड्याच्या घरून दारू घेऊन किसना बामनाच्या घरी नेऊन ठेव.''

"पुंड्याच्या घरून दारू घेऊन किसना बामनाच्या घरी नेऊन ठेव.'' किसना मन्या गेला. नंतर काही वेळानं तोही किसानाच्या घराकडे निघाला. किसना दरवाजातच गणपत सोबत बोलत उभा होता. देवराव दिसता बरोबर किसना म्हणाला.

"आले काय पाटील. चला गनपत बॉं च्या घरी.".

सगळे जनं गणपतच्या घरी आले. देवरावच्या मनात थोडी भीती होती. आणि थोडा आनंदही होता. सपरित बसतांनी गणपतनं आवाज दिला.

"गिलास आन बरं वं तीन''

अंधारलेल्या घरातून आवाज आला.

"हो-हो आन्तो''

अधिक आवाज न करता तिघंही बसले होते. कमलीनं गिलास आणले. अन् जातानी काहीतरी बोलावं म्हणून ती बोलली.

"कोन, किसना बाबा व्हतं काय''

"हो ताई. मी अन् देवराव पाटील हो''

कमली आत गेली. तिले वाटलं. "किसन बामन बोल्याले लय गोड बोलते. तोंड भरून ताई म्हन्ते. अन् वक्तावर शेन खाते. दारू पाजत त्यानं संबंध वाढवले. अन् आपल्या नवऱ्याले दारूवर लावलं. तसा तो आता देवराव पाटलासोबत संबंध वाढवीन अन् त्यालेही दारूवर लावीन. मग एखादं वावर नावावर करून घेईन तं कोनाले माईतई होऊ देनार नाई. अंन् देवरावच्या बायकोलेई सोळनार नाई. आपल्यासारखं.'

हळू आवाजात किसनानं गिलास भरले व म्हणाला.

"घ्या पाटील''

"नाई हो किसनभू, मी येवळी नाई घेत राज्या. मले सवयच तं नाई, पन तुमच्याच्यानं घेऊन रायलो.''

"मले माईत हाये ते सगळं, तू या गनपतले नोको भीऊ.''

"नाई-नाई गनपत बॉं चं काय, तुमी हा ना आता''

"मालं काय हाय बापा''

"गनपत बॉं, देवराव पाटील कानी तुमाले भीऊन रायले''

"मले सरम्याचं काय हाये त्याच्यात''

"काय राज्या किसनाभू''

"अहो पाटील. तुमी कायले घेता याले''

"हे मले काऊन भऊन रायले''

विषय काढतो की काय म्हणून देवराव पाटील काळजीत पडला. कमलीला



मात्र किसनाच्या लुचाटपणाचा परिचय होता. ती आतून त्यांचं बोलनं ऐकत होती.

"अहो गनपत बॉं, यायले वाट्टे का तू त्यायच्या बायकोले सांगसीन, हा दारू पेला म्हनून.''

"हट्ट राज्या पाटील, मी कायले सांग्तो हो.''

देवरावचा जीव भांड्यात पडला. तो खोटा-खोटा हसला. त्यानं आयुष्यात कधीच दारू पेली नव्हती. पण आज तो अडचणीत सापडला होता.

"एवळं म्याट समजता का तुमी. गनपत बॉं ले.''

म्हणत किसननं दोघांच्याही हाती गिलास देले. हातचा गिलास प्यावा लागतो म्हणून देवराव पाटलावर संकट पडलं होतं. किसनाचं वाक्य गणपत पूर्ण करत म्हणाला.

"सांगा बॉं मी काय म्याट हावो काय, सांगीन तुमच्या बायकोले.''

देवरावनं घोट घेतला. कडूडक्क. जीभ चर्र झाली. मोठ्या धाडसानं तो घोट त्यानं गिळला. पोटात आग पेटल्यासारखं त्याले वाटू लागलं. तरीही तो किसनाच्या भीतीपोटी पिऊ लागला. दोन्ही दारूच्या शिश्या रिकाम्या झाल्या. किसना उठला व गनपतले म्हणाला.

"तू घरीच झोपून राय, मी देवरावले त्याच्या घरी सोळून येतो.''

देवराव तोल सावरत चालत होता. झोकांड्या खात होता. तो कोणत्याही क्षणी पडू शकत होता. त्याचं एक पाऊल चुकल्यानं किसनानं त्याले दुसरंही चुकीचंच पाऊल टाकण्यासाठी भाग पाडलं होतं. पावलाचा अंदाज चुकत होता. अंधाररात्र वाढली होती. अधूनच एखादा येणारा-जाणारा भेटत होता. सहज विचारत होता.

"कोन व्हय''

"कोनी नाई, देवराव पाटील व्हत, जरासिक जास्त झाली.''

किसना भेटणाऱ्याले जाणीवपूर्वक सांगत होता. देवराव पाटलाले त्यानं घराजवळ आणलं व सोडून देलं. आणि तो निघून गेला.

दोन-तीन दिवस देवराव कोणालेच भेटला नाही. तसा तो कामतच होता. आपला नवरा दारू पेल्याचं त्याच्या बायकोले नवल वाटत होतं. आणि ते आपल्या रक्तातच असल्याचं तिले वाटत होतं. म्हणून तिनं काहीही म्हटलं नव्हतं. पण आपल्या नवऱ्याचं घरात लक्ष नाही. वावराकडे लक्ष नाही. ढोरा-वासराकडे लक्ष नाही. हेच तिच्या ध्यानात होतं. म्हणून ती स्वत:च शेतात जावून यायची. घरातलं बघायची. संध्याकाळी लेकरं बाहेर खेळत होती. बाहेरून आवाज आला.

"हात का घरी देवराव पाटील"

"हो. कोन व्हय"

"या ना दारी. मी हो किसनाभाऊ"

"किसनभू होतं काय. आलो-आलो. काय म्हन्ता भाऊ"

"काई नाई. चला येवू घरून. जेवन झालं काय"

"नाई आजून. काय व्हतं. चला"

दोघंही किसनाच्या घरी आले. गणपत बसलेलाच होता. दारूही आणून ठेवलेली होती. किसनानं स्वत:च्या पैश्यानं दारू विकत आणली होती. बसतांनीच तो म्हणाला.

"जाय गनपत बॉ. आना घरातली डपकी. बसा खाली पाटील"

"अरे बापरे. दारूचा प्रोग्राम हाये काय. आपून नाई घेत"

"असं म्हनल्यानं जमते काय पाटील"

"किसनाभाऊ आयकाना तुमी"

गणपतनं डबकी आणून तिघांचे तीन गिलास भरले. व आपला उचलून घेतला. किसनानं आपला गिलास उचलत म्हटलं

"घ्या पाटील, उचला तो"

"नाई किसनभू, दारू सोडून काईई सांगा"

"त्या दिवसी कसी घेत्ली."

"त्या दिवसाची निराळी गोठ होती."

"ईच्यार रे गनपत त्याईले त्या दिवसाची निराळी गोठ"

किसनाचं बोलणं देवरावच्या लक्षात आलं. तो कदाचित गणपतले सांगूही शकते. अशी शंका त्याच्या मनात आली. खरं तर हा ब्लॅकमेलींग प्रकार होता. नाईलाजास्तव त्यानं गिलास उचलला. पहिली फेरी संपवली. दुसरी फेरी चालू होतानी देवराव डगमगला.

"घेता का नाई"

किसनाच्या या वाक्यावर तो पुन्हा सुरू झाला. पोटात एक-एक आतडं पेटत होतं. पोटातले आतडे कुठल्याही क्षणी बाहेर येतात की काय, असं त्याला वाटू लागलं. तोंड कडू झालं होतं. प्रत्येक घोटाबरोबर तो चेहरा कडू करत होता. गणपत आपल्याच तालात होता. किसना प्रत्येक घोटाबरोबर उजळत होता. दरवेळ्या प्रमाणं त्यानं दोघांपेक्षा कमी घेतली होती. गणपत डच भरला होता. त्याला तिथंच ठेवून किसना देवरावला सोडवण्यासाठी घराबाहेर पडला. देवराव डुलत. डुलत. थोडा बडबडत घराकडे चालत होता. त्याला आपल्याबरोबर कुणी



असल्याचं माहीत नव्हतं. सकाळपर्यंत त्याला काहीच कळलं नाही.

दोन-चार दिवसांनी देवरावनं आपल्या जवळच्या मित्रासोबत दारू घेतली. मित्रालाही त्याची ही माणुसकी बरी वाटली. त्यांच्या सोबत अधून-मधून त्यांच्या मैफली सुरू झाल्या. किसनाही कधी-मधी देवरावला स्वत:च्या खर्चानं दारू पाजायचा. मग मर्जीखातर देवराव त्याला पाजायचा. वर्ष दोन वर्ष सहज निघून गेली. पैसा खर्च होऊ लागला. शेतीच्या कामाकडे दुर्लक्ष होऊ लागलं. व्यवहार निष्काळजीपणे होऊ लागला. त्याची दारू जस-जशी वाढू लागली तस-तसा तो बेफिकीर होत चालला होता.

"राती तुमी लयच घेत्ली होती."

"नाई वं कोन म्हन्ते"

"कोन म्हन्ते कायचं. धड चालताई ये नाई तुमाले"

"तं. बापा. येवळी लागे"

"नाई तं काय शाई देत जा तुमी. जेवाचं तं सुत नोतं तुमाले"

"नाई नावं. थर्टी फस्टच्यान घेत्ली जरासिक"

"या अगुदर नोत्या आल्या का थर्टी फस्टं तुमाले"

देवराव रात्रीच्या धिंगाण्यानं थोडा शरमला. नंतर तो स्वत:वर अन् थोडा बायकोवर चिडला.

"तू बस कर्तं की नाई आता"

"हो मी बस कर्तो, पन तुमचं इतक्यानं किती‌खेप झालं आता"

"होऊ दे. मा बापाची इस्टेट व्हय. ता बापाचरून नाई आन्ली काई"

देवरावचं असं माय-बापासवरून बोलणं सुरू झालं म्हणून पार्वतीनं आवरतं घेतलं होतं. असं एवढ्यात अधून-मधून व्हायचं. दोन लेकरं होईतो त्यानं आपले माय-बाप काढले नाहीत. पण दारूमुळे आता तो बोलू लागला होता. म्हणून आपण त्याला दारूबद्दल कधीच बोलायचं नाही. असं तिनं मनोमन ठरवून टाकलं होतं. आपल्या घरात भांडणं होतात. आपली दारू वाढली याचं देवरावला भान नव्हतं. तो दारूत जास्त वेळ घालवू लागला.

सिमग्याच्या दिवशी तर किसनानं धनगराच्या मल्हारीला, बंजाऱ्याच्या पुंडाला, गणपत अन् देवरावला सोबत घेऊन निजामाच्या पाटातील पुंड्याची भट्टी गाठली. सिमग्यासाठी म्हणून पुंड्यानं किसनाजवळचे उसने पैसे घेऊन डब्बे वाढवले होते. किसनानं सर्वांना आग्रह करू-करू डच पोट भरून पाजली होती. संध्याकाळपर्यंन्त ते पीत होते. किसना घरी येऊ शकत होता. बाकी पुंड्यासगट सारेजनं रात्रभर बेहोस तेथेच पडून होते. दुसऱ्या दिवशी थोडा उतारा घेऊन ते सर्वजनं घरी आले

होते. पार्वतीले हे सगळं गावातून समजलं होतं. आपल्या नवऱ्याले आपण समजावून सांगतलं की, तो भांडणास उठतो. नाही सांगतलं तं संसाराचा सत्यानाश होईल. म्हणून तिनं तिच्या वडिलांना बलावून घेतलं होतं. त्या दिवसीही देवराव घरी जेवायला आला नाही. दारू पिऊन तिकडे फिरत होता. संध्याकाळी तो घरी आला. सासरा बसलेला पाहाताच तो दचकून बोलला.

"रामराम कदी आले"

"आता आलो, सयसंध्याकाई"

तोंडाचा येणारा वास व आपला जाणारा तोल सावरत तो आत गेला. आपण काईतरी कामात असल्याचं तो दाखवत होता.

सासरा दुपारीच आला होता. गेल्याकाही दिवसांतील वागणूक त्याला मुलीकडून कळली होती. जावाई बाहेर आल्यावर आपण विषय काढावा म्हणून सासरा वाट पाहात होता. तो येत नसल्यानं शेवटी आतल्या दरवाजाकडे बघून सासरा बोलला.

"काय म्हन्ते पीक-पानी बुवासाहेब"

"काई नाई औन्दा आमच्याकळे, पानी कमी होतं"

"जंगल तं चांगला हाये तुमच्या कळचा"

"कायचा हो, रिझल्ट घसरले यावर्षी"

"आमासेक पैसे पायजत व्हते. आमाले यावर्षी"

"पयसे"

"हो, दोन एकराचा सौदा केला होता. नुपर हाये जरासिक, म्हटलं जवाई बुवाले म्हनाव"

"हो खरं हाये तुमचं. पन आमच्या जवळ कुठ्ल्ले पयसे हो"

"कापसाचे पैसे अन् यावर्षीचं पिक सरलं काय सगळं"

"कायचं पीक. गेल्यावर्षीचं कर्ज फेळलं. खान्यात अन् घरखर्चात गेलं सगळं, काई ठरत अस्ते काय?"

"सारा पैसा गेला. म्हन्जे कसं व्हईल अश्यानं"

देवरावच्या आता लक्षात येऊ लागलं. आपण पैस्याची केलेली उधडपट्टी बायकोनं सासऱ्याले सांगतली असावी. आपली दारू, कमली, या साऱ्या भानगडीवर आता सासरा बोलणार म्हणून त्याला कळून चुकलं. त्याला चूप करण्यासाठी म्हणून त्यानं म्हटलं.

"कसं होईन म्हन्जे, मालं मले समजते. कोनाले मांगा लागते काय, का कोनाचा एका पैस्यानं मिंदा हावो मी."



"तसं नाई बुवासाहेब. सहज म्हन्त ग्या."

देवरावचा वाढता सूर सासऱ्याच्या लक्षात आला होता. म्हणून मिटवण्याच्या शब्दांत ते बोलू लागले.

"दोन लेकरं खानारे हात तुमचे, पैसा जरा जपून वापरत"

देवराव गेल्या दोन दिवसांपासून न जेवता सारखा दारूच पेत होता. सासरा अधिक बोलू नये म्हणून त्यानं आपलं बोलणं अधिक वाढवलं होतं.

"कोनं माल्या मंदात बोलू नये, मालं मले समजते."

देवरावच्या अशा परक्या शब्दानं सासरा दुखावला होता. पार्वतीला आपल्या बापाचा अपमान सहन झाला नाही. ती दरवाजा जवळून चुपचाप ऐकत होती. त्या दोघांचं आणखी वादू नये म्हणून ती मध्येच जाऊन बोलली.

"हात पाय धुवून घ्या. ताटं वाढली"

ही जेवणाची वेळ नव्हती. पण वाद वादू नये म्हणून आपली मुलगी मध्येच बोलल्याचं सासऱ्याच्या लक्षात आलं. जावई आताही पिलेलाच आहे. त्या अवस्थेत आपलं बोलणंही ठीक नाही. आणि त्यांना काही समजावणंही ठीक नाही. म्हणून सासराही चूपचाप बसून राहिला. घरात काय करावं यापेक्षा बाहेर जावं. म्हणून देवराव पुंड्याच्या घरी दारू प्यायला जाण्यासाठी घराबाहेर पडला.

आता संपूर्ण गावात देवरावची दारोड्या म्हणून बदनामी झाली होती. त्यात त्याचा पैसा गेला होता. काही कमलीनं लुबाडला होता. तसं सर्व पीक गेलंच होतं. व कर्जही वादू लागत होतं. परवा सासऱ्यासोबत आपण अपमानजनक बोलण्यानं तो स्वत:च खजिल झाला होता. पुंड्याच्या घरी जाऊन तो आणखीन पिऊन आला. तेव्हा त्याला निट चालता, बसता येत नव्हतं. न जेवताच तो झोपून रायला. घरातील वातावरण गंभीर होत होतं. पार्वती घरात फारशी बोलत नाही. उन्हाळ्यात गायवाड्यात झोपतो म्हणून तो सांगायचा व दारू पिऊन पडायचा. दिवसा घरी येऊन गेला की, रात्रीचा तो कधी गायवाड्यात, तर कधी गणपतकडेच झोपायचा.

पार्वतीच्या हे कानावर यायचं. गावात कुणीही उघडपणे चर्चा करत नसे, पण कानोकान सर्वांनाच ते ठाऊक झालेलं होतं. शेतीवाडीची कामं तशीच पडून होती. गुराढोरांची कामं पडून होती. गणपतसोबत तो दारू प्यायचा. किसना आता धनगराच्या मल्हारीलाही सोबत ठेवायचा. किसनाच्या शब्दावर, देवराव सर्वांनी पिलेल्या दारूचं बिल द्यायचा.

उन्हाळा सरत आला. आकाशात ढग फिरू लागले. जोराची हवा आली. धुळ उडू लागली. हवेमागे टपोरे थेंब फपुड्यांत पडू लागले. पावसाने वेग घेतला.

जमीन ओली झाली. तसा वातावरणात मातीचा सुगंध दरवळू लागला. गावातील हालचाली वाढल्या. सुतार, लोहार व बाया-मानसांची कामाची गडबड वाढली. जवळपास सर्व शेती तयार करण्यासाठी बाजरात लोकांची गर्दी दिसू लागली. नदी-नाले एक जमीन पेरण्यासाठी तयार झाली. दोन-चार पाणी येऊन गेले होते. तो पिलेलाच झाले होते. देवराव चिंतेत आपल्या गायवाड्यात बाजीवर पडून होता. करत होता. पण तरीही बि-बीयाणाची, पेरण्याची तो मनातच काळजी पाटीलकीचा होता. अपमानामुळे पैसे देणार नाही. सावकाराला मागणं म्हणजे पाटीलकीचा सावरा अपमान. शेवटी त्याच्या डोक्यात नेहमीप्रमाणं किसना आला. तो आपल्याले पैसे देईल याची त्याला खात्री होती. तो रात्रीच दारू पितानी किसना सोबत बोलला व घरी आला. सकाळी देवराव तयारीतच बसला होता. तेवढ्यात बाहेरून आवाज आला.

"झालं का हो पाटील आवरा लवकर"

"हो हो झालं, मी तुमचीच वाट पायत होतो, या ना अंदर"

"अंदर कायले, चला पटकन गाडी पकडा लागते"

पार्वतीला हे सगळं कळलं होतं. लोकांचे पेरणे सुरु झाले होते. आणि तिच्या घरात बी-बियाणं नव्हतं. आपला नवरा किसनासोबत बी-बियाणं आणायला जात आहे. असं तिला नक्की वाटलं आणि ते खरंही होतं. सकाळी न जेवता गेलेला देवराव संध्याकाळी एका ॲटोत बी-बियाणं घेऊन घरी आला. त्यातील काही किसनाच्या घरी उतरवलं होतं. काही मल्हारीच्या घरी अन् काई गणपतच्या घरी. दुसऱ्या दिवस पासून पेरणं सुरू झालं. एक-एक करत सर्व जमीन पेरून झाली. रोज तिफण्याले दारू पाजण्याच्या बहाण्यानं देवराव, गणपत, किसना, मल्हारी सोबत दारू प्यायचे. कधी पुंड्याही असायचा. सर्व बी-बियाणं संपलं. पेरून झालं. त्यांची मजुरी देऊन झाली. लेकरासाठी शाळेचे कपडे. पुस्तकं आणले. घरात बाजार, किराणा आणला. सर्व चैन झाली होती.

आकाशात ढग जमायचे. रात्रीला ढगांची गर्दी व्हायची. एक-एक दिवस पुढे चालला. पाणी लांबू लागलं. ढग येऊनही पाण्याचा थेंब पडत नसे. लोकांचे चेहरे चिंताग्रस्त होऊ लागले. कोणीही फारसं बोलत नसे. गप्पा नसत. पाण्याचे दिवस वाढले होते. या आठवड्यात पाऊस पडला नाही की, पेरण्या डूबणार होत्या. शेतकरी रात्रंदिवस आभाळाकडे पाहात असत. पुढे-पुढे आकाशात ढगही दिसत नव्हता. चिंता वाढली. लहान-सहान शेतकरी घाबरून गेले. गाव सोडण्याची भाषा करत होते. लहान-सहान कोंब माना टाकून जागीच भुरके होत होते. जवळचा पैसा गेला होता. अन् पाणी नाही म्हणून देवरावची दारू अजूनच वाढली होती. तो घरात रमायचा नाही. गायवाड्यात लूट पिऊन पडायचा. कधी गणपतच्या



घरी असायचा. त्यातच किसना त्याला मटणाची पार्टी मागायचा. दारू पिऊन सर्व जनं जेवायचे. दुष्काळातही त्यांचं दारू पिणं, पार्टी करणं पार्वतीला खटकत होतं. सर्व गोष्टी तिच्या कानावर येऊनही ती बोलत नव्हती. पण तिचा जीव तुटत होता.

पुनर्वसू ते पुष्य नक्षत्रात पाणी यायला लागलं. पहिल्या पेरण्या दुबल्या होत्या. आता दुबार पेरण्या कराव्या लागत होत्या. आता काही पिकं येणार नव्हती. आणि जमिनी तशाच ठेवताही येत नव्हत्या. दुसऱ्या पेरणीची चिंता देवरावला पडली. तो आणखीनच दारू पिण्यासाठी म्हणून पुंड्याच्या घरी गेला.

"देवराव पाटील त्या किसनाच्या नादी लागू नोका बरं, तो मानसाले बराबर दारूवर लावते. वेसनापासून अन् बामनापासून कई मानस रावं मानसानं, याचत्या काय. बड्या पारध्याच सगयं वावर गीवलं त्यानं. दारूच्या नादी लावून."

"पुंड्या मीही सिकेल हावो, मले ज्यान नोको सांगू तू"

देवराव पिऊन निघाला. दुबार पेरणी सुरू झाली. दोन-तीन दिवस पावसानं सवळ दिली नव्हती. हा पाऊस भरपूर आला होता, पण पहिल्या पेरण्या मात्र डुबल्या होत्या. दुसऱ्या सुरू झाल्या होत्या. लांबलेल्या पेरण्या लोक पिकासाठी होत होत्या. तेही पिकं येतील की नाही याची शेतकऱ्यांना शंका होती. आणि दुबार पेरणीसाठी पैसा कोठून आणावा याची देवरावला चिंता होती. किसनाभाऊ आपल्याले कधीही आणि कितीही पैसे देऊ शकतात. असं त्याला मनातून वाटत होतं. आणि ते खरंच होतं. म्हणून तो किसनाकडे पैसे मागण्यासाठी गेला. किसनानं बिनाव्याजी पैश्याची मदत केली. त्यामुळे देवराव खूष झाला होता.

एका सकाळी पुंड्या घरी आला. देवराव तयारी करून निघाला. दोघेही गाडी पकडण्यासाठी स्टॅन्डकडे निघाले. संध्याकाळी बी-बियाणं आणलं. देवरावच्या तोंडावर उत्साह नव्हता, पण पोटात दारू होती. ते ओळखून पार्वती फारशी बोलली नाही. पेरून झालं. देवराव सतत पीत होता. तो आता दारूशिवाय राहू शकत नव्हता. त्याची ती गरज झाली होती. किसना त्याची गरज भागवत होता. किसना त्याले का पैसे देत होता. लोकांना समजून चुकलं होतं. देवरावला मात्र दारू शिवाय काहीच दिसत नव्हतं.

लांबलेली पिकं फारशी आली नाहीत. कशी-बशी पोटापाण्यापुरती पिकं झाली. उन्हाळ्याच्या दिवसात लोकं बाजाराला बाजार पुरवीत असत. आणि देवराव मात्र घोटाला-घोट पुरवीत असे. आता त्याचे घर, शेती, ढोरं-वासरं, पावनंपन, या सर्व गोष्टीतून लक्ष निघालं होतं. तो दारू काढणाऱ्या पुंड्याच्या घराकडेच सारखा दिसायचा. अख्ख्या उन्हाळाभर त्याचा हाच कार्यक्रम होता. उन्हाळा संपत आला.

यावर्षी मृगातच पाऊस आला. पावसाचं वातावरण तयार झालं. जुने जाणकार, वयोवृद्ध म्हणत. यावर्षी पावसाळा चांगला आहे. त्यामुळे पेरणी लवकरच सुरू झाली होती. यावर्षी पेरणीची चांगलीच अडचण निर्माण होणार म्हणून पार्वतीले घरातील वातावरणावरून समजलं होतं. पुंड्यासोबत देवराव तालुक्याला गेला होता. तो घरी येईल म्हणून तिनं वाट पाहिली. भरपूर रात्र होऊनही तो आला नाही म्हणून ती न राहवून पुंड्याच्या घराकडे निघाली. देवरावला शोधण्यासाठी जाण्याची तिची ही पहिलीच वेळ होती. टिमटिम दिव्याच्या उजेडात आत घरात कुणीतरी बसलं होतं. त्याला आवाज देत ती म्हणाली.

"पुंडलिक हात का वं घरी येनूबाई"

वेणूनं आवाज ओळखला होता. एक दिवस तिला पार्वती पाटलीन येईल असा अंदाज होता. खरं तर ती तिची वाटच पाहात होती. तिच्या मनातील तिला बोलायचं होतं. पार्वतीला काही तरी सांगायचं होतं.

"नाई वं पार्वतीबाई, भाऊजी संगच तं गेले"

"मंग आजून आले नाईत, कुठीसा गेले तं"

"कुठीसा गेले तं म्हन्जे काय माय, तुमाले माईतच नाई काय"

"नाई माय, काईच नाई"

"काय माय, भाऊजीन वावर नाई लिऊन देलं त्या किसना बामनाले, त्याच्यासाटीच तं गेले, अंजनगावले."

पार्वतीले एकदमच अंगावर वीज पडल्यासारखं झालं. उभ्यानंच अंग टाकून द्यावं असं तिला वाटलं. कसं तरी तिनं स्वत:ला सावरलं. हेही तिला कळलं नाही. काही वेळ ती बोलत नव्हती. गवताचा विस्तव विझत जावा तशी तिच्या हातापायातील ऊर्जा कमी-कमी होत होती. स्वत:ला सावरून ती म्हणाली.

"हो पन इतका उसीर काऊन झाला असीन म्हनून म्हनत व्हती."

"आता मले काय माईत. अवं नवऱ्याले आवरत जा जराश्या दारूसाठी, नाई तन माल्या धनगरासारखं तुमचंही वावर गिळून टाकीन तो किसन्या बामन."

हे नवलाईची बातमी ऐकून पार्वती म्हणाली.

"आता माय त्याचं कई गीटलं वं"

"तुमाले माईतच नाई काय"

"नाई बॉ, ताली शप्पत"

"अवं मागल्यावर्षी लिऊन घेतलं अन् आता आठारोजा नावावर करून घेतलं त्यानं"

"आता माय खरं कावं"



"मंग काय तं किसना म्हनात त्याले"

पार्वतीला आता तिथं थांबून होत नव्हतं. ती कसातरी निरोप घेऊन घरी आली. रात्रीले देवराव घरीच आला नाही. सकाळी आला तेव्हा त्याचे कपडे मळलेले होते. हातातल्या थैलीत काढला केलेला बाजार होता. तो घरी आला. त्यानं थैलीतला बाजार बाहेर काढला. त्यातील एका धुपट्यात बांधलेले पैसे बाहेर काढून ठेवले. त्यातील दारूची शिशी न्हानीत नेऊन ठेवली. हातपाय धुवून तो जेवायच्या अगोदर न्हानीत गेला व दारू पेऊन जेवायला बसला. गुंडाळलेले पैसे बघून पार्वतीनं विचारलं.

"हे पयसे कोनाचे होत"

"आपलेच होत. वाघाईची पट्टी ईकली म्या किसनाभाऊले"

पार्वती दातखळी बसल्यासारखी चुप झाली. पुढे ती बोलली नाही. त्यानं जेवन आटोपलं. बँकेचे पासबुक सोबत घेतलं. न्हानीत जाऊन दारूची शिशी रिकामी केली. धुपट्यात पैसे घेऊन तो झोकांड्या खात बँकेत पैसे टाकण्यासाठी घराबाहेर निघाला.



साहित्य माध्यम हे अलिकडे अधिकाधिक बोलकं आणि दृश्य होत चाललं आहे. जीवनाशयाला अधिक स्पष्ट, अधिक झूम करून दाखविण्याचा आणि पाहण्याचा खरे तर हा काळ आहे. ग्लोबल व्हिलेज या संकल्पनेची चर्चा याच काळाच्या सुरुवातीला आपण केली आहे. ही चर्चा ग्लोबल या एकाच अक्षावर स्थानबद्ध करण्यात आली आणि व्हिलेज हा केंद्रबिंदूच या चर्चेतून परस्पर मागे ठेवला गेला. पुन्हा ग्रामीण, दलित, पददलित, आदिवासी, प्रादेशिक आणि भाषिक असे अनेक स्तर चिकटवून व्हिलेज ही संकल्पना बादच करण्यात आली.

दिवाकर सदांशिव यांचा हा पहिलाच कथासंग्रह. या पहिल्याच कथासंग्रहाने एक जीवनानुगामी आश्वासकता निर्माण केली आहे. या कथांतून एकत्रितपणे एक व्हिलेज हे संकल्पनाचित्र उभ राहतं. अतिशय बेदरकारपणे, धाडसाने हे चित्र या कथाकाराने शब्दबद्ध केलं आहे. शिवाय हे चित्र कुठेही झूम केलेलं नाही. ते आहे तसं आहे. व्हिलेज हे डावललेलं केंद्र पुन्हा या कथाकाराने मध्यवर्ती आणून ठेवलं आहे. त्यामुळे ह्या कथा दलित, ग्रामीण अशा कुठल्याही ठोकळ स्तरात न बसता मानवाच्या सकारात्मक आणि नकारात्मक भूमिकेचं प्रयोजन स्पष्ट करतात. बेरोजगारी, उपासमार, जातीयवाद, आत्महत्या या वैश्विक आणि विस्तारीत प्रश्नाची मूळचं या कथांतून उघडी झाली आहेत. आशयाची जीवनानुगामिता आणि अभिव्यक्तीतील वास्तवता या बाबतीत हा कथासंग्रह मराठी कथापटाला जरूर समृद्ध करेल.